


सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, १० ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २७२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



माझे शरीर, मन आणि बुद्धी हे माझे नसून समाजाने दिले आहे. तथापि, हे सर्व समाजासाठी समर्पित मानून कुटुंबातील प्रत्येक सदस्याने समाजासाठी काही धन संचित केले पाहिजे. मुला-मुलींमध्ये देशासाठी समर्पणाची भावना जागृत करण्यासाठी ही क्रिया नितांत आवश्यक आहे. सुटीच्या काळात, नातेवाईक आणि मित्रांशी भेटून त्यांच्या सुख-दु:खात सहभागी झाले पाहिजे.

**यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# पाकिस्तानची सहा विमाने पाडली

## ऑपरेशन सिंदूरच्या कारवाईची भारतीय वायुदल प्रमुखांकडून माहिती

### ३०० किलोमीटर अंतरावरून केले लक्ष्य ● एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीने हल्ले उधळले

◆ **बंगळुरू, ९ ऑगस्ट**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरवेळी उडालेल्या जोरदार संघर्षात भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने एका अवॅक्स विमानासह पाकिस्तानची पाच लढाऊ विमाने पाडली. अवॅक्स विमानाला तर ३०० किमीवरून लक्ष्य करण्यात आले. एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीने भारतीय हद्दीत हल्ले करण्याचे पाकिस्तानचे डाव उधळून लावले, अशी माहिती भारताचे वायुदल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी शनिवारी दिली.

बंगळुरूमध्ये आयोजित एल.एम. कात्रे व्याख्यानमालेत बोलताना वायुदल प्रमुख म्हणाले, ऑपरेशन सिंदूरवेळी हवाई संरक्षण प्रणाली एस-४०० गेमचेंजर ठरले. या प्रणालीमुळे पाकिस्तानच्या विमानांना हल्ला करण्यापासून रोखू शकलो. लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्बचा वापर शत्रू करू शकला नाही. पाकिस्तानच्या विमानांशिवाय मोठ्या संख्येने युएव्ही आणि ड्रोन्सही नष्ट केले. त्यांची काही क्षेपणास्त्रे आपल्या हद्दीत पडली होती. आम्ही त्याचे अवशेष गोळा केले असून त्यांचा अभ्यास सुरू आहे. कारवाईसाठी सर्व लक्ष्य आधीच निश्चित करण्यात आले होते. तसेच संबंधित इमारतींची ओळख पटवून त्यांना अचूक पद्धतीने लक्ष्य करण्यात आले. तिन्ही दलाचे समन्वय आणि अत्याधुनिक हत्यार प्रणालीमुळे ही मोहीम यशस्वी ठरली. तसेच शत्रूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आम्ही पाच पाकिस्तानी लढाऊ विमाने पाडली, तसेच सुमारे ३०० किलोमीटर अंतरावरून एक अवॅक्स विमान नष्ट केले आणि याचे पुरावे आमच्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)






### क्षेपणास्त्र हल्ल्यात सहा रडार नष्ट

हवाई संरक्षण प्रणालीमुळे पाकिस्तानी विमाने भारतीय हद्दीत प्रवेश करू शकली नाहीत. आमच्या लढाऊ विमानांनी केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानची सहा रडार सेंटर आणि बहावलपूर येथील दहशतवाद्यांची मुख्यालय उद्ध्वस्त झाले. आम्ही मुरीदके आणि चकलाला सारख्या दोन कमांड अँड कंट्रोल सेंटरवरही हल्ला केला. त्यांच्या नुकसानीचे उपग्रह छायाचित्र आमच्याकडे उपलब्ध आहेत. जाकोबाबाद हवाई तळावरील अमेरिकन बनावटीच्या एफ १६ विमानांसह तेथील आणखी आठ विमाने नष्ट झाल्याचे वायुदल प्रमुख म्हणाले.

### भारताच्या शक्तीपुढे पाकिस्तानची शरणागती

वायुदल प्रमुख म्हणाले, ८० ते ९० तासांच्या युद्धात आम्ही पाकिस्तानचे इतके नुकसान केले की त्यांना हल्ले थांबविण्यासाठी भारताकडे विनवणी करावी लागली. पाकिस्तान पुढे आला आणि आमच्या डीजीएमओला त्यांनी संघर्ष थांबविण्याचा संदेश पाठविला. पण आम्हाला आमच्याच लोकांना आम्ही काय साध्य केले हे सांगावे लागते हे दुर्दैव आहे.

### कारवाईसाठी बंधने नव्हती

हल्ला करण्याची पूर्ण मुभा आम्हाला देण्यात आली, आमच्यावर कोणतीही बंधने लादण्यात आली नव्हती. आम्हाला योजना आखण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. तिन्ही दलांमध्ये समन्वय होता, सीडीएसची सर्व यंत्रणांना एकत्र आणण्यात मोठी भूमिका होती.

# तिब्बतीयन महिलांनी बांधली सरसंघचालकांना राखी



सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना राखी बांधताना तिब्बतीयन महिला

◆ **नागपूर, ९ ऑगस्ट**

रक्षाबंधनाच्या शुभ मुहूर्तावर शनिवारी क्षेत्रीय तिब्बतीयन महिला संघ व भारत तिब्बत सहयोग मूव्हमेंटच्या बहिणींनी रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना राखी बांधली. राष्ट्रसेविका समिती, महाल परिसरातील रहिवासी व दिशा-३० च्या बहिणींनीही राखी बांधली व त्यांना शुभेच्छा दिल्या. तिब्बत कॅम्पचे समन्वय अधिकारी तेन्झिन त्संगपा यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांना १४ वे दलाई लामा यांनी लिहिलेले 'व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस' हे पुस्तक भेट दिले. या दरम्यान क्षेत्रीय तिब्बतीयन महिला संघ व भारत तिब्बत सहयोग मूव्हमेंटद्वारे भगवान गौतम बुद्धांचा थांगका भेट देण्यात आला. या कार्यक्रमात तिब्बतीयन महिला संघाच्या अध्यक्षा क्रुंगा डिकी, सदस्य त्सुत्रिम, कुनसांग पाल्मो, मिग्मार चोडोन, भारत तिब्बत सहयोग मूव्हमेंटच्या लिपाक्षी माने, संरक्षक अशोक मेंढे व इतर सहकारी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### रुग्णालयाला आग; एकाचा मृत्यू, ११ रुग्ण बचावले

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीतील कॉसमॉस रुग्णालयात शनिवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला , तर ११ रुग्णांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. आग लागल्यानंतर अमित नावाच्या एका हाऊसकीपिंग स्टाफने स्वतःला रुग्णालयाच्या बाथरूममध्ये कोंडून घेतले होते, ज्यामुळे त्याचा गुदमरून मृत्यू झाला आहे. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी काही तासात आगीवर नियंत्रण मिळविले.

### दीड हजार नको... बहिणीने लिहले पत्र!

**सातारा** : सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यात रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला महिलांनी एक अनोखा आणि हृदयस्पर्शी आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून दरमहा मिळणाऱ्या दीड हजार रुपयांच्या ओवाळणीऐवजी, अवैध दगडी खाणी आणि क्रशर बंद करण्याची मागणी या महिलांनी केली आहे. विशेष म्हणजे, ही मागणी साध्या पत्रातून नव्हे, तर स्वतःच्या रक्ताने लिहिलेल्या पत्रातून करण्यात आली आहे.

### तरुणीमुळे १९ पुरुषांना एचआयव्हीचा संसर्ग

**रामनगर** : उत्तराखंडमधील रामनगर शहरात १७ वर्षांच्या तरुणीच्या ड्रग्जच्या व्यसनामुळे ती पैशांच्या शोधात अनेक पुरुषांशी शारीरिक संबंध ठेवत होती, ज्यामुळे १९ पुरुषांना एचआयव्हीची लागण झाली आहे. या तरुणीने व्यसनासाठी पुरुषांशी संबंध ठेवले, त्यांना तिच्या आरोग्यस्थितीची माहिती नव्हती, त्यामुळे घटना गंभीर आहे.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन सण साजरा केला



नव्या पिढीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रचंड आकर्षण आहे. राखी बांधल्यानंतर चिमुकलीने मोदींच्या गालाचे चुंबन घेत प्रेम व्यक्त केले



सीमांच्या रक्षणासाठी सदैव तैनात असणाऱ्या जवानांना राखी बांधताना जागतिक महावीर संस्थेच्या सदस्या.

# देशातील ३३४ पक्षांची नोंदणी रद्द

▸ निवडणूक आयोगाचा दणका
▸ देशात आता २ हजार ५२० पक्ष

◆ **नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

भारतीय निवडणूक आयोगाने शनिवारी ३३४ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली. याबाबत माहिती देताना निवडणूक आयोगाने सांगितले की, सर्व पुरावे आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर ३३४ पक्षांची मान्यता रद्द केली आणि त्यांना यादीतून हटवले. आता देशभरातील २ हजार ८५४ राजकीय पक्षांपैकी २ हजार ५२० पक्ष उरले आहेत.




निवडणूक आयोगाच्या कारवाईनंतर देशात केवळ सहा राष्ट्रीय पक्ष उरले आहेत. याशिवाय, प्रादेशिक पक्षांची संख्या ६७ वर आली आहे. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, ३३४ पक्ष आता लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मधील कलम २९बी आणि कलम २९सी तसेच निवडणूक चिन्ह आदेश १९६१ मधील तरतुदींनुसार कुठलाही लाभ घेण्यास अपात्र असतील. आता या आदेशाबाबत आक्षेप असलेला कुठलाही पक्ष ३० दिवसांच्या आत आयोगामध्ये आव्हान देऊ शकतो. (वृत्तसंस्था)

### राज्यातील प्रादेशिक पक्षांची यादी

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी , राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार गट, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), शिवसेना, शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे

### देशात उरलेले सहा राष्ट्रीय पक्ष

निवडणूक आयोगाच्या कारवाईनंतर देशात आता केवळ ६ राष्ट्रीय पक्ष उरले आहे. त्यात अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष (आप), मायावतींचा बहुजन समाज पक्ष (बसपा), देशातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस आणि राष्ट्रीय पीपल्स पार्टी (एनपीपी) यांचा समावेश आहे.

# कुलगामच्या जंगलातील चकमकीत दोन जवान हुतात्मा

**श्रीनगर, ९ ऑगस्ट**

दक्षिण काश्मीरमध्ये १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या चकमकीत शनिवारी दोन जवान हुतात्मा झाले असून १० जखमी झाले आहेत. तसेच एका दहशतवाद्याला ठार मारण्यात आले असून जंगलात आणखी तीन लपल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

कुलगामच्या अखाल भागात नऊ दिवसांपासून दहशतवादविरोधी अभियान सुरू आहे. घनदाट जंगल आणि पर्वतीय गुफांमध्ये दहशतवादी आश्रयास आहेत. शुक्रवारी रात्री दोन्ही बाजूंनी तुफान गोळीबार झाला. अखाल भागात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर लष्कर, निमलष्करी दल आणि जम्मू-काश्मीर पोलिस यांच्या संयुक्त पथकांनी १ ऑगस्टपासून शोधमोहिम सुरू केली.



आतापर्यंत तीन दहशतवादी ठार झाले असून शनिवारी लान्स नाईक प्रितपाल सिंग आणि जवान हरमिंदर सिंग हे दोघे हुतात्मा झाले.

**१४ पैकी ७ दहशतवादी यमसदनी**

सुरक्षा दलांनी स्थानिक १४ कुख्यात दहशतवाद्यांची यादी जाहीर केली असून यापैकी सात जणांचा विविध चकमकींमध्ये खात्मा करण्यात आला आहे. सहा दहशतवादी शोपियान आणि पुलवामातील चकमकीत ठार झाले. (वृत्तसंस्था)

# अनंत चतुर्दशीची सुट्टी रद्द; निर्णयाला विरोध

मुंबइ : राज्य सरकारने अनंत चतुर्दशीच्या दिवशीची सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने गणेशोत्सव मंडळांत नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेली तीन दशके ही परंपरा सुरू असताना अचानक बदल करण्यात आल्याने अनेक व्यावहारिक अडचणी निर्माण होऊ शकतात, असे समितीचे म्हणणे आहे. त्यामुळे ही सुट्टी यंदाही कायम ठेवावी, अशी मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. पूर्वीच्या आदेशानुसार, १६ ऑगस्ट रोजी गोपालकाला (दहीहंडी) आणि ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली होती. मात्र, यावर्षी दोन्ही तारखा शनिवारी आल्याने सरकारी व निमशासकीय कार्यालयांना त्याचा लाभ मिळणार नव्हता. त्यामुळे त्याऐवजी नारळी पौर्णिमा आणि ज्येष्ठा गौरी विसर्जनानिमित्त २ सप्टेंबर रोजी मुंबईत स्थानिक सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# धान्यापासून दारुनिर्मितीला परवानगी

## तीन हजार कोटींचा महसूल मिळण्याची शक्यता...

**मुंबई, ९ ऑगस्ट**

बंद करण्यात आलेले आणि निरूपयोगी ठरलेल्या पिण्यायोग्य मद्य परवान्यांचा आढावा घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महसुलात वाढ व्हावी,यासाठी धान्यापासून दारू निर्मिती करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच या परवान्यातंर्गत पूर्ण क्षमतेने दारू निर्मितीला परवानगी देत असल्याचे महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे.

पिण्यायोग्य मद्यनिर्मिती परवाने सुरू करण्याबाबतचा आदेश राज्य सरकारने गुरूवारी(ता. ७) जारी केला आहे. या निर्णयाने राज्याच्या तिजोरीत तीन हजार कोटींचा महसूल गोळा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आदेशानुसार राज्यात आता देशी दारू, देशीविदेशी दारू या परवान्यांसह आता (आयएमएफएल) महाराष्ट्र निर्मित दारू(एमएमएल) असा परवान्याची नवी श्रेणी तयार केली आहे. महाराष्ट्रनिर्मित दारू परवान्याचा प्रस्ताव राज्याचे अतिरिक्त सचिव वलसा नायर यांच्या नेतृत्त्वाखालील समितीने एप्रिल महिन्यात राज्य सरकारला सादर केला. जानेवारी २०२५ मध्ये या समितीचे गठण करण्यात आले. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने १० जुनला मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे या दारूचे उत्पादन देशाच्या अन्य कोणत्याही राज्यामध्ये करता येणार नाही आणि एमएमएलचे मुख्य कार्यालय हे राज्यातच असेल. राज्यात पिण्यायोग्य मद्य निर्मितीचे एकूण ७० परवाने असून यापैकी २२ बंद असून अन्य १६ परवाने रिटेलर्स म्हणून कार्यरत आहेत. उर्वरित ३२ देशिविदेशी दारूची निर्मिती करीत आहेत. २००७ मध्ये तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने धान्याधारित मद्य निर्मितीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला होता. तीव्र विरोध आणि २०१० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने सरकारचे प्रयत्न निष्फळ ठरले.

# पालकमंत्र्यांनाही सोलापुरातील वाहतुक कोंडीचा दणका

## ● ट्रॅफिक पोलिस नसल्याने गोरेंना १५ मिनिटे गाडीतच राहावे लागले बसून...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे हे आज सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. सोलापूरच्या शिवाजी चौकात नियमितपणे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा खुद्द पालकमंत्री गोरे यांनाच फटका बसला. तब्बल पंधरा मिनिटे गोरे हे वाहतूक कोंडीत अडकले होते.

विशेष म्हणजे सोलापूरच्या वाहतूक विभागाचा एकही कर्मचारी चौकात हजर नव्हता, त्यामुळे झालेली वाहतूक कोंडी पाहत बसण्यापलीकडे गोरे यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. शेवटी जयकुमार गोरेंच्या ताफ्यातील एका पोलिस कर्मचाऱ्याने पळत येऊन वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर समोरील तीन एसटी बस पुढे गेल्यानंतर गोरेंची वाहतूक कोंडीतून सुटका झाली. पण, नियमितपणे वाहतूक कोंडी होणाऱ्या शिवाजी चौकात पालकमंत्र्यांच्या दौऱ्यावेळी एकही वाहतूक पोलिस उपस्थित नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या ताफ्याने दुपारी तीन वाजून पन्नास मिनिटांच्या सुमारास सोलापूरच्या संभाजीराजे चौकातून शहरात एन्ट्री केली. पण, पुढे शिवाजी चौकात पोचण्यापूर्वीच त्यांना वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागले. त्यांचा ताफा हळूहळू पुढे सरकत होता. गोरे यांच्या ताफ्यातील पोलिसांची एक पायलट व्हॅन पुढे निघून गेली. पण, बसस्थानकातून आलेल्या एसटी बसमुळे पालकमंत्र्यांची गाडी वाहतूक कोंडीत सापडली.

मंत्री जयकुमार गोरे यांच्या गाडीच्या पुढे एक आणि शिवाजी चौकात दोन अशा तीन एसटी बस मंत्र्यांच्या ताफ्याच्या पुढे होत्या. बसस्थानकातून बाहेर आलेल्या एसटीच्या मागे दुसरी एक बस होती, त्यामुळे गोरे यांच्या गाड्यांच्या ताफा पुढे जाऊ शकत नव्हता.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...




### कुडल येथे किड व्यवस्थापनावर जनजागृती; लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे आयोजन

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालयातर्फे रावे उपक्रमांतर्गत कुडल (ता. दक्षिण सोलापूर) येथे किड व्यवस्थापन जनजागृती या विषयावर प्रा. अभिजीत नारायणकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संगप्पा केरके हे लाभले होते. या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना किडी विषयी माहिती मिळावी, त्यांच्या व्यवस्थापनाबद्दल योग्य उपायोजना अवलंबने, नवीन किडींचे नियोजन तसेच एकात्मिक कीड रोग नियंत्रण यांची माहिती देणे हा होता. प्रा. नारायणकर यांनी पिकांच्या किडींचे व्यवस्थापन, मित्र कीटक, उडीद तण नियंत्रण, खत व्यवस्थापन आणि किडी नियोजन याबद्दल शेतकऱ्यांना सविस्तर व उदाहरणासहित माहिती दिली. श्री. केरके यांनी अध्यक्षीय भाषणात अशा उपक्रमांची शेतकऱ्यांना नितांत गरज असल्याचे अधोरेखित केले. यावेळी शेतकरी, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अभिजीत उत्तरे, रविराज देटे, तुषार जगताप, शुभम कोरके, हरिभाऊ चव्हाण, पवन बाबर यांनी केले.



### अक्कलकोट लहुजी शक्ती सेनेच्या तालुका अध्यक्षपदी बाबाजी कांबळे

**अक्कलकोट, दि.९ ऑगस्ट-**

अक्कलकोट लहुजी शक्ती सेनेच्या नूतन तालुका अध्यक्षपदी बाबाजी कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली. तालुका उपाध्यक्षपदी पृथ्वीराज नाईकनवरे, तालुका संघटकपदी अनिल झंपले, अक्कलकोट शहराध्यक्षपदी अमर लोखंडे यांची निवड करण्यात आली ., सदर निवड लहुजी शक्ती सेना संपर्क कार्यालय संत हरळ्या शॉपिंग सेंटर येथे झालेल्या बैठकीत करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा संपर्कप्रमुख वसंत देडे यांच्या उपस्थितीत, जिल्हाध्यक्ष नागेश जाधव, भाजपाचे यशवंत तात्या धोंगडे, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे याच्या प्रमुख अतिथींच्या हस्ते पदनियुक्तीचे पत्र देऊन नुतन पदाधिकाऱ्याचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जेष्ठ मातंग समाजाचे राजू लोखंडे, महिपती क्षीरसागर, संतोष पारखे, दीपक रणदिवे, महादेव वाघमारे, नागेश गायकवाड, रोहित देवकुळे, ज्ञानेश्वर कांबळे,शंकर हातागळे, सिद्धाराम वरवटे, रोहित मुत्तन कशी , लखन पाटोळे इब्राहिम चाचा बेपारी रवीजी वाघमोडे मुसा बेपारी आधी लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्य खुली एकांकिका स्पर्धा प्रवेशिका देण्याची आज अंतिम मुदत

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा मुंबई आयोजित नाट्य परिषद करंडक राज्य खुली एकांकिका स्पर्धाचे आयोजन वीस केंद्रावर केले आहे. प्राथमिक फेरी २३ व २४ ऑगस्ट रोजी केंद्रावर तर अंतिम फेरी १५ ते १८ सप्टेंबर रोजी मुंबई येथे होणार असून त्यासाठी प्रवेशिका पाठवण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७पर्यंत असून जास्तीत जास्त नाट्य संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन सोलापूर केंद्राचे प्रमुख सुमित फुलमामडी यांनी कळविले आहे. यासाठी समन्वयक ज्योतिबा काटे (९५२७५०२७२७), इम्तियाज मालदार (८६००३८३८३६) अथवा संजय सावंत (९८५००९४४७५) यांच्याशी संपर्क साधावा.

# जिल्ह्यात आजतागायत १२७ टक्के पेरणी

- आश्लेषाच्या पावसाने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण
- शनिवारीही रात्री उशिरापर्यंत मुसळधार





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

यंदा मे महिन्यातच राज्यभरात ऐतिहासिक पाऊस झाल्याने जून महिन्यातच संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांनी पेरणीची घाई केली. मृग नक्षत्र निघताच पेरणीला आरंभ केला आणि आजतागायत संपूर्ण राज्यात ९५ टक्केपेक्षा अधिक पेरणी झाली आहे. तर सोलापूर जिल्ह्यातही आजतागायत सरासरीच्या १२७ टक्के पेरणी झाली आहे.

यानंतर जून-जुलै महिन्यात मर्यादित पाऊस झाल्याने ही पिके चांगलीच बहरली आहेत. महिनाभराच्या विश्रांतीनंतर आता ऑगस्टमध्ये आश्लेषाचा चांगला पाऊस सुरू झाल्याने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, शनिवारी रात्री उशिरापर्यंत सोलापुरात मुसळधार पाऊस झाला. मे महिन्यात सोलापूर जिल्ह्यात तब्बल २३० मिलीमीटर इतका ऐतिहासिक पाऊस झाला होता. यानंतर या दोन महिन्यात पावसाच्या सरी पडत होत्या. मात्र मोठ्या झालेल्या पिकांना हा पाऊस पुरेसा नव्हता.

यामुळे काही भागात पिके कोमेजून गेली होती. यानंतर ऑगस्टमध्ये पावसाने पुन्हा आरंभ केला आणि खरिपाच्या पिकांना जीवदान मिळाले. आजतागायत १९० मिमीपर्यंत पाऊस नोंदला गेला असून, याचा फायदा खरिपातील पिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. इतकेच कायतर पाणीसाठ्यातही मोठी वाढ होणार आहे. सध्या सोयाबीन हे मुख्य पीक बहरात आले आहे. त्यास पावसाची अत्यंत गरज होती आणि आश्लेषाचा निब्बर पाऊस पडला आणि खरिपाच्या पिकांत जीव आला. दरम्यान, मे महिन्यात २३० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतर जून-जुलै महिन्यात पावसाने दडी मारली होती. आता ऑगस्टमध्ये पुन्हा पावसाने सुरूवात केली असून, जून ते आजतागायत १९० मि लीमीटरपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. सोलापूर शहरातही शनिवारीही पाऊस मोठा पडल्याने अनेक भागात पाणी शिरलं तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ओढे-नाले तुडुंब भरुन वाहू लागले आहेत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मे महिन्यात पावसानं जोरदार बँटिंग केली होती. तुफान पावसानं मे महिन्यातचं अनेक तलाव, नदी, नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाल्यानं मोठा दिलासा मिळाला. पुढं जून महिन्यात ही पावसानं रिमझीम हजेरी लावून सातत्य कायम ठेवले होते मात्र त्या पावसाचा पिकांना फायदा होत नव्हता. जुलैमध्ये पाऊस गायब झाल्यामुळं धास्तावला होता. पाऊस नसल्यानं उकाडा देखील वाढला होता. पावसाळ्याची मृग, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य नक्षत्रात कमीच पाऊस झाला. आश्लेषा नक्षत्रात मात्र पावसाने चांगलीच सलामी लावली. आता आठवडाभरापासून जोरदार पाऊस कोसळत असल्याने सोलापूरकरांचा पाणीप्रश्न मिटला आहे.

**शनिवारीही दिवसभर पाऊस :** आश्लेषा नक्षत्र निघाल्यापासून पुन्हा पावसाने जोरदार हजेरी लावली असून, आज शनिवार, दि. ९ ऑगस्ट रोजीही दिवसभर दमदार पाऊस झाला. सायंकाळी ८ पासून मुसळधार पाऊस कोसळत होता. यामुळे सोलापूर शहरातील जनजीवन विस्कळीत झाले होते. वाहनधारक, नागरिकांचेही रात्री हाल झाले.

**आजतागायत तालुकानिहाय झालेली पेरणी अशी**

उत्तर सोलापूर तालुक्यात २१६७३ हेक्टरवर १७४.८५ टक्के खरिपाची पेरणी झाली आहे. तर दक्षिण सोलापूर ४१२७५.२-११३.७ टक्के, बार्शी १०४२६३.९-१४२.४५, अक्कलकोट ६४३८४-८७.८२, मोहोळ १९६९३.५-१५१.३३, माढा ३९०२३-१६३.२६, करमाळा ४८९७५-१७८.४८, पंढरपूर ७५८२-१२७.७६, सांगोला ३५१९९.६-११४.५२, माळशिरस १६८६३-११५.०९, मंगळवेढा २९०६४-१०७.३१ अशी जिल्ह्यात एकूण ४ लाख २७ हजार ९९६.२ हेक्टरवर १२६.६४

# मोडनिंब-करकंब 'नगरपंचायत'ची घोषणा निवडणुकीनंतर : आ. अभिजीत पाटील

### मोडनिंब येथे वेताळ परिवाराच्यावतीने नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.९ ऑगस्ट-**

मोडनिंब-करकंब नगरपंचायतची घोषणा जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीनंतर होणार असून याबाबत प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

मोडनिंब ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वी नगरपंचायती साठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धारही आ. पाटील यांनी व्यक्त केला. मोडनिंब (ता.माढा) येथील वेताळ परिवाराच्या वतीने आयोजित नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. ग्रामदैवत श्री वेताळ साहेब प्रतिमेचे पूजन करून या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. आमदार पाटील म्हणाले की, मोडनिंब एमआयडीसीबाबत अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. स्थानिक तरुणांना उद्योगांनाही प्रोत्साहन देऊन जेणेकरून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि गावाचा प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. विकासकामे, पायाभूत सुविधा आणि स्थानिकांच्या अपेक्षांबाबतही त्यांनी भाष्य केले.

यावेळी माजी सभापती भारत शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वंभर पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, वेताळ परिवाराचे प्रकाश गिड्डे, अनिल शिंदे, ऋषी कोठावळे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ नागरिक संघाचे हनुमंत कुंभार यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रा. रमेश शिरसाट यांनी मानले. यावेळी निलेश पाटील, चंद्रकांत गिड्डे, सौदागर जाधव, उत्तम सावंत, वेताळ परिवार उपस्थित होते.

**जिल्हा परिषद शाळेसाठी ५ खोल्या मंजूर :** जिल्हा परिषदेच्या शाळेतील १० वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत. त्या शाळेतील धोकादायक वर्गखोल्या पाडून, जिल्हा परिषद, डीपीडीसी अंतर्गत ५ खोल्या मंजूर मिळाली आहेत. उर्वरीत पाठपुरावा करून नवीन वर्ग खोल्या बांधणार आहे. दुरुस्ती रिपोर्ट सादर करून तात्पुरता स्वरूपात त्यातून विद्याथ्यर्थ्यांची गैरसोय दूर होणार असल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.



### महापालिकेच्या वतीने क्रांती दिनानिमित्त महापुरुषांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

महापालिकेच्या वतीने ९ ऑगस्ट क्रांती दिना निमित्त पार्क स्टेडियम जवळील हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा किसन सारडा, हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास आज महापालिका अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर तुळजापूर वेस येथील हुतात्मा स्तंभ या ठिकाणी म हापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच सोलापूर शहरातील विविध ठिकाणचे थोर महापुरुषांच्या पुतळ्यास विभागीय कार्यालयाच्या अधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागीय अधिकारी शाम कन्ना, प्रकाश सावंत, कनिष्ठ अभियंता निलेश कंदलगावकर, अनिकेत कांबळे ,अनिकेश मिठठा आदी मान्यवर उपस्थित होते.

# शहरातील ब्रह्मवृदांकडून 'यज्ञोपवितंम् परमंम् पवित्रंम्' च्या मंत्रोच्चारात श्रावणी

### तीन संस्थांच्या सहकार्याने पार पडला विधी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

श्रवण नक्षत्राच्या निमित्ताने श्रावण पौर्णिमेदिवशी शनिवारी दि.९ ऑगस्ट रोजी शहरातील तीन संस्थांकडून नूतन यज्ञोपवीत धारण विधीसाठी श्रावणीकर्म करण्यात आले.

यज्ञोपवितं परमं पवित्रम् । प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात ।। आयुष्यमग्रंम् प्रतिमुंञ्च शुभ्रं । यज्ञोपवितं बलमस्तु तेजः ।। या मंत्राद्वारे यावेळी नूतन यज्ञोपवीत धारण करण्यात आले.

**जुळे सोलापूर ब्रह्म सेवा संस्था**

जुळे सोलापूर ब्रह्म सेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शनिवार दि.९ ऑगस्ट रोजी जुळे सोलापुरातील श्रीकांत नगर येथील गणेश मंदिरात सकाळी साडेसात वाजता श्रावणीच्या विधीला सुरूवात झाली. वेदमूर्ती राघवेंद्राचार्य आद्य गुरुजी यांनी पौरोहित्य केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डी. डी. कुलकर्णी, प्रमोद तमन्नवार यांच्यासह पदाधिकारी व परिसरातील ब्रह्मवृंद उपस्थित होते.

**यल्लालिंग मठ : कर्णिक नगर**

कर्णिक नगरातील ब्राह्मण समाजातर्फे याच परिसरात असलेल्या यल्लालिंग मठाम ध्ये आज दि. ९ ऑगस्ट रोजी श्रावणी चा कार्यक्रम झाला. सकाळी साडेसात वाजता विधीला सुरुवात झाली. यावेळी संयोजक राहुल उपाध्ये आणि बजरंग कुलकर्णी यांच्यासह या परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**मध्व परिषद : उत्तराची मठ**

सोलापूरच्या मध्व परिषदेतर्फे ९ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजता पाटील नगरातील उत्तरादी मठाच्या प्लॉटवर श्रावणीचा कार्यक्रम झाला. यावेळी बी.जी. कुलकर्णी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. वेदमूर्ती विद्यानिधी आचार्य आणि अमित आचार्य यांनी पौरोहित्य केले.

# क्रीडा



## यश ढोकरे व अनुष्का घोडके जिल्हा बास्केटबॉल संघाचे कर्णधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

यश ढोकरे व अनुष्का घोडके यांची अनुक्रमे १८ वर्षाखालील मुले व मुली गटाच्या जिल्हा बास्केटबॉल संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली.

पुणे येथे १४ ऑगस्टपर्यंत होणाऱ्या राज्य स्पर्धेत दोन्ही संघ सहभागी झाले. दोन्ही संघास सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के. डी. पाटील, मनोज यलगुलवार, दिनेश सारंगी, सचिव साकिब शेख, अभिजीत टाकळीकर, रंजिता चाकोते, मुकीम खान, वलजा घुमे, राष्ट्रीय खेळाडू विकी गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

संघ : मुले : यश ढोकरे (कर्णधार), जैद सैय्यद, अब्दुल खालिद काझी, सुभान तुळजापूर, ओम इंगळे, अदनान शेख, जबी हत्तुरे, रियान मुजावर, श्रेयश साळुंखे, अबूतल्हा पठाण, मोहम्मद इनामदार, अर्श शेख. प्रशिक्षक - नावेद मुन्शी.

मुली : अनुष्का घोडके (कर्णधार), श्रुष्टि ढोकरे, गार्गी देशपांडे, भोमिका सोनकुसरे, यशमिता लीला, सिया कांबळे, अर्चना रांगडाळ, शर्यशी पवार, निहारिका मोने, निहारिका गुंडेटी, अहिरा, श्रियशी. प्रशिक्षक- ताबीश दौलताबादकर.



## राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सोलापूरला ३ पदके

**राजमहेंद्र येमूल सुवर्ण व कास्य तर विष्णू सरगर कास्यचे मानकरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

कोझीखोडा ( केरळ ) येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सोलापूरच्या खेळाडूंनी एक सुवर्ण व दोन कास्य पदकांची कमाई केली.

राजमहेंद्र येमूल यांनी वयाच्या ६३व्या वर्षी मास्टर तीन गटातील ८३ किलो गटात ३९२.५ किलो वजन उचलुन कास्य तर बेंच प्रेस या प्रकारात १०२.५ किलो वजन उचलत सुवर्ण पटकाविले. सांगोल्यातील विष्णू सरगर यांनी वयाच्या ७३व्या वर्षी मास्टर फोर या गटात ९४ किलो वजन गटात बेंच प्रेस या प्रकारात ६५ किलो वजन उचलत कास्य पदक प्राप्त केले. त्यांचे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव सरदेसाई, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. सुरेश पवार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा संतोष गवळी, प्रा. पवार, प्रा. गायकवाड (सांगोला), मारुती घोडके, नितीन गोरे, विलास बेलदार व शुभम जगताप यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरला १० पदके

**सात सुवर्ण, दोन रौप्य व एक कांस्यची कमाई श्रावणी सूर्यवंशी, मनस्वी माने तिहेरी सुवर्णचे मानकरी**


राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत यश मिळवलेल्या खेळाडूंसमवेत प्रशिक्षक श्रीकांत शेटे, मनीष भावसार व केशव शिंदे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

अखिल भारतीय जलतरण महासंघाच्या वतीने बंगळुरू येथे झालेल्या कनिष्ठ व उपनिष्ठ गट राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सोलापूरच्या डायव्हिंग खेळाडूंनी सात सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य अशी १० पदके पटकाविली.

यात श्रावणी सूर्यवंशी व मनस्वी माने यांचा प्रत्येकी तीन सुवर्ण पदकांचा समावेश आहे. वंशिका चुंगीवडियारने एक सुवर्ण व एक कांस्य पदक संपादिले. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात श्रावणी व १४ वर्षाखालील मुलींच्या गटात मनस्वी यांनी डायव्हिंगमधील हाय बोर्ड, एक मीटर व तीन मीटर स्प्रिंग बोर्ड प्रकारात सुवर्ण पदक जिंकले. रणवीर खाडे याने एक मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड या प्रकारात दोन रौप्य मिळविली. त्यांना प्रशिक्षक श्रीकांत शेटे, मनीष भावसार व केशव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

**सहभागी खेळाडू :** मुले : संकेत लिगाडे, वेदांत बांदल, अंश तिलोटिया, श्रीगणेश उडता, वेदात चिलवेरी. मुली : अपूर्वा अंधारे, रिया वदूल, मनस्वी सावंत, त्रिवेणी खांडेकर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# युक्रेनच्या सहभागाशिवाय शांतता करार मृत उपाय

## ट्रम्प-पुतिन भेटीवरून झेलेन्स्की यांचा इशारा ● प्रादेशिक अखंडतेवर तडजोड नाही

◆ **कीव, ९ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १५ ऑगस्ट रोजी अलास्कामध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेणार आहेत. यावेळी युक्रेन युद्धावर करार करण्यासंदर्भात चर्चा होणार आहे. यावर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी आक्षेप घेतला आहे. युक्रेनच्या सहभागाशिवाय कोणताही शांतता करार हा मृत उपाय असून प्रादेशिक अखंडतेवर कोणतीही तडजोड करणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.



ट्रम्प-पुतिन बैठकीबद्दल झेलेन्स्की म्हणाले, संविधानात नमूद केलेल्या युक्रेनच्या प्रादेशिक अखंडतेवर कोणतीही तडजोड केली नाही. चिरस्थायी शांततेसाठी चर्चेत युक्रेनचा सहभाग आवश्यक आहे. युक्रेनचे लोक रशियाला त्यांची जमीन ताब्यात घेऊ देणार नाहीत. युक्रेनशिवाय कोणताही उपाय शांततेच्या विरोधात आहे. यातून काहीही साध्य होणार नाही. रशियन सैन्य सतत आमच्या शहरांवर हल्ले करत आहे. रशियाने ताब्यात घेतलेला प्रदेश आम्हाला हवा आहे. अमेरिका आणि रशियाने खाजगीत वाटाघाटी केली तर आमच्या समस्यांवर तोडगा निघणार नाही आणि आम्ही हे कदापि मान्य करणार नाही. ट्रम्प यांना शांतता करारावर चर्चा करायची असल्यास त्यांनी युक्रेनला यात सहभागी करायला हवे, एकतर्फी चर्चेतून काहीही निष्पन्न होणार नसल्याचे झेलेन्स्की यांनी सांगितले.

### युद्धबंदी प्रस्तावासाठी रशियाच्या अटी

ट्रम्प यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी नुकताच फोनवरून संवाद साधला होता. त्यानंतर अमेरिकेच्या युद्धबंदी प्रस्तावावर त्यांनी सहमती दर्शवली, मात्र यासाठी त्यांनी काही अटी ठेवल्या आहे. यावर ट्रम्प १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या भेटीत चर्चा करणार आहे. दोन्ही नेत्यांची भेट अलास्कामध्ये होणार आहे. पुतिन यांचा गेल्या दशकातील पहिलाच अमेरिकेचा दौरा असेल. (वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार देण्याची मागणी

ट्रम्प यांनी आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यातील शांतता करारासाठी मध्यस्थी करीत दोन्ही देशात शस्त्रबंदी घडवून आणली. त्यानंतर दोन्ही देशांच्या नेत्यांनी नोबेल शांतता पुरस्कारासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या नामांकनाला पाठिंबा दिला. अझरबैजानचे राष्ट्राध्यक्ष इल्हम अलीयेव आणि आर्मेनियाचे पंतप्रधान निकोल पशिन्यान यांनी सांगितले की ट्रम्प यांना त्यांच्या मध्यस्थीसाठी नोबेल शांतता पुरस्कार मिळाला पाहिजे. यापूर्वी पाकिस्तान आणि इस्रायलने ट्रम्प यांच्या नोबेल शांतता पुरस्काराच्या नामांकनाला पाठिंबा दिला.

### कोणत्या विषयांवर चर्चा होणार?

पुतिन आणि ट्रम्प यांच्या भेटीत रशिया-युक्रेन युद्धबंदीसाठी तोडगा काढण्याच्या संदर्भात चर्चा होणार आहे. यात युद्धबंदीमुळे कायमस्वरूपी शांतता निर्माण झाली पाहिजे आणि संघर्षाची मूळ कारणे दूर झाली पाहिजे. शत्रुत्व थांबवण्यासाठी युद्धबंदीच्या प्रस्तावाशी सहमत असलो तरी रशियाने ताब्यात घेतलेला प्रदेश युक्रेनला परत केला जाणार नाही, अशी पुतिन यांची अट आहे. तसेच युक्रेन नाटोचा सदस्य होणार नाही याची हमी पुतिन यांना हवी आहे.



# सेवाकार्यातून सशक्त राष्ट्राची निर्मिती व्हावी

## ● अ. भा. सहप्रचार प्रमुख प्रदीप जोशी यांचे प्रतिपादन ● काळे परिवाराकडून सदनिका हस्तांतरित

**अकोला, ९ ऑगस्ट**

सेवाकार्याच्या माध्यमातून समाजाच्या सर्व स्तरापर्यंत आपण पोहोचलो आहोत. समाज आपल्यासोबत उभा राहताना दिसत आहे. पण, केवळ हे पुरेसे नसून, समाजातील वंचित घटकांना सन्मान, स्वाभिमान, सहभाग आणि संविधानाच्या चौकटीत सुरक्षितता हवी आहे. विविध सेवाकार्ये या दृष्टीने काम करीत आहेतच. या सर्वांसोबत समस्त समाजाने उभे राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अखिल भारतीय सहप्रचार प्रमुख प्रदीप जोशी यांनी येथे व्यक्त केले.

ते येथील खंडेलवाल भवन येथे डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीद्वारा आयोजित कार्यक्रमात शनिवारी बोलत होते. शालिनी व मुकुंद माधव काळे परिवाराने डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीला आळशी प्लॉटस्थित जाई अपार्टमेंट येथील सदनिका हस्तांतरित केली. यावेळी आयोजित कौटुंबिक कार्यक्रमात मंचावर सेवा समितीचे अध्यक्ष बाबुजी राठी, भाऊसाहेब नाईकवाडे, डॉ. नानासाहेब चौधरी, गोपाल खंडेलवाल, शालिनी काळे, मुकुंद काळे यांची उपस्थिती होती. प्रदीप जोशी म्हणाले की, जगातील काही शक्ती देशाच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीला रोखण्यासाठी विविध युक्त्या रचत आहेत. दहशतवाद, शेजारी देशांचा दबाव, सामाजिक फूट यासारखे आव्हान उभे करीत आहेत. या विरोधात ठोस व्यूहरचना आखण्याची गरज आहे. भारताची अर्थव्यवस्था २.५४ ट्रिलियन डॉलरवर पोहोचली असली तरी, दुसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेकडे झेप घेण्यासाठी नवे उद्योग आणि तंत्रज्ञानातील प्रगती आवश्यक आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनो, ड्रोन आणि क्वांटम तंत्रज्ञानात भारताला सक्षम व्हावे लागेल, असे प्रदीप जोशी म्हणाले. कार्यक्रमात डॉ. नानासाहेब चौधरी, शालिनी काळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन कल्याणी काळे चोंढीकर, श्रीकांत कोंडोलीकर यांनी केले. आशाताई काळे यांनी गायिलेल्या निर्वाणषटकाने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाला प्रांत प्रचारक गणेश शेटे, रवींद्र भुसारी, सेवा समितीचे विनोद देशमुख, विकास पांडे, राम मोरगावकर, दामोदर परकाळे, दीपक बडमे, अजय नवघरे यांच्यासह गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती.

# भारत कुणासमोरही झुकणार नाही

## पीयूष गोयल यांची अमेरिकेच्या शुल्कावर स्पष्टोक्ती

◆ **नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

भारताची अर्थव्यवस्था ६.५ टक्के विकासदराने पुढे जात आहे. जगातील बहुतांश देश व्यापारी भागीदार नव्याने ठरवत आहेत. त्यामुळे दबावात कुणाशीही व्यापार करार करणार नाही. भारत कुणासमोरही झुकणार नाही, अशी भूमिका केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी अमेरिकेने लादलेल्या आयात शुल्कावर मांडली.



एका कार्यक्रमात बोलताना गोयल म्हणाले, जग आता जागतिकीकरणाच्या समस्येचा सामना करत नाही. उलट त्यांचे व्यापार मार्ग आणि भागीदार पुन्हा परिभाषित करत आहेत. व्यापारातील समस्यांवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने आधीच अनेक पावले उचलली आहेत. आज भारत जागतिक विकासात १६ टक्के योगदान देत आहे. भारताची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलर्स असून जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहोत. भारतात तरुणांची संख्या सर्वाधिक आहे, तर इतर देशांची लोकसंख्या वृद्ध होत आहे. ब्रिटनशी झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे भारतात १०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होणार असून त्यामुळे १० लाख लोकांना थेट रोजगार मिळेल. हा करार १ ऑक्टोबरपासून लागू होईल.

### मोदींच्या नेतृत्वात देश मजबूत, स्वावलंबी

गोयल म्हणाले की भारत लवकरच यूएई, मॉरिशस, ऑस्ट्रेलिया, युरोपियन युनियन, चिली, पेरू, न्यूझीलंड आणि अमेरिका यासारख्या देशांशी व्यापार करार करणार आहे. आजचा भारत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पूर्वीपेक्षा अधिक मजबूत, स्वावलंबी आहे. (वृत्तसंस्था)

# मोदींचा चीन दौरा एकता, मैत्रीचा नवा टप्पा

## पंतप्रधानांच्या स्वागतासाठी चीनने जारी केले निवेदन

◆ **बीजिंग, ९ ऑगस्ट**

अमेरिका-भारत यांच्यात संबंध ताणले असताना पंतप्रधान मोदी शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन अर्थात् एससीओच्या बैठकीसाठी चीनला जाणार आहेत. अशातच चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदन जारी करीत पंतप्रधान मोदींचे चीन दौऱ्यात भव्य स्वागत केले जाईल. हा दौरा एकता आणि मैत्रीचा हा नवा टप्पा असल्याचे म्हटले आहे.

३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या काळात तियानजिन येथे एससीआ बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता आहे. एकता आणि मैत्रीचा हा नवा टप्पा असल्याचे चीनने म्हटले आहे.चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी म्हटले की, एससीओ तियानजिन शिखर परिषद ही एससीओच्या स्थापनेपासूनची सर्वात मोठी शिखर परिषद असेल. एससीओ तियानजिन शिखर परिषदेसाठी चीन पंतप्रधान मोदींचे चीनमध्ये स्वागत करतील. आम्हाला विश्वास आहे की सर्व पक्षांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे तियानजिन शिखर परिषद एकता, मैत्री आणि फलदायी मेळावा असेल आणि एससीओ विकासाच्या एका नवीन टप्प्यात प्रवेश करेल. ज्यामध्ये अधिक एकता, समन्वय, गतिमानता आणि उत्पादकता असेल. (वृत्तसंस्था)

# कैद्यांच्या सुरक्षेच्या कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल ठाण्याचे नऊ पोलिस निलंबित

◆ **ठाणे, ९ ऑगस्ट**

ठाणे शहरात सात अंडरट्रायल कैद्यांना वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन जाताना कथित निष्काळजीपणा व कर्तव्यात कसूर केल्याबद्दल नऊ पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

४ ऑगस्ट रोजी सात अंडरट्रायल कैद्यांना कळवा नागरी रुग्णालयात नेण्यात आले तेव्हा अनेक अनियमितता आढळून आल्या, त्या आधारे पोलिस उपायुक्त (मुख्यालय-२) पवन बनसोडे यांनी निलंबनाचे आदेश जारी केले. पोलिस पथक कैद्यांचे योग्यरित्या निरीक्षण करण्यात अपयशी ठरल्याने गैरवर्तनाचा संशय निर्माण झाला होता, असे अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले.

रुग्णालयात तपासणीत असे दिसून आले की सातपैकी केवळ पाच कैद्यांची नोंद होती. एका कैद्यालाही हातकड्या न लावता सोडण्यात आले व एका पथकातील सदस्याला त्याच्या कर्तव्यावर उपस्थित राहण्याऐवजी त्याच्या मोबाईल फोनवर बोलताना आढळून आले. त्यानंतर पोलिस पथकाने करण दाभालिया व राजेश पांबर या दोन बेपत्ता कैद्यांच्या ठावठिकाणाबाबत वरिष्ठांची दिशाभूल केल्याचा आरोप आहे. ते दोन्ही कैदी एक्स-रे काढण्यासाठी गेले होते, असे पथकाने प्रारंभी दावा केला होता, तथापि, एक्स-रे विभाग व आजूबाजूच्या परिसरात तपासणी केली असता त्यांचा कोणताही पत्ता लागला नाही. त्यानंतर कैदी वॉशरूममध्ये गेले होते, असे पथकाने सांगितले, परंतु ते कैदी तिथेही सापडले नाहीत. नंतर दुपारी ३.५० वाजता दोघांचा शोध घेण्यात आला. निलंबित केलेल्या नऊ पोलिस कर्मचाऱ्यांची नावे गंगाराम घुले, गिरीश पाटील, विलास मोहिते, किशोर शिर्के, अशोक मुंडे, संदीप खरात, सुनील निकाळजे, भरत जयभाये व विक्रम जांभुरे अशी आहेत. (वृत्तसंस्था)

### ठाकरे गटाच्या सिद्धेश शिंदेविरोधात गुन्हा

**मुंबई**: वरळी येथे गर्दीत ठाकरे गटाचे कार्यकर्ते सिद्धेश शिंदे याने पाठीवर थाप मारल्याची तक्रार शिवसेनेच्या महिला कार्यकर्तीने केली. तक्रारीनंतर पोलिसांनी शिंदेविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# भारतीय विमानांना प्रवेश नाकारल्याने ४१० कोटींचे नुकसान

## संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांची कबुली

◆ **इस्लामाबाद, ९ ऑगस्ट**

भारतासोबतच्या तणावामुळे पाकिस्तानने आपल्या हवाई क्षेत्रात भारतीय विमानांना प्रवेश नाकारला, ज्यामुळे पाकिस्तान एअरपोर्ट्स अथॉरिटीला तीन महिन्यांत तब्बल ४.१० अब्ज डॉलर्स अर्थात् ४१० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागल्याचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे.



२४ एप्रिल ते २० जून २०२५ दरम्यान पाकिस्तानने भारतासाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. या निर्णयाचा थेट परिणाम दररोज उड्डाण करणाऱ्या १०० ते १५० भारतीय विमानांवर झाला. पाकिस्तानच्या एकूण हवाई वाहतुकीत २० टक्के घट झाली व ओव्हरफ्लायिंग चार्जेस अर्थात् आंतरराष्ट्रीय विमानांकडून घेतल्या जाणाऱ्या हवाई शुल्कातून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी घट झाल्याचे आसिफ म्हणाले. दोन्ही देशातील व्यापार बंद झाल्याने अर्थव्यवस्थेला नुकसान होत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. भारतासोबत चर्चा करण्यासाठी तयार असून शांततेने सिंधू जल करार आणि इतर मुद्द्यांवर तोडगा काढण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

### काश्मीर प्रश्नात अमेरिकेने मध्यस्थी करावी

काश्मीर वाद सोडवण्यासाठी अमेरिकेने मध्यस्थी करावी, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते शफकत अली खान यांनी म्हटले आहे. काश्मीर प्रश्न निकाली काढण्यासाठी आणि दक्षिण आशियातील शांतता व सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर तिसऱ्या देशाने मध्यस्थी करावी अशी आमची इच्छा आहे. आतापर्यंत दोन्ही देशात नियमित राजनैतिक संपर्क वगळता कोणताही संपर्क झालेला नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याप्रकरणी लक्ष दिल्यास काश्मीर मुद्द्यावर समाधान निघू शकते, असे त्यांनी सांगितले.



# २०३० पर्यंत चंद्रावर उभारणार अणुभट्टी

## नासाचे कार्यकारी प्रमुख डफी यांची घोषणा; मानवी वस्तीच्या योजनेवर काम सुरू

**वॉशिंग्टन, ९ ऑगस्ट**

अमेरिकेची अंतराळ संस्था नासा चंद्रावर अणुभट्टी उभारण्याच्या एका मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी योजनेवर काम करत आहे. २०३० पर्यंत चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्तीची शक्यता अस्तित्वात आणणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे . ही योजना भविष्यात चंद्रावरील मानवी वस्त्या आणि वैज्ञानिक संशोधनासाठी अमर्याद ऊर्जेचा स्रोत प्रदान करेल असे नासाचे कार्यकारी प्रमुख सीन डफी यांनी सांगितले.

डफी यांनी प्रसार माध्यमांना या योजनेची माहिती देताना सांगितले की, नासा या प्रकल्पासाठी लवकरच खासगी कंपन्यांकडून प्रस्ताव मागवणार आहे. नासाचे लक्ष्य चंद्रावर १०० किलोवॅट क्षमतेची एक अणुभट्टी विकसित करणे आहे. ही अणुभट्टी चंद्रावरील भविष्यातील अर्थव्यवस्थेला गती देईल आणि अमेरिकेच्या अवकाश सुरक्षेला मजबूत करण्यास मदत करेल. या प्रकल्पासाठी अब्जावधी डॉलर खर्च अपेक्षित आहे. अणुभट्टीची उभारणी, ऊर्जा वितरण आणि संचालन यासाठी प्रचंड खर्च येतो. हा प्रकल्प आर्टेमिस मिशनचा एक भाग असून, त्याचा अंदाजित खर्च ८,२०० अब्ज रुपये आहे. डफी यांनी म्हटले की, पुढील ६० दिवसांच्या आत या प्रकल्पासाठी एका प्रमुख अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

### अवकाश प्रवासाला मिळणार नवी दिशा

नासा अशा कंपन्यांच्या शोधात आहे, ज्या २०३० पर्यंत चंद्रावर अणुभट्टी स्थापित करून ती कार्यान्वित करू शकतील. ही योजना केवळ चंद्रावर ऊर्जा मिळवण्यापुरती मर्यादित नाही, तर ती भविष्यातील मानवी वस्त्या, वैज्ञानिक संशोधन आणि आंतरराष्ट्रीय अवकाश धोरणांची दिशा ठरवणारी ठरू शकते. या प्रकल्पामुळे मानवाच्या अवकाश प्रवासाला एक नवी दिशा मिळणार असून, चंद्र भविष्यात पृथ्व

## चित्रपट वार्ता

### एसएसएमबी २९ चा फर्स्ट लूक

**मुंबई.** रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर प्रसिद्ध दिग्दर्शक एस.एस. राजामौली यांनी आगामी चित्रपटाचा पहिला लूक प्रदर्शित करून चाहत्यांना आनंदाचा धक्का दिला आहे. महेशबाबू-प्रियंका चोप्रा यांची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे नाव एमएसएमबी २९ आहे. या चित्रपटाची कथा इतकी मोठी आहे की, एखादे पोस्टर किंवा पत्रकार परिषद घेऊन त्याविषयीची माहिती देता येणार नाही, अशा अर्थाचे ट्विट राजामौली यांनी एक्सवर केले आहे. हा चित्रपट येत्या नोव्हेंबर महिन्यात प्रदर्शित होणार असून त्याचे बहुतांश चित्रीकरण आफ्रिकेच्या जंगलात आणि वाराणसीत करण्यात येत आहे.




### आमिरने मला वर्षभर घरात कोंडून ठेवले

**मुंबई.** बॉलीवूडचा मि.परफेक्शनिस्ट म्हणून प्रसिद्ध असलेला अभिनेता आमिर खान आणि त्याचा भाऊ फैसल खान यांच्यातील वाद सर्वश्रुत आहेत. आता फैसल खानने आमिरवर नव्याने आरोप करीत, त्याने आपल्याला वर्षभर घरात कोंडून ठेवल्याचा आरोप केला आहे. मला स्किझोफ्रेनिया झाला आहे आणि मी समाजविघातक कारवाया करू शकतो, असे तो म्हणायचा. माझ्यावर लक्ष ठेवण्यासाठी त्याने सुरक्षा रक्षकही ठेवले होते. तेच मला औषधपाणी देत, असा आरोप फैसलने केला आहे. कयामत से कयामत तक या चित्रपटातून दोन्ही भावांनी फिल्मी कारकिर्दीला सुरुवात केली होती, हे विशेष!



### सखाराम बाईंडर पुन्हा येतोय

**मुंबई.** प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकरांची अभिजात कलाकृती म्हणजे सखाराम बाइंडर हे नाटक! १९७२ मध्ये प्रदर्शित झालेले हे नाटक आता ५ दशकांनंतर पुन्हा एकदा मंचावर येणार आहे. विविध भाषांमध्ये प्रयोग झालेल्या या नाटकात आता सखारामची भूमिका ताकदीचे अभिनेते सयाजी शिंदे करणार आहेत. शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुण्यात या नाटकाचं पोस्टर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आले. हे नाटक माझ्यासाठी एक वेगळा अनुभव आहे. रसिकांना पुन:प्रत्ययाचा आनंद देण्यासह युवा पिढीला एक विचार समजाविण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याची भावना सयाजी शिंदे यांनी व्यक्त केली. नाटकाचे निर्माते मनोहर जगताप तर कार्यकारी निर्माते निखिल जाधव आहेत.

### फिट मिलिंदची फिट आई

**मुंबई.** फिटनेस फ्रिक अभिनेता मिलिंद सोमणचा वयाच्या साठाव्या वर्षीचा फिटनेस सर्वांनाच परिचित आहे. पण, त्याच्या आईचा दोरीच्या उड्या मारतानाचा व्हिडिओ बघून चाहते चकीत झाले आहेत. मिलिंद सोमणने आईचा दोरीच्या उड्या मारतानाचा व्हिडिओ शेअर केला आणि यासोबत मेसेज लिहिला की,'फॅमिली स्किपिंग टाईम! आई आता ८६ वर्षांची आहे. तिच्या दररोजच्या ॲक्टिव्हिटीमध्ये योगासोबतच दोरीच्या उड्या मारणंही आहे.' या व्हिडीओमध्ये स्वत: मिलिंद सोमण एका पायावर दोरीच्या उड्या मारतो आहे. तर बाजूलाच उषा सोमणही झपझप दोरीच्या उड्या मारत आहेत. यापूर्वीही मिलिंदने आईचे मॅरेथॉनमध्ये धावताना आणि सुनेसोबत लंगडी खेळतानाचे व्हिडीओ शेअर केले आहेत.

# सतरा कोटी प्रकाश वर्षे अंतरावर सात बुडबुड्यांचा शोध

## ● शास्त्रज्ञांचे अनोखे संशोधन ● विलक्षण दीर्घिकीय वाऱ्याचा प्रकार टिपला



◆ **टोकियो, ९ ऑगस्ट**

आंतरविद्यापीठीय खगोल आणि खगोलभौतिकी केंद्रातील अर्थात् आयुका आणि टोकियो विद्यापीठातील खगोलशास्त्रज्ञांनी अत्यंत असामान्य दीर्घिकेभोवती एका विलक्षण दीर्घिकीय वाऱ्याचा प्रकार टिपला आणि पृथ्वीपासून १७ कोटी प्रकाश वर्षे दूर असलेले सात प्रचंड बुडबुडे शोधून काढले.

आयुकाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले की, पृथ्वीपासून १७ कोटी प्रकाश वर्षे दूर असलेल्या, ७ हजार १०० प्रकाश वर्षांचा व्यास असलेल्या, मोठ्या प्रमाणावर नवीन तारे निर्माण करत असलेल्या दीर्घिकेभोवती सात प्रचंड बुडबुडे आढळून आले. विशेष म्हणजे, या बुडबुड्यांचा व्यास २३ हजार प्रकाश वर्षे म्हणजे, पृथ्वीपासून आपल्या आकाशगंगेच्या (मिल्की वे) मध्यभागी असलेल्या कृष्णविवराइतकाच आहे. या संशोधनात आयुकातील डॉ. एडमंड ख्रिश्चन हेरेन्झ, सौमिल मौलिक, टोकियो विद्यापीठातील हारुका कौसाकाबे यांचा सहभाग होता. या संशोधनाचा शोधनिबंध 'ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ जपान' या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झाला. पृथ्वीच्या सूर्यापेक्षा २५ ते १०० पट अधिक मोठ्या वस्तुमानाचे तारे फार काळ टिकत नाहीत. सुमारे तीन ते पाच दशलक्ष वर्षांनंतर त्यांचा स्फोट (सुपरनोव्हा) होऊन अफाट प्रमाणात पदार्थ अवकाशात फेकले जातात. पृथ्वीच्या आकाशगंगेतील (मिल्की वे) अशा सुपरनोव्हा स्फोटांची सरासरी वारंवारता सुमारे एका शतकात तीन वेळा असते. (वृत्तसंस्था)

### दहा हजार पट कमी वस्तुमान

पृथ्वीच्या आकाशगंगेचे वस्तुमान आणि आकारमान खूप मोठे असल्यामुळे या स्फोटांचा एकूण आंतरतारकीय वायूंच्या वितरणावर फारसा प्रभाव पडत नाही. मात्र, पृथ्वीच्या आकाशगंगेच्या तुलनेत दहा हजार पट कमी वस्तुमान असलेल्या दीर्घिकांमध्ये असाच सुपरनोव्हा स्फोटाचा दर अत्यंत परिणामकारक ठरतो. ताऱ्यांच्या स्फोटांमधून निघणारा उच्च वेगाचा वायू टिकू शकत नाही इतके अशा दीर्घिकांमध्ये गुरुत्वाकर्षण बल कमी असते. त्यामुळे उच्च वेगाचा वायू त्या दीर्घिकेबाहेर 'गॅलॅक्टिक विंड' किंवा दीर्घिकीय वारा म्हणून फेकला जातो.

### दीर्घिकीय वाऱ्यांमुळे निर्मिती

लहान दीर्घिकांच्या आजूबाजूला दीर्घिकीय वाऱ्यांमुळे तयार झालेले बुडबुडे गेल्या दोन दशकांपासून माहीत आहेत. मात्र, नव्याने आढळलेले बुडबुडे यापूर्वी पाहिल्या गेलेल्या बुडबुड्यांपेक्षा दुप्पट ते तिप्पट मोठे आहेत. त्यामुळे विश्वातील दीर्घिकांची निर्मिती, उत्क्रांती समजून घेण्यासाठी दीर्घिकीय वाऱ्याची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. मात्र, हे वारे नेमके कसे कार्य करतात, हे नीट समजून घेण्यासाठी अनेक लहान दीर्घिकांभोवतीच्या विरळ वायूंचे प्रत्यक्ष चित्रण करावे लागणार असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# ... ही तर नुसतीच 'हूल'?



दिवाळीचा सण आला की विशेषतः लहान मुलांमध्ये उत्साह ओसंडून वाहू लागतो. घरोघरी रांगोळ्या काढल्या जातात, पणत्या किंवा विजेच्या दिव्यांची रोषणाई होते, फराळाच्या पदार्थांची रेलचेल होते आणि सण सजून जातो. पण मुलांच्या दृष्टीने या सणाचा आनंद वेगळ्याच गोष्टीत दडलेला असतो. या सणाच्या निमित्ताने फटाक्यांची आतषबाजी अनुभवणे हा त्यांच्यासाठी अत्युच्च आनंदाचा सोहळा असतो. म्हणून मुलांना दिवाळी अधिक आवडते. सकाळी अभ्यंगस्नान वगैरे आटोपले की आपल्या वाटणीस आलेल्या फटाक्यांची खोकी उघडून त्यांचा धमाका उडविण्याचा कार्यक्रम आखण्यातला मुलांचा आनंद काही औरच असतो. दिवाळीच्या दिवसांतही अनेकदा पावसाळी वातावरण असल्याने काही फटाके मात्र, वाजतच नाहीत. एखादा ॲटम बॉम्ब घेऊन अंगणात जावे, त्याची वात पेटवावी आणि आता मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने स्वतःचेच कान घट्ट झाकून घ्यावेत, बराच वेळ झाला तरी अपेक्षित धमाका होऊच नये आणि ॲटम बॉम्बला लावलेली वात आतल्या दारूपर्यंत पोहोचण्याआधीच विझून गेलेली असावी, अशा वेळी होणारा हिरमोडही अनेकांनी लहानपणी अनुभवलेला असतो. असे न वाजलेले फटाके गोळा करून त्यांना दुसऱ्या फटाक्यांच्या वाती लावून पुन्हा वाजविण्याचा प्रयत्नही अनेकांनी केलेला असतो. एका फटाक्याला दुसरी वात लावून तो पुन्हा वाजविण्याचे तंत्र जमले की होणारा आनंद मूळ वातीच्या फटाक्यातून निघणाऱ्या आवाजाहूनही अधिक असतो. पण मोठ्या उत्साहाने पेटविलेल्या ॲटम बॉम्बची वातच विझून जावी आणि अपेक्षित आवाज येण्याआधीच स्वतःचेच कान घट्ट झाकून घेण्याची वेळ आल्यावर अनुभवावा लागणारा हिरमोड मात्र कायम लक्षात राहतो...

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना आता तसाच काहीसा अनुभव येत असावा. आपण ॲटम बॉम्बचा धमाका उडविणार असा गाजावाजा करत त्यांनी उभ्या पक्षाला कामाला लावले. एकच ॲटम बॉम्ब तयार करण्यासाठी त्यामध्ये फटाक्याची दारू भरण्याकरिता पक्षसंघटना कामाला लागली. त्यांच्या अपेक्षेनुसार एक ॲटम बॉम्ब तयारही झाला आणि मोठ्या उत्साहाने हा बॉम्ब हातात घेऊन ते मैदानात उतरले. दोन दिवसांपूर्वी, गुरुवारी जाहीर पत्रकार परिषद घेऊन माध्यमांच्या साक्षीने त्यांनी या ॲटम बॉम्बची वातदेखील पेटविली आणि आता मोठ्ठा धमाका होणार हे सांगत स्वतःचेच कान घट्ट झाकूनही घेतले. हे करताना ते अत्यंत गंभीर होते. आपण पेटविणार असलेल्या ॲटम बॉम्बच्या स्फोटात निवडणूक आयोग नावाच्या यंत्रणेची मोठी हानी होणार असे त्यांना खात्रीपूर्वक वाटतही होते. त्यामुळेच, निवडणुकांत झालेल्या मतांच्या चोरीचा मुद्दा अधोरेखित करत त्यांनी काही निरीक्षण माध्यमांसमोर मांडले, पण माध्यमांच्या काही प्रतिनिधीच्या चेहऱ्यावर मात्र त्यांना अपेक्षित असलेल्या गांभीर्याचा आवदेखील दिसत नव्हता. उलट, राहुल गांधींच्या काही कथित गौप्यस्फोटांनंतर काही प्रतिनिधी चक्क हसत होते. हे पाहून राहुल गांधींना थोडासा रागदेखील आला असावा. मोठ्या अपेक्षेने ॲटम बॉम्बची वात पेटवावी, हाताने कान घट्ट झाकून घ्यावे आणि बॉम्बची वात विझून गेल्याने आवाजही येऊच नये, असे झाल्यावर लहान मुलांना जे वाटते, तसेच काहीसे त्यांनाही झाले असावे. राहुल गांधी यांचा तो ॲटम बॉम्ब अपेक्षेप्रमाणे वाजला असता, तर निवडणूक आयोगासह सर्वांचेच धाबे दणाणले असते. पत्रकार परिषदेत माध्यमांसमोर केलेला हाच आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे स्वाक्षरी करून आयोगाकडे दाखल करा असे निवडणूक आयोगाचे आव्हान स्वीकारून या आरोपाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी त्यांनी गांभीर्याने पुढाकार घेतला असता, तर राहुल यांच्या अपेक्षेप्रमाणे निवडणूक आयोगाचे धाबे दणाणलेही असते. पण अद्याप तरी राहुल गांधी यांनी ते आव्हान स्वीकारलेले नाही. आपण संसदेत संविधानाची शपथ घेतलेली आहे, त्यामुळे पुन्हा शपथपत्र देण्याची गरज नाही असा हेका त्यांनी लावला आणि राहुल गांधी ज्या आवेशात आरोपांच्या माळा लावतात, तो आवेशच नंतर फुसका ठरतो हे पुन्हा एकदा दिसू लागल्याने त्यांचा हा नवा बॉम्बदेखील अगोदरच्या अनेक फुसक्या फटाक्यांप्रमाणेच निकामी ठरण्याचीच शक्यता जास्त आहे. याआधीही, २०१९ च्या निवडणुकीत मतचोरीचा फटका बसल्याचा कांगावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी केल्यावर, राहुल गांधींसमवेत चर्चा करण्याची तयारी दाखवून, निवडणूक आयोगाने त्यांना निमंत्रित केले होते, पण राहुल गांधींनी त्या बैठकीस हजर राहणे टाळले होते. आता प्रतिज्ञापत्राद्वारे आरोप दाखल करण्याचे आयोगाचे आव्हान स्वीकारले नाही तर माफी मागा असेही आयोगाने बजावले आहे. राहुल गांधी हे आव्हान स्वीकारतात, माफी मागतात की आपला जुनाच हेका सुरू ठेवतात हे स्पष्ट होईल तेव्हा त्यांच्या आजवरच्या बेफाम आरोपांप्रमाणेच या आरोपाचे पितळही उघडे पडते किंवा कसे ते स्पष्ट होईल.

राहुल गांधी यांची गुरुवारची पत्रकार परिषद ऐतिहासिक वगैरे ठरल्याच्या भावनेने काँग्रेसजनांत उत्साहाचे भरते आहे. ते साहजिकही आहे. पक्षश्रेष्ठींच्या सुरात सूर मिसळण्याच्या काँग्रेसी परंपरेस ते साजेसेही आहे. काँग्रेसमध्ये टिकून राहावयाचे असेल गांधी घराण्यासमोर गुडघे टेकावेच लागतात, हा पक्षातील अलिखित आणि बंधनकारक असा नियम असल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्यासारखा एखादा नेता त्यास अपवाद ठरण्याचा प्रयत्न करतो, पण पहिले शब्द हवेत विरण्याआधीच या नियमाचे पालन करण्याकरिता सिद्ध होतो, हेही अलिकडेच स्पष्ट झाले आहे. गेल्या महिन्याच्या अखेरीस, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी आणि काँग्रेसच्या तेलंगणाच्या प्रभारी मीनाक्षी नटराजन् यांच्यातील सुप्त संघर्षाला तोंड फुटले आणि रेड्डी यांनी राहुल गांधी यांचा थेट नामोल्लेख टाळून त्यांच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह उमटविले. पक्षाने मीनाक्षी नटराजन् यांच्या पदयात्रेचा कार्यक्रम ९ ऑगस्टपासून राज्यात आयोजित केला होता. पण गेल्या बुधवारी रेवंथ रेड्डींच्या निवासस्थानी मीनाक्षी नटराजन् यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत वादाच्या ठिणग्या उडाल्या आणि रेवंथ रेड्डी यांनी पक्षाच्या परंपरेची चौकट ओलांडून थेट पक्षश्रेष्ठींनाच आव्हान दिले. पक्षश्रेष्ठी आपल्याला गृहीत धरू शकत नाहीत आणि आपले निर्णय आमच्यावर लादू शकत नाहीत, असा थेट हल्लाच त्यांनी चढविला, तेव्हा हे थेट राहुल गांधींनाच आव्हान आहे, या जाणिवेने पक्षात अस्वस्थता माजली. आजवर कुणीच न केलेले धाडस रेवंथ रेड्डींना भोवणार अशी कुजबूजही पक्षात सुरू झाली, पण रेड्डींनी त्यालाही उत्तर दिले. आपल्या नेतृत्वावर पक्षश्रेष्ठी नाराज असतील तर त्यांनी खुशाल आपल्याऐवजी अन्य कोणास नियुक्त करावे असा पवित्रा त्यांनी घेतला. पक्षातून बाहेर पडणाऱ्या काही नेत्यांनी राहुल गांधींच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटविलीही असतील, पण पक्षात राहून पक्षश्रेष्ठींवर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या रेड्डींच्या या पवित्र्याने पक्षात खळबळ माजलेली असतानाच, निवडणूक आयोगाला दिलेल्या आव्हानाचा ॲटम बॉम्ब फुसका निघाला तर कसे होणार या भीतीने त्या अस्वस्थतेत नवी भर पडली आहे.

राहुल गांधी यांची अवस्था भ्रमविचारात गुरफटलेल्या मुन्नाभाई एमबीबीएसप्रमाणे झाली असल्याने सत्य स्वीकारण्याची त्यांची मानसिकता नाही, अशा शब्दांत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या त्या कथित ॲटम बॉम्ब पत्रकार परिषदेची खिल्ली उडविली आहे. महाराष्ट्रात २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांदरम्यानच्या पाच महिन्यांत पाच वर्षांहून अधिक मतदारांची नोंदणी झाली, अशा जुन्याच आरोपाचा सनसनाटी पुनरुच्चार राहुल गांधींनी गुरुवारच्या पत्रकार परिषदेत केला होता. फडणवीस यांनी एका जाहीर मुलाखतीत त्याचा पुन्हा एकदा खरपूस समाचार घेतला. गेल्या डिसेंबरातच निवडणूक आयोगाने या आरोपावर स्पष्ट उत्तर दिले होते. या कालावधीत ४० लाख मतदार वाढले, आणि नऊ लाख मतदार कमी झाले हे खरे आहे, पण फडणवीस यांनी मांडलेला मतदार नोंदणी प्रक्रियेचा तपशील ध्यानात घ्यावयास हवा. लोकसभा व विधानसभा निवडणुकांत मतदारांची नोंदणी नेहमीच वाढते, हा त्यांचा दावा सिद्ध करणारी आकडेवारी निवडणूक आयोगाच्या माहितीजालावर उपलब्ध आहे. २००९ मध्ये महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीत ७.२९ कोटी मतदारांची नोंदणी होती. विधानसभा निवडणुकीपर्यंत त्यामध्ये सुमारे २९ लाख मतदारांची भर पडल्याचे आयोगाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. २०१४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीदरम्यान सुमारे ४३ लाख मतदारांची भर पडली, २०१९ मध्ये याच कालावधीत सुमारे १३ लाखांची तर २०१४ मध्ये ४० लाखांची भर पडली होती. यापैकी २००९, २०१४ च्या निवडणुकांत काँग्रेस सत्तेवर होती, हा इतिहास टाळून राहुल गांधींनी गुरुवारची ॲटम बॉम्ब पत्रकार परिषद गाजविली. कदाचित त्यामुळेच, माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्या वेळी ही आकडेवारी हसण्यावारी नेली असावी. फडणवीस यांनी राहुल गांधींच्या या आरोपांच्या फैरींवर नोंदविलेला आक्षेप गंभीर आहे. या देशात शहरी नक्षलवाद फोफावला आहे आणि देशातील यंत्रणांच्या विरोधात लोकांच्या मनात अविश्वास पेरण्यासाठी शहरी नक्षलवाद कार्यरत असतो, असे फडणवीस म्हणाले आणि त्यांनी या प्रयत्नांच्या गंभीर परिणामांचा इशाराही दिला. अराजकवादी शक्ती देशातील यंत्रणा खिळखिळ्या करून लोकांच्या मनात या यंत्रणांविषयी अविश्वास पेरत असून अशा शक्तींना बळ देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत, असा थेट आरोप फडणवीस यांनी या मुलाखतीत केला. सत्ताधारी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जनमानसातील प्रतिमा हेच त्यांच्या लोकप्रियतेचे गमक असून मोदींचे प्रतिमाभंजन करणे हाच आपल्या पक्षाचा एककलमी कार्यक्रम राहील असे वक्तव्य २०१९ च्या निवडणुकीदरम्यान एकदा राहुल गांधींनी जाहीरपणे केले होते. आजही त्याच कार्यक्रमाचा पुढचा टप्पा गाठण्याची ही धडपड राहुल गांधींबरोबरच पक्षालाही अडचणीत आणणार या शंकेने काँग्रेसमधील अनेक नेत्यांमध्ये अस्वस्थता आहे, पण गांधी घराण्याच्या विरोधात थेट किंवा अप्रत्यक्षपणेदेखील बोलावयाचे नाही हा अलिखित नियम अनेकांच्या अस्वस्थतेला वाट करून देण्यात अडसर ठरत आहे.

ॲटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात मैदानात उतरायचे आणि ऐनवेळी बॉम्बच फुसका निघावा हा राहुल गांधीच्या बाबतीत काँग्रेसला येणारा हा काही पहिलाच अनुभव नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील राहुल गांधींच्या वक्तव्यांवरही न्यायालयाने राहुल गांधींना सज्जड समज दिली होती. यापुढे असे वक्तव्य केल्यास स्वतःहून त्याची दखल घेऊन कारवाई केली जाईल, असेही न्यायालयाने बजावले होते. मोदी आडनावावरून राहुल गांधी यांनी जाहीरपणे केलेल्या वक्तव्यावरही न्यायालयाने आक्षेप घेतला होता. सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेल्या व्यक्तीने अशी बेलगाम वक्तव्ये करताना सावध राहावयास हवे, अशा कानपिचक्याही त्यांना दिल्या होत्या. अगदी अलिकडेच, सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींची चांगलीच कानउघाडणी केली होती. चीनने भारताचा भूभाग गिळल्याचा बेछूट आरोप राहुल गांधी वारंवार करतच असतात. अनेकदा या भूभागाचे क्षेत्र त्यांच्या मनाप्रमाणे बदलतही असते. त्यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान गांधी यांनी भारतीय सैन्याबद्दल केलेल्या एका कथित वादग्रस्त टिप्पणीवरून लखनऊ न्यायालयातील कार्यवाहीस स्थगिती देण्याच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना कानपिचक्या दिल्यानंतर काँग्रेसची अवस्था केविलवाणी झाली होती. चीनने भारताचा भूभाग गिळल्याच्या आरोपाबाबत काही विश्वासार्ह पुरावे हाती नसताना बेजबाबदार वक्तव्ये कशी करता, असा स्पष्ट सवाल न्यायालयाने राहुल गांधींना केला आणि या आरोपाचा ॲटम बॉम्बदेखील फुसका ठरला.

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवारी, ८ ऑगस्ट रोजी प्रश्नोत्तराच्या कामकाजादरम्यान, चीनने भारताचा किती भूभाग अनधिकृतरीत्या बळकावला आहे आणि तो नेमका कोणत्या काळात बळकावला आहे याची अधिकृत माहिती सरकारकडून दिली गेली. १९६२ च्या युद्धात चीनने भारताचा किती भूभाग ताब्यात घेतला, याबाबत संसद सदस्य राव राजेंद्र सिंह यांनी विचारलेल्या प्रश्नावरील उत्तरात सरकारतर्फे दिल्या गेलेल्या माहितीनुसार, १९६२ च्या युद्धकाळात चीनने भारताच्या सुमारे ३८ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रावर अवैधपणे ताबा मिळविला आहे. चीनसोबतच्या सीमावादाचा तोडगा काढण्यासाठी गेल्या अनेक वर्षांत अनेकदा प्रयत्न झाले. जून १९८१ मध्ये चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या भारत भेटीदरम्यान या मुद्द्यावर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या डिसेंबर १९८८ मधील चीन भेटीदरम्यान वादग्रस्त सीमाप्रश्नावर तोडगा काढण्यासाठी द्विपक्षीय कृतिगट स्थापन करण्याचे उभय बाजूंनी जाहीर केले होते. त्यानंतर २००५ पर्यंत या कृतिगटाच्या तब्बल १५ बैठका झाल्या होत्या. अटलबिहारी वाजपेयी यांनी जून २००३ मध्ये चीनच्या अधिकृत दौऱ्यातही हा मुद्दा उचलून धरला होता व दोन्ही बाजूंच्या विशेष प्रतिनिधींनी यावरील तोडग्याचे मार्ग पडताळून सीमावाद संपुष्टात आणण्याच्या दिशेने पावले टाकावीत असेही ठरले होते. यासंदर्भातील अलिकडची अखेरची चर्चा बैठक १८ डिसेंबर २०२४ रोजी झाली होती, असे या उत्तरात स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे गलवान संघर्षादरम्यान चीनने भारताचा भूभाग बळकावल्याच्या राहुल गांधी यांच्या आरोपास कोणताही सबळ आधार नाही, हे सरकारच्या या उत्तरातून स्पष्ट झाले आहे.

सार्वजनिक मंचावर सनसनाटी आरोप करून सरकारविरुद्ध आणि सरकारी यंत्रणांविरुद्ध समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याची एक सूत्रबद्ध कार्यपद्धती कामाला लागलेली आहे आणि राहुल गांधी यांच्यासारख्या जबाबदार संवैधानिक पदावरील नेत्याच्या वक्तव्यातून त्यास बळ मिळते आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. अशा आरोपांतून राहुल गांधी यांच्या प्रतिमेभोवती गैरसमज आणि संशयाचे धुके पसरणार असून ते टाळावयाचे असेल तर सज्जड पुराव्यांसह जनतेसमोर जाणे योग्य ठरते. सरकार आणि स्वायत्त संस्थांच्या विरोधातील आरोपांची शहानिशा करण्याची एक विहित कार्यपद्धती असते. संविधानाने त्या कार्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संविधानाची हमी देत या कार्यपद्धतीस नाकारून राहुल गांधी बेछूट वक्तव्ये करत असतील, तर त्यातील गांभीर्य नाहीसे होईल व राहुल म्हणजे केवळ हूल आहे, असाच लोकांचा समज दृढ होत जाईल. असे होऊ नये सासाठी काँग्रेसने काळजी घ्यायला हवी.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### उपेक्षितांच्या सन्मानाचा 'भटके विमुक्त दिवस'

१८७१ साली ब्रिटिश शासनाने लागू केलेल्या क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट या अमानवी कायद्याने काही विशिष्ट जातींना गुन्हेगार जाती म्हणून घोषित केले. हा काळा कायदा भारतातील अनेक समुदायांच्या इतिहासातील एक वेदनादायक अध्याय होता. या कायद्यामुळे या जातींमधील हजारो समाजबांधवांना स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात अमानुष अत्याचार सहन करावे लागले, त्यांच्या मूलभूत मानवी हक्कांवर गदा आणली गेली आणि त्यांना सातत्याने उपेक्षा व भेदभावाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर असलेला जन्मजात गुन्हेगार हा शिक्का त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला होता, ज्यामुळे त्यांना समाजात सन्मानाने जगणेही दुरापास्त झाले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही या समाजाला मुख्य प्रवाहात येण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. त्यांना न्याय मिळण्यास विलंब झाला आणि त्याचे दीर्घकालीन सामाजिक परिणाम या समाजाला भोगावे लागले. पिढ्यान्‌पिढ्या त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण सहन करावे लागले. ही एक अशी व्यथा होती जी स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरही त्यांना ग्रासत होती. परंतु, स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांचे फलित म्हणून, ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट हा काळा कायदा रद्द करण्यात आला. हा केवळ एक कायद्यातील बदल नव्हता, तर ते एका मोठ्या सामाजिक बदलाचे प्रतीक होते. या कायद्यातून मुक्त झालेल्या जातींना 'विमुक्त जाती' (म्हणजे मुक्त झालेल्या) म्हणून घोषित करण्यात आले. हा दिवस त्यांच्यासाठी एक नवी पहाट घेऊन आला, एक अशी पहाट जिथे त्यांना गुन्हेगार म्हणून नव्हे तर समाजाचे अविभाज्य घटक म्हणून ओळख मिळाली.भटके आणि विमुक्त समाज महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीमध्ये नेहमीच आपले योगदान देत आले आहेत. त्यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान असो किंवा राष्ट्र उभारणीतील सक्रिय सहभाग असो, त्यांनी आपल्या क्षमता आणि कर्तृत्वाने वेळोवेळी हे सिद्ध केले आहे की ते समाजाचा एक महत्त्वाचा आणि रचनात्मक भाग आहेत. त्यांच्या अदम्य जिद्दीने, कलेने, परिश्रमाने आणि सामाजिक सलोख्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेणे अत्यंत आवश्यक होते. त्यांच्या या योगदानाला योग्य तो सन्मान मिळावा, त्यांच्यावरील ऐतिहासिक अन्यायाची दखल घेतली जावी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक प्रेरणा मिळावी या उद्देशाने गेली पस्तीस वर्षे विविध संघटनांच्या माध्यमातून एक लढाच उभारला गेला होता.

भटके विमुक्त विकास परिषद, भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, अखिल भारतीय घुमंतु, अर्ध घुमंतू विकास परिषद यांचे मोलाचे प्रयत्न सुरु आहेत.

भटके आणि विमुक्त समाजबांधवांसाठी प्रामुख्याने कार्य करणारे, पद्मश्री दादा ईदाते, पद्मश्री गिरीश प्रभुणे, श्री रेणके, उद्धवराव काळे, डॉ. संजय पुरी, सुनील पवार यासारख्या अनेक कार्यकर्त्यांचे प्रयत्न सार्थकी लागलेत. 'भटके विमुक्त दिवस' साजरा करण्याच्या या ऐतिहासिक पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास अधिकृत मान्यता केली आहे. हा शासन निर्णय केवळ एका दिवसाची घोषणा नाही, तर भटक्या विमुक्त समाजाच्या गौरवशाली इतिहासाला, त्यांच्या संघर्षाला आणि राष्ट्र उभारणीतील त्यांच्या योगदानाला दिलेली एक आदरांजली आहे.

महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय भटक्या विमुक्त समाजाला सन्मान देण्यासाठी, त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. 'भटके विमुक्त दिवस' हा केवळ एक उत्सव न राहता, तो सामाजिक समानतेचे, न्यायाचे आणि सौहार्दाचे प्रतीक बनावे हीच अपेक्षा! 'सब समाज को लिये साथ में, आगे हैं बढते जाना।' या गीताच्या ओळी यथार्थ ठरविणारे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रिद्वय आणि संबंधिताचे खूप खूप आभार.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

### ब्रह्म ऐक्याची उधळण घेऊन श्रींची पालखी परतली



सण दिवाळीचा आला। नामा राऊळाशी गेला।
हाती धरोनी देवाशी। चला जावुया आपल्या घराशी।

संत नामदेव मंदिरात गेले आणि पांडुरंगाला हाताशी धरून घरी घेऊन आले त्यावेळी त्यांनी विठ्ठलाला वरील अभंगात आग्रहाची विनवणी केली तशीच अवस्था गजानन माउलींच्या पंढरीच्या वारी निमित्ताने दोन महिन्यांच्या विरहाच्या विवंचनेने शेगावचा भक्त गजाननाला हाताशी धरून आपल्या घरी आणतो.

आनंदाची दिवाळी। घरी बोलवा भक्तमंडळी।
घालीते मी रांगोळी गजानन माऊली॥

आषाढीला पायीवारी करत गेलेल्या संत गजाननाच्या पालखीचे शुक्रवारी दोन महिन्यांनंतर संत नगरी शेगावमध्ये आगमन झाले. तेव्हा गेल्या ५६ वर्षांत चार पिढ्यांच्या मनामनातील ज्या भक्तिभावनांचा कल्लोळ होतो, तसाच आजही अत्यानंदाच्या भावना महाराजांच्या शेगावी परत येताना उचंबळून येत होत्या. ब्रह्म ऐक्याचा विराट लोकोत्सव थेट रजत नगरी खामगावला ते संत नगरी शेगाव या वीस किलोमीटरच्या परीघात दृष्टीस पडला जणू संपूर्ण सृष्टीतील प्राणिमात्रांच्या सद्भावना घेऊन पांडुरंगाचे भक्त गजाननाच्या रूपात एकत्रित होऊन तुझ्यात आम्ही आमच्यात तू असा प्रचंड एकात्मतेचा संदेश देऊ न गेला.

तूच आमचा आत्मा! तूच आमचा प्राण! तूच सखा, तूच दाता!

अशा सर्व आध्यात्मिक धर्मग्रंथांचा एकत्रित गोपालकाला म्हणजे संत गजाननाच्या पंढरी वारीचा संत नगरीत आगमनाचा समारोपीय सोहळा असतो.

रात्रीपासूनच आपल्या प्रिय गजानन माउलीला आपल्या घरी आणण्यासाठी शेगावीचा भक्त खामगावपर्यंत जाऊन पोहोचला व पहाटे चार वाजता आपल्या संतनगरी शेगावच्या मालकाला हात धरून विनवणी करून अट्टहासाने आग्रह करून शेगाव नगरीकडे निघाला. प्रचंड महापूर खामगाव ते शेगाव या रस्त्यावर भक्तांचा दिसला. मनामनात लाखोंच्या श्वासाश्वासात एकच हरिनाम गण गण गणात बोते हेच होते श्रावणाच्या अतिशय मन प्रसन्न करणाऱ्या नैसर्गिक वातावरणात निसर्गाने उधळण केलेल्या हिरव्यागार शेतांच्या मधून ही पालखी वारी आपल्या अंतिम टप्प्याकडे म्हणजेच संत नगरीकडे हळूहळू मार्गस्थ झाली आणि एका अत्यंत भक्तिमय वातावरणाची निर्मिती करून गेली.

दुपारी बाराच्या सुमारास पालखीचे आगमन संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या द्वारासमोर झाले. या ठिकाणी सर्व शेगाववासीयांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी हळूहळू भगवंताचा गजर करत वाटिकेजवळ आली. या ठिकाणी संत गजानन महाराज संस्थान शेगावचे व्यवस्थापकीय विश्वस्त व सर्व मान्यवरांनी संत गजानन महाराजांच्या पालखीचे भागवत धर्म प्रथेप्रमाणे स्वागत केले. ही पालखी हळूहळू मेन रोडने संत गजानन महाराज मंदिरात सायंकाळी सहा वाजता पोचली. या ठिकाणी टाळकरी भक्तांनी अत्यंत देखणी अशी पाऊले खेळून आनंद व्यक्त केला व गजानन महाराजांचा प्रचंड जयघोष करत महाआरती होऊन या दोन महिन्यांच्या सतत रात्रंदिवस मजल दरमजल करत पंढरीला पायी वारी गेलेल्या व पायीच परत आलेल्या पालखीचा आषाढी सोहळा अत्यंत सुखद पद्धतीने पूर्ण झाला.

**नंदू कुळकर्णी**/९४०५७७९१४०

### अमेरिकेच्या टॅरिफ धोरणास भारताचा विरोध

सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत-अमेरिका यांच्यात जे व्यापारयुद्ध भडकले आहे त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका पूर्णतः देशहिताच्या बाजूने आहे. मुळात रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या भारताच्या धोरणामुळेच ट्रम्प नाराज आहेत. जागतिक व्यापारात आपले महत्त्व, आपला एकाधिकार कमी होऊ नये म्हणून अमेरिकेचा हा जळफळाट होतोय. रशिया हा भारताचा जुना आणि विश्वासू मित्र राहिला आहे. इतिहासाची पाने चाळल्यास भारतासोबत सच्ची मैत्री जोपासणारे राष्ट्र म्हणून रशियाचे नाव घ्यावे लागेल. सर्वप्रथम देशहित हीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका राहिली आहे. रशियासोबतचे व्यापारसंबंध भारताच्या विकासासाठी अनुकूल आहेत त्यामुळे अमेरिकेच्या दबावासमोर देशहिताशी प्रतारणा होणार नाही ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्पष्ट भूमिका आहे. ट्रम्पद्वारे आधी २५ टक्के कर आकारणी केल्यानंतर भारत झुकायला तयार नाही असे दिसताच अतिरिक्त २५ टक्के म्हणजे एकूण ५० टक्के टॅरिफ भारतावर लादला जातोय. आता तर भारताने अमेरिकेला चक्क ठेंगा दाखवलाय.

खरं तर ज्या टॅरिफची दहशत निर्माण करून आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेचा दबदबा निर्माण करण्याचा ट्रम्प यांचा जो प्रयत्न आहे तो आज जरी त्यांना सुखावत असला तरी दीर्घकालीन विचार करता अमेरिकेस तो नुकसानदायी ठरू शकतो. १४० कोटी लोकसंख्या असलेला भारत हा एक विशाल देश आहे, मोठी बाजारपेठ आहे आणि ही एवढी मोठी बाजारपेठ दुर्लक्षित करून चालणार नाही. या व्यापारयुद्धाच्या निमित्ताने महाशक्तीसमोर न झुकणाऱ्या स्वाभिमानी, स्वावलंबी भारताने अमेरिकेस ठेंगा दाखवत संपूर्ण जगास एकप्रकारे संदेशच दिलाय की, देशहितासाठी रशिया सोबतची ही दोस्ती तुटायची नाय...

**अखिल देशपांडे**/अकोला

# ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफचा भारतावर परिणाम : भारत-रशिया-चीन समीकरणाची शक्यता?

## प्रासंगिक

**समाधान वाघमारे**

डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयात कर (टॅरिफ) लादण्याची घोषणा केली, ज्यामुळे एकूण टॅरिफ ५०% झाला आहे. हा निर्णय भारताच्या रशियन तेल खरेदीमुळे घेण्यात आला आहे, ज्याला ट्रम्प यांनी अमेरिकेच्या हिताविरुद्ध म्हटले आहे. या टॅरिफमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर, विशेषतः औषधे, कापड आणि रत्न-दागिने यासारख्या निर्यातीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. याचबरोबर, यामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील आर्थिक आणि रणनीतिक संबंधांवरही परिणाम होऊ शकतो. पण यामुळे खरंच या तिन्ही देशांमध्ये एक ठोस त्रिपक्षीय समीकरण तयार होईल का? याचा आढावा घेऊया.

### टॅरिफचा आर्थिक परिणाम

भारताने २०२४ मध्ये अमेरिकेला ६३.५ अब्ज किमतीचा माल निर्यात केला, ज्यामध्ये औषधे, कापड, रत्न-दागिने आणि यंत्रसामग्री यांचा समावेश आहे. ५०% टॅरिफमुळे या निर्यातीची किंमत वाढेल, ज्यामुळे भारतीय उत्पादने अमेरिकन बाजारपेठेत स्पर्धात्मकता गमावू शकतात. यामुळे भारताला पर्यायी बाजारपेठा शोधाव्या लागतील, जसे की युरोप, आशिया किंवा रशिया. भारत सरकारने या टॅरिफला अन्याय्य आणि अवाजवी म्हटले असून, राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी पावले उचलण्याची घोषणा केली आहे. यामध्ये परस्पर टॅरिफ लादणे किंवा विश्व व्यापार संघटनेत तक्रार दाखल करणे यांचा समावेश असू शकतो.

### भारत-रशिया-चीनः संभाव्य सहकार्य

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारताला रशिया आणि चीन यांच्याशी व्यापारी संबंध बळकट करण्याची संधी मिळू शकते. भारत आणि रशिया यांच्यात आधीच मजबूत संबंध आहेत, विशेषतः संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रात. रशियाकडून स्वस्त दरात तेल खरेदीमुळे भारताला ऊर्जा सुरक्षेत फायदा झाला आहे. युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्य देशांनी लादलेल्या निर्बंधांमुळे रशियाला भारत आणि चीन यांसारख्या देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. दुसरीकडे, भारत आणि चीन यांच्यात सीमावाद आणि भू-राजकीय तणाव असले तरी, BRICS आणि SCO सारख्या व्यासपीठांवर ते एकत्र काम करतात. ट्रम्प यांनी चीनवर फक्त ३०% टॅरिफ लादला आहे, जो भारतावरील टॅरिफपेक्षा कमी आहे. यामुळे भारताला असे वाटू शकते की त्याला जास्त लक्ष्य केले जात आहे, ज्यामुळे तो रशिया आणि चीन यांच्याशी जवळीक साधण्याचा विचार करू शकतो.

BRICS व्यासपीठावर भारत, रशिया आणि चीन यांच्यात व्यापारी सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, भारत रशियाकडून तेल खरेदी वाढवू शकतो आणि चीनसोबत व्यापारी करार करू शकतो. रशियाला भारत आणि चीन यांना एकत्र आणण्यात रस आहे, कारण यामुळे पाश्चात्य दबावाला तोंड देण्यासाठी एक मजबूत आर्थिक गट तयार होऊ शकतो.

### समीकरणाच्या मर्यादा

तरीही, भारत-रशिया-चीन यांच्यात ठोस युती होण्यास अनेक अडथळे आहेत. पहिले म्हणजे, भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद (उदा. लडाखमधील तणाव) आणि व्यापारी स्पर्धा यामुळे दीर्घकालीन युती अवघड आहे. दुसरे, भारत बहुध्रुवीय धोरण (multi-alignment) अवलंबतो, ज्यामध्ये तो अमेरिका, रशिया, युरोप आणि इतर देशांशी संतुलित संबंध ठेवतो. अमेरिकेशी भारताची रणनीतिक भागीदारी, विशेषतः क्वाड (Quad) आणि संरक्षण क्षेत्रात, खूप महत्त्वाची आहे. त्यामुळे भारत पूर्णपणे रशिया-चीन युतीकडे झुकण्याची शक्यता कमी आहे.

### भारताची रणनीती

भारताला या टॅरिफच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी बहुआयामी रणनीती अवलंबावी लागेल. पहिल्यांदा, भारत अमेरिकेशी व्यापारी कराराद्वारे हा तणाव कमी करण्याचा प्रयत्न करू शकतो. दुसरे, भारत रशिया आणि इतर देशांसोबत व्यापार वाढवू शकतो, विशेषतः ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रात. तिसरे, भारत युरोप आणि आशियाई देशांसारख्या पर्यायी बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करू शकतो. भारताने स्वतःची रणनीतिक स्वायत्तता कायम ठेवली आहे आणि भविष्यातही ती कायम ठेवण्याची शक्यता आहे.

### निष्कर्ष

ट्रम्प यांच्या ५०% टॅरिफमुळे भारताला आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागेल, परंतु यामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील व्यापारी सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. तरीही, भारत-चीनमधील तणाव आणि भारताची बहुध्रुवीय धोरणे यामुळे एक ठोस त्रिपक्षीय समीकरण तयार होण्याची शक्यता कमी आहे. भारत आपली रणनीतिक स्वायत्तता कायम ठेवत, अमेरिकेशी चर्चा करत आणि पर्यायी बाजारपेठा शोधत या संकटावर मात करण्याचा प्रयत्न करेल. या घडामोडींमुळे जागतिक व्यापार आणि भू-राजनीतीत नवे बदल घडू शकतात, ज्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रक्षाबंधन; नारी सुरक्षा पर्व

भारतीय संस्कृतीत प्रमुख सणामध्ये रक्षाबंधन हा सण भाऊ-बहिणीचा स्नेह व उत्सवाचे पर्व म्हणून साजरा केला जातो. देशभरात या सणाची वेगवेगळ्या नावाने ओळख आहे. उत्तर भारतात कजरी-पौर्णिमा, पश्चिम भारतातात नारळी पौर्णिमा या नावाने तो साजरा केला जातो. रक्षाबंधन हा संपूर्ण भारतात साजरे होते. इतर सणांपेक्षा हा एक आगळा वेगळा उत्सव आहे. जो उत्सव आपल्यासोबत अखंड प्रेम, उत्साह, स्नेहभाव, संबंधामध्ये मधुरता आणि पावित्र्य घेऊन येतो. या सणाची प्राचीन काळापासून अशी समजूत आहे की, बहीण ही आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्याकडे, प्रत्येक बिकट परिस्थितीत येणाऱ्या समस्यांच्या वेळी मदतीची आणि सहानुभूतीची आशा ठेवते आणि जीवनात कधीही जर बहिणीच्या अब्रूवर किंवा तिच्या जीवनात काहीही संकटे आली तर त्यावेळी तो तिच्यासोबत खंबीरपणे उभा राहील. म्हणूनच तर या उत्सवाचे नाव 'रक्षाबंधन' असे आहे. आपणा सर्वांना माहितीच आहे की, श्रावणी पौर्णिमेच्या या दिवशी बहीण ही आपल्या लाडक्या भावाला राखी बांधते. या दिवशी प्रत्येक बहिणीच्या मनात आपल्या प्रिय भावाबद्दल शुभभावना आणि शुभकामना याचा जणू सागरच उसळत असतो. या वातावरणात सगळीकडे प्रसन्नता आणि प्रफुल्लितपणा जाणवत असतो. सर्वांचे चेहरे आनंदाने चमकत असतात. या उत्सवामुळे जरी भावा-बहिणीमध्ये काही मतभेद झाले असले तरीही या दिवशी सगळी दुःखे, भांडणे विसरून भाऊ-बहीण पुन्हा एकत्र यावे. भारतीय संस्कृतीमधील ही काही क्षणांची परंपरा लहानपणापासूनच एक भाऊ आणि बहीण यांना एका निरागस बंधनामध्ये घट्ट बांधून ठेवते आणि त्यांच हे नातं अतूट आणि परम पवित्र मानले जाते. आजचे आधुनिक तांत्रिक युग आणि माहिती संवादाच्या युगाचा राखीसारख्या सणांवरही परिणाम झाला आहे. आजकाल बरेच भारतीय परदेशात किंवा देशातील अन्यत्र भागांत राहतात आणि त्यांचे कुटुंबीय (भाऊ आणि बहीण) अजूनही भारतात किंवा इतर देशांमध्ये आहेत. इंटरनेटच्या आगमनानंतर, अनेक ई-कॉमर्स साईट उघडल्या आहेत, ज्या ऑनलाईन ऑर्डर घेतात आणि दिलेल्या पत्त्यावर पोहोचवतात. अशाप्रकारे, आजच्या आधुनिक विकासामुळे, दूरवर राहणारे बंधू आणि भगिनी, ज्यांना राखीवर भेटता येत नाही, त्यांनी आधुनिक पद्धतीने एकमेकांना पाहून आणि बोलून हा सण साजरा करतात.

**पवनकुमार लड्ढा**/९४२१४९४८१२

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# व्यवसायातून महिलांनी लखपती दीदी बनावे

- जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम
- १४ कोटींचे कर्ज वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिलांनी वेगवेगळे व्यवसाय करून लखपती होण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.



ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर,उत्तर सोलापूर पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे,जिल्हा व्यवस्थापक राहुल जाधव, अनिता माने, संतोष डोंबे, दयानंद सरवळे, शितल म्हंता, पूनम दुध्याळ, शिवाजी वाघमारे, सादिक शेख, दिगंबर साळुंखे, चंद्रकला कणकी, पोपट चौधरी इ. उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यात उमेद अभियान अंतर्गत १४ कोटी रुपये एका क्लिकवर वाटप करण्यात आले असून त्या निधीतून महिलांनी वेगवेगळे व्यवसाय उभे करून आर्थिक सक्षम होवून लखपती दिदी व्हावे. महिलानी नावीन्यपूर्ण व्यवसाय करून आपली वेगळी ओळख निर्माण करावी व स्वतःचा, कुटुंबाचा विकास करावा असे आवाहन कुलदीप जंगम यांनी केले. प्रास्ताविक प्रमोद चिंचुरे यांनी तर आभार प्रदर्शन राहूल जाधव यांनी केले.

## महत्वाचे...



## अनुसूचित जाती मोर्चाकडून भाजपा प्रदेशाध्यक्षांचा सत्कार

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रविंद्र चव्हाण यांचा मुंबई दादर येथे भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, दक्षिण सोलापूर तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष नितीन रणखांबे, आदिनाथ खरात, विजयकुमार कडचे, महादेव माने तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते. सत्कार सोहळ्यात पक्ष संघटन मजबुती, कार्यकर्त्यांचे मनोबल वृद्धिंगत करणे आणि समाजातील विविध घटकांशी सलोखा वाढविण्याबाबत चर्चा झाली. याप्रसंगी रविंद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा आणि विकासाभिमुख कार्य अधिक जोमाने राबविण्याचे आवाहन केले.




## केगावमध्ये सर्वंकष लैंगिकता शिक्षणावरील दोन दिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

केगाव (ता.उत्तर सोलापूर) येथील स. म. शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय येथे प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वंकष लैंगिकता शिक्षण या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, एफपीआयचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, अध्यक्ष प्रा. डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांच्या मार्गदर्शनखाली फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे कार्यक्रम अधिकारी विरेंद्र परदेशी, सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे, स्वप्निल सोनवणे आणि विकी शिवशरण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इ. ५ वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत किशोरावस्था, वैयक्तिक स्वच्छता, किशोरवयातील आहार, एचआयव्ही/एड्स, मासिक पाळी, बालशोषण प्रतिबंध, जीवनकौशल्ये, वयात येतानाचे शारीरिक व मानसिक बदल, तसेच गुड टच - बॅड टच या महत्त्वाच्या विषयांवर पी. पी. टी. च्या सहाय्याने मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सायबर क्राईम विषयावर सोलापूर ग्रामीण सायबर क्राईम विभागाचे स्वप्निल पवार आणि प्रकाश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.



## निसर्ग लोकसंचलित साधन केंद्राची वार्षिक सभा उत्साहात

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत निसर्ग लोकसंचलित साधन केंद्र मंद्रूपची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत व विविध कार्यक्रमाने संपन्न झाली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाइ फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी साधन केंद्राच्या अध्यक्षा लक्ष्मीबाइ गायकवाड, जिल्हा समन्वय अधिकारी मन्सूर पटेल, दीपक टेकाळे. बँक ऑफ इंडीया मंद्रूप शाखेचे व्यवस्थापक सिद्धाराम खट्टे, कंदलगावचे व्यवस्थापक भिमाशंकर भिसे, सोलापूरचे योगेश पाटील, अशोक कणगी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मआविमच्या सहायक जिल्हा समन्वय अधिकारी यांनी बचत गट व ग्राम संस्थेच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले. बँक ऑफ इंडीयाच्या अधिकाऱ्यांनी बचत गट कर्ज , परतफेड , व्यावसायिक कर्ज व सिबील स्कोर याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी बचत गटाच्या महिलांना कर्ज वाटप करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्थेच्या व्यवस्थापिका रेखा कदम यांनी केले. तर कांबळे यांनी आभार मानले.

## लंम्पी बाधीत जनावरांच्या उपचारासाठी विलगीकरण कक्षाची सोय

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

मोकाट फिरणाऱ्या लंम्पी बाधित मोकाट व बेवारस गोवंशासाठी महापालिका व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमानाने विलगिकरण कक्षाची सोय करण्यात येत आहे. पशु कल्याण अधिकारी व जिल्हाप्राणी क्लेश प्रतिबंधित समिती सदस्य केतन शहा यांनी गोवंशाना सध्या लंम्पी या जीवघेण्या संसर्गजन्य रोगाची लागण होत आहे त्या करिता लंम्पी बाधित गोवंशा साठी उपचार व देखभाली साठी तातडीने लस मागवाव्यात व विलगीकरण कक्षाची सोय करावी असे पत्र जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी व पशुसंवर्धन उपायुक्त यांना देण्यात आले होते. त्या पत्राची तात्काळ दखल घेऊन जिल्हासाठी दिड लाख लसी या पशुसंवर्धन उपयुक्त यांनी मागवून घेतल्या असून, आयुक्त डॉ सचिन ओंबसे यांची पशुसंवर्धन उपायुक्त डॉ विशाल येवले व महापालिका अधिकारी सतीश चौगुले व केतन शहा यांनी कोंडवाड्या भेट घेऊन पाहणी केली. सिव्हिल हॉस्पिटल समोरील कोंडवाड्यात विलगिकरण कक्ष ताबडतोब उभा करावा असा आदेश सोमपा आयुक्त यांनी काढला व सतीश चौगुले यांची नेमणूक केली. गोवंशा साठी उपचार व चारा पाणी ची व्यवस्था करण्याचे आदेश दिले. शहर हद्दीत कोणालाही लंम्पीबाधित गोवंश दिसल्यास त्वरित डॉ गिड्डे यांच्या ९३०९१३१६४७ या मोबाईलवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.



## देवदर्शनामुळे मनाला आध्यात्मिक सुख

- डॉ. पृथ्वीराज माने;
- गुळवंची येथील १६५ महिलांना देवदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्रावणमास निमित्त महिलांना देवदर्शन घडवून आणण्याचा उपक्रम राबवत असल्याचे सिध्दनाथ साखर कारखान्याचे उपाध्यक्ष डॉ.पृथ्वीराज माने यांनी कौतुक केले.

गुळवंची गावचे सरपंच तथा मा.पृथ्वीराज माने युवा मंचचे अध्यक्ष सुनिल जाधव यांनी तीन एस.टी. बस करुन देवदर्शन ट्रिपचे आयोजन केले यावेळी बसेसची पुजा करताना डॉ माने बोलत होते.यावेळी सरपंच सुनिल जाधव, सोसायटी चेअरमन शहाजी भोसले उपस्थित होते. सुनिल जाधव यांनी गुळवंची येथील १६५ महिलांना यमाई मंदीर,मानकेश्वर, तुळजाभवानी, येडाई, रामलिंग, भगवंत व धाकटी पंढरी म्हणून ख्याती असलेल्या धामणगाव येथील बोधले महाराज मंदीरात दर्शनाचा योग घडवून आणला हे आध्यात्मिक समाधान आपल्या कामात देखील आनंद निर्माण करते, असे डॉ. पृथ्वीराज माने यांनी सांगितलेफ यावेळी उपसरपंच जयश्री तांबे, माजी सरपंच अश्विनी जाधव, माजी उपसरपंच सुनंदा शिंदे, विजया बोराडे, उज्वला भोसले, कालींदा कोरके, वैशाली शिंदे, अनुराधा नवगिरे, सुरेखा गडदे, आशा जगताप, ज्योती गिलबिले, सविता कोरके, कोमल जाधव, दिपाली नवगिरे, कमल शिंदे, राधा वीर उपस्थित होते.

## कारसाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

माहेरहून कार आण म्हणून विवाहितेचा छळ केला या प्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीसांत गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत फिर्यादी ज्योती अर्जुन चेंडके (वय ३२ रा. आकाश घर नंबर ३८ बार्शी रोड, बाळे, सोलापूर) फिर्या दिली असून पती अर्जुन चेंडके, सासू नंदा चेंडके, दीर धनंजय चेंडके जाऊ जयश्री व दीर अंकुश चेंडके (सर्व रा. वारे चाळ मुंब्रा जिल्हा ठाणे) यांचा गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.फिर्यादी ज्योती चेंडके हिचा अर्जुन चेंडके याच्याशी विवाह झाला .लग्नानंतर ती २७ जुलै २०२४ रोजी नांदण्यासाठी सासरी गेली. त्यानंतर संशयतांनी तू खेड्यातील आहेस .काळी व नटकी आहेस तुझ्या माहेरच्या लोकांनी आम्हाला लग्नात अपेक्षेप्रमाणे सोने-नाणे दिले नाही. चांगला हुंडाही दिला नाही. सोन्या-चांदीचे दागिने ही घातले नाहीत. त्यामुळे तू तुझ्या भावाकडून कार घेऊ नये अन्यथा तुला नांदवणार नाही असे म्हटले तसेच पती अर्जुन याने तू जर माझ्यासोबत आली तर तुला गाडी खाली ढकलून देईन अशी दमदाटी केली तसेच वेळोवेळी शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक छळ केला. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



## ऑगस्ट क्रांती दिन म्हणजे स्वातंत्र्याची नवी पहाट: सुधीर खरटमल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त बलिदान चौक, तुळजापुरवेस येथे देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतीस उजाळा देणाऱ्या स्तंभास शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पार्क चौक येथील चार हुतात्मा यांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, महिला प्रदेश सरचिटणीस सिया मुलानी, महिला उपाध्यक्षा मोनिका सरकार, शहर उपाध्यक्ष विजय भोईटे, प्रमोद भवाळ, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष संजय जाबा, प्रदेश सचिव सोशल मीडिया विभाग मिलिंद गोरे, युवती शहराध्यक्षा प्रतिक्षा चव्हाण, कार्याध्यक्षा सुप्रिया लोमटे, सांस्कृतिक विभाग शहराध्यक्ष राकेश सोनी, व्ही.जे.एन.टी. अध्यक्ष मोहम्मद इंडीकर, कार्याध्यक्ष अक्षय जाधव, ओबीसी विभाग शहराध्यक्ष बिरप्पा बंडगर, विद्यार्थी संघटनेचे शहराध्यक्ष निशांत सावळे, वैद्यकीय विभाग शहराध्यक्ष व्ही.डी. गायकवाड, शहर सरचिटणीस अशोक कोळेकर, ज्ञानेश्वर सोनवणे, रामप्रसाद शागालोलू, सोपान खांडेकर, संदीप साळुंखे, सूर्यकांत शिवशरण व सोशल मीडिया शहराध्यक्ष शक्ती कटकधोंड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या तत्परतेमुळे मयुरेशला नवजीवन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

विडी घरकुल भागातील रहिवासी अंबादास बिच्छल यांचा मुलगा, आठ वर्षीय मयुरेश याच्या हृदयास असलेल्या छिद्राच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची मोलाची मदत झाली. राजधानी मुंबईतील एका नामवंत रूग्णालयात बुधवारी, ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडलीय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या तत्परतेमुळे मयुरेशला नवजीवन मिळाल्याने अंबादास बिछल यांनी सर्वांचं आभार मानलं आहे.



सोलापुरातील विडी घरकुल परिसरात अंबादास बिच्छल, चहाची विक्री करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ भागवत आले आहेत. अंबादास यांच्या दोन अपत्यापैकी आठ वर्षीय मयुरेश शिंदे प्रशालेचा विद्यार्थी आहे. त्याच्या छातीत त्रास जाणवू लागल्यावर झालेल्या वैद्यकीय चाचण्यात त्याच्या हृदयास छिद्र असल्याचे निदान झाले होते. डॉक्टरांनी त्यासाठी औषधोपचाराचा खर्च म्हणून जवळपास दोन लाख रुपयांचा खर्च होण्याचा अंदाज वर्तवला होता.मुलाच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी डॉक्टरांनी औषधोपचारासाठी सांगितलेला खर्च हा त्यांच्यासाठी मोठा होता. अंबादास बिच्छल यांनी मुलाच्या हृदयास छिद्र असल्याची समस्या रूग्णसेवक आनंद गोसकी यांना कळविली. गोसकी यांनी मुंबईतील एका मोठ्या हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी संबधित हॉस्पीटल प्रशासनास कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने धर्मादाय व आरोग्य योजनेच्या माध्यमातून दोन लाख रूपयांचे उपचार मोफत करण्यासाठी हॉस्पीटलचे अंकित श्रीमाळी यांना विनंती केली. त्यांनी तात्काळ होकार देत पुर्णपणे उपचार मोफत करण्यात येईल, असे सांगून रूग्णांला दोन दिवसात हृदयाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, सोलापूरचे आनंद गोसकी यांच्यामुळे आमच्या मुलाचे जीव वाचले असल्याचे वडील अंबादास यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहाय्यता कक्षाचा संवेदनशीलपणा या ठिकाणी मला अनुभवास आला. हॉस्पीटलकडून खूप उत्तमरित्या मुलाचे ऑपरेशन झाल्याबद्दल त्यांनी हॉस्पीटलचंही आभार व्यक्त केले.

## घराघरावर तिरंगा फडकवावा : आयुक्त डॉ. ओम्बासे

- महापालिकेच्या वतीने हर घर तिरंगा अभियान
- सात ठिकाणी तिरंगा प्रदर्शनास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदराची भावना दृढ करणे, स्वातंत्र्य संग्रामातील बलिदानांची आठवण करून देणे व देशभक्तीची प्रेरणा जागविण्यासाठी स्वातंत्र्य दिनानिमित्त केंद्र शासनाच्या उपक्रमाला प्रतिसाद देत महापालिकेतर्फे हर घर तिरंगा अभियान २०२५ राबविण्यात येत आहे.

शहरातील सात प्रमुख ठिकाणी तिरंगा प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हुतात्मा स्मृती मंदिर, छत्रपती संभाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, होम मैदान, रंगभवन प्लाझा, म.न.पा. कॅम्प शाळा, जुळे सोलापूर डी मार्ट याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनांमध्ये विविध आकारांचे आणि स्वरूपांचे तिरंगा, स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाच्या घटना व व्यक्तिमत्वांचे माहितीपट तसेच विद्यार्थ्यांनी व स्थानिक कलाकारांनी तयार केलेली देशभक्तीपर चित्रकला व हस्तकला यांचा समावेश आहे. हर घर तिरंगा अभियानात सहभागी होऊन घरा घरावर तिरंगा फडकवावा आणि या प्रदर्शनांना भेट देऊन देशभक्तीचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. ओम्बासेंनी केले आहे.

## सशस्त्र सीमा बलच्या जवानाविरुद्ध अदखलपात्र गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

दारू पिऊन पत्नीला शिवीगाळ वर लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी सशस्त्र सीमाबलच्या जवानाविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. मदार गुलाब तांबोळी (वय ४० राहणार तेलंगी पाच्छा पेठ सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या चे नाव आहे. याप्रकरणी त्याची पत्नी मुमताज मुरावा मदार तांबोळी (वय ३६ रा. तेलंगी पाच्छा पेठ सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. मदार तांबोळी हे सशस्त्र सीमा बल मध्ये जवान आहेत ते एक महिन्याच्या सुट्टीवर घरी आले आहेत. शुक्रवारी दि.८ रोजी रात्री पावणे नऊ वाजता मदार हे दारू पिऊन घरी आले त्यांनी पत्नी मुमताज यांना शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच त्यांना मारण्याची धमकी दिली.

## भारतीय जैन संघटनेच्या वतीने क्रांतिकारकांना अभिवादन

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

क्रांती दिन संपूर्ण देशात साजरा केला जातो त्याच धर्तीवर सोलापुरातील बलिदान चौकतील हुतात्मा स्तंभस भारतीय जैन संघटनेच्या वतीने पुष्पचक्र वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, जिल्हा सदस्य विक्रांत बशेट्टी, अजिंक्य बालस्वरूप, आस्था रोटी बँकेचे विजयकुमार छंचुरे, शहीद अशोक कामटे विचार मंचचे योगेश कुंदुर यांची उपस्थिती होती. यावेळी श्याम पाटील, योगेश कुंदुर व अभिनंदन विभुते यांनी मनोगत व्यक्त केले.



**जाहीर सूचना**

माळशिरस तालुका हनुमान मोफत वाचनालय, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर या संस्थेचे सर्व सभासदांना कळविणेत येते की, सदर संस्थेची सन २०२५-२६ या वर्षाची वार्षिक सर्व साधारण सभा दि. २५/०८/२०२५ रोजी आयोजित केली आहे.

तरी सर्व सभासदांनी दि.२५/०८/२०२५ रोजी सायंकाळी ठिक ६:०० वा. माळशिरस तालुका हनुमान मोफत वाचनालय, माळशिरस ता. माळशिरस जि.सोलापूर येथे सभेसाठी उपस्थित रहावे, ही विनंती.

ही जाहीर सूचना प्रसिध्द केली असे. ता.०९/०८/२०२५

सही/-
सेक्रेटरी

**PRECISION CAMSHAFTS LIMITED**
CIN: L24231PN1992PLC067126
Regd. Office: D-5, Chincholi MIDC, Solapur - 413255, Maharashtra, India
Phone: +91 9168646536/37, Fax: +91 0217 2357645
Email-cs@pclindia.in, Website: www.pclindia.in

**NOTICE TO SHAREHOLDERS**

**For Transfer of Shares to Investor Education and Protection Fund (As per Companies Act, 2013 and rules made thereunder)**

Notice is given to the shareholders of the Company that pursuant to Rule 6 of the Investor Education and Protection Fund (IEPF) Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules 2016 notified by Ministry of Corporate Affairs which came into effect on September 7, 2016 and the said Rules amended as Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Amendment Rules 2017 effective from February 28, 2017 read with General Circular 12/2017 (Transfer of shares to IEPF Authority) issued on October 16, 2017.

Adhering to the requirements set out in the Rules, notice is sent to the concerned shareholders whose shares are liable to be transferred to the said account for taking appropriate actions. The Company has uploaded complete details of shareholders including their names and folio number on the website of the Company at www.pclindia.in. The shareholders are requested to verify the details of unclaimed dividend and the shares liable to transferred to IEPF.

Accordingly the due date of claiming such unpaid/unclaimed dividend is **November 03, 2025**. In case valid claim in respect of unclaimed dividend are not received from the concerned shareholder the Company shall order to comply with the requirement of rules transfer the equity shares to IEPF Account as per the procedures stipulated in the Rules.

However, both unclaimed dividend and shares transferred to Demat Account of the IEPF authority can be claimed back by making an application in **Form IEPF-5** online at the website of IEPF authority at www.iepf.com.

For any clarification on this matter shareholders may contact Company's Registrar and Transfer Agent M/s MUFG Intime India Private Limited Block No. 202, 2nd Floor, Akshay Complex, Near Ganesh Temple, Off Dhole Patil Road, Pune - 411, 001, Maharashtra, India Tel No.: +91 20 26160084, 26161629, Fax: +91 20 26163503, E-mail: rnt.helpdesk@in.mpms.mufg.com

**Place : Pune**
**Date : 07th August 2025**

For **Precision Camshafts Limited**
Sd/-
**Harshal J. Kher**
Company Secretary and Compliance Officer
(Nodal Officer for IEPF Activity)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### लंडन गोल्फ स्पर्धेत दीक्षा डागर अव्वल १० मध्ये

**लंडन** : भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने पीआयएफ लंडन गोल्फ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुरुवातीच्या फेरीत ३-अंडर ७० गुण मिळवले. सेंच्युरियन क्लब येथे झालेल्या प्रतिष्ठित लेडीज युरोपियन टूर स्पर्धेत दीक्षाने अव्वल १० व्या क्रमांकावर स्थान मिळविले. दीक्षाच्या शेवटच्या चार होलमध्ये दोन बर्डींनी तिचा राउंड हायलाइट केला, ज्यामुळे तिला आधीच्या डबल बोगीमधून सावरण्यास मदत झाली आणि पुढच्या फेरीत जाण्यासाठी मजबूत स्थान मिळवण्यात मदत झाली. दीक्षाने उशिरा आपली लय मिळवली, तर उर्वरित भारतीय खेळाडूंनी मिश्र कामगिरी केली. अदिती अशोकने सम-पार ७३ गुण मिळवले आणि तिचा टी-३७ गुण मिळवला. चार बोगींनी तिच्या चार बर्डीजची भरपाई केली. प्रणवी उर्सने ७५ (+२) गुण नोंदवले. ■

### चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स बुद्धिबळ अर्जुनचा रॉबसनवर विजय



**चेन्नई** : जर्मनीच्या विन्सेंट कीमरने शनिवारी येथे तिसऱ्या फेरीत भारताच्या कार्तिकेयन मुरलीला तीन तासांपेक्षा कमी वेळेत हरवून चेन्नई ग्रॅण्ड मास्टर्स २०२५ बुद्धिबळ स्पर्धेत विजयाची हॅट्ट्रिक केली. अव्वल मानांकित अर्जुन एरिगासीने उत्कृष्ट कामगिरी करत अमेरिकेच्या रे रॉबसनवर मात केली व २.५ गुणांसह गुणतालिकेत स्वतःला कीमरच्या नजरेत ठेवले. एकमेव अखिल भारतीय सामन्यात विदित गुजरातीने निहाल सरीनला एका रोमांचक सामन्यात हरवले, तर अमेरिकन ग्रॅण्डमास्टर ऑन्डर लियांगने नेदरलॅण्डच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टला पराभूत करून स्पर्धेतील आपला पहिला विजय मिळवला. दिवसाचा सर्वोत्तम खेळाडू कीमर होता. सिसिलियन डिफेन्स ओपनिंगनंतर २० वर्षीय खेळाडूने पांढऱ्या सोंगट्यानिशी सुरुवातीला आघाडी मिळवली. घड्याळ टिक-टिक करत असताना कार्तिकेयनने लवकरच राजीनामा दिला. कीमरने पूर्ण गुण मिळवले व क्रमवारीत आपली आघाडी कायम ठेवली. कीमरप्रमाणेच, भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुनने वेळेचा वापर शस्त्र म्हणून केला आणि रॉबसनच्या आव्हानाला तोंड दिले. सामना शेवटच्या गेमकडे जात असताना अर्जुनने ३० मिनिटांत आघाडी घेतली. विदित गुजरातीसाठी, पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये चुरशीची लढत दिल्यानंतर त्याला विजय मिळाला.

### अमेरिकन ओपनमधून अनेक दिग्गजांची माघार

**न्यू यॉर्क** : स्पेनच्या पॉला बडोसाने पाठदुखीतून सावरत अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे, अशी घोषणा स्पर्धेच्या आयोजकांनी केली. जागतिक क्रमवारीत १२ व्या स्थानावर असलेल्या बडोसाला अनेक दुखापती झाल्या आहेत, यात तिच्या पाठीच्या जुन्या त्रासाचाही समावेश आहे, त्यामुळे ती निवृत्तीचा विचार करत होती. बडोसा शेवटची विम्बल्डनमध्ये खेळली होती व तिथे तिला पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला होता. बडोसाच्या माघारानंतर, स्वित्झर्लण्डची जिल तेचमन अमेरिकन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश करेल. अमेरिकन ओपन २४ ऑगस्टपासून सुरू होमार आहे. बडोसाला स्पर्धेच्या नवीन मिश्र दुहेरी स्पर्धेतूनही माघार घ्यावी लागली आहे, यात ती ब्रिटनच्या जॅक ड्रॅपरची भागीदारी करेल अशी अपेक्षा होती.

**ओसाका, एमबोकोची माघार**

डब्ल्यूटीए मॉण्ट्रियल ओपन टेनिस स्पर्धेची विजेती व्हिक्टोरिया एमबोको व अंतिम फेरीतील पराभूत खेळाडू नाओमी ओसाका या दोघींनी शुक्रवारी एटीपी-डब्ल्यूटीए सिनसिनाटी ओपनमधून अधिकृतपणे माघार घेतली. ■

# रमेश बुदिहाल ऐतिहासिक अंतिम फेरीत

### आशियाई सर्फिंग स्पर्धा


रमेश बुदिहाल

**महाबलीपुरम्, ९ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या आशियाई सर्फिंग स्पर्धेत भारताच्या रमेश बुदिहालने इतिहास घडवला. बुदिहाल या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला भारतीय ठरला.

बुदिहालची ऐतिहासिक घोडदौड वैयक्तिक विजयापेक्षा जास्त महत्त्वाची आहे, परंतु भारतीय सर्फिंगचा पुढचा अध्याय लिहिण्यासाठी सज्ज आहे, हे याचे संकेत आहे.

एकेकाळी आशियाई स्तरावर सर्फिंगची अंतिम फेरी गाठणे हे आवाक्याबाहेरचे वाटत होते, परंतु रमेश बुदिहालने कोवलमच्या साध्या लाटांमधून उठून इतिहासात आपले नाव कोरले आहे.

महाबलीपुरममध्ये समुद्राने ते सोपे केले नाही आणि लयीत स्थिरावणे कठीण होते. मला हवी तशी सुरुवात करता आली नव्हती, मात्र पुढे कसे तरी, मला काही लाटा मिळाल्या आणि मी गुण मिळवले. मी घाबरलो नव्हतो, मला कल्पना होती की, शेवटच्या काही मिनिटांत मनाची एकाग्रता ठेवावी लागेल, योग्य लाट निवडावी लागेल आणि त्यासाठी पुढे जावे लागेल, असे रमेश बुदिहाल स्पर्धेनंतर म्हणाला.

इंडोनेशियाच्या आघाडीच्या पजार अरियाना (१३.८३) पेक्षा खूप मागे पडलेल्या बुदिहालला शेवटच्या चारमध्ये पोहोचण्यासाठी केवळ दुसऱ्या स्थानाची आवश्यकता होती. दोन महत्त्वाच्या राईड्स - ५.५० आणि ५.९३ - मुळे तो चीनच्या शिडोंग वू (९.०३) आणि देशबांधव किशोर कुमार (८.१०) यांच्यापेक्षा ११.४३ वर पोहोचला.

शिट्टी वाजताच भारतीय संघ आपल्या अंतिम स्पर्धकाचे स्वागत करण्यासाठी पाण्यात उतरला.

तत्पूर्वी, भारतीय सर्फर्स रमेश बुदिहाल आणि किशोर कुमारने इतिहास घडवला. महाबलीपुरम येथे सुरु असलेल्या आशियाई सर्फिंग अजिंक्यपद स्पर्धेत खुल्या पुरुष गटात उपांत्य फेरीत गाठणारे देशातील पहिले खेळाडू ठरले.

पहिल्या हीटमध्ये खेळणाऱ्या बुदिहालने १४.८४ गुणांसह उपांत्यपूर्व फेरीत वर्चस्व गाजवले व फिलीपिन्सच्या नील सांचेझ (१२.८०) पेक्षा पुढे राहिला.

माझ्या हीट्समध्ये मला हेच करायचे होते व ते मी साध्य केले. हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे बुदिहाल आपल्या हीटनंतर म्हणाला. गत वर्षी मालदीवमध्ये झालेल्या स्पर्धेत भाग घेऊ न शकलेल्या बुदिहालने मिळालेल्या या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यास उत्सुक होता.

जर मला गत वर्षी संधी मिळाली असती, तर मी कदाचित अधिक चांगली कामगिरी केली असती. मी त्याबद्दल खूप निराश होतो. पण, आता मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यास सज्ज आहे, मी जिंकेल अशी आशा आहे, असे तो म्हणाला.

दरम्यान, पुरुषांच्या ओपनच्या अंतिम हीटमध्ये भाग घेणाऱ्या किशोरने संयमी कामगिरी करत १०.५० सह फिलिपिन्सच्या एडुआर्डो अल्सिसोच्या (१२.०३) मागे दुसरे स्थान पटकावले. गत वर्षी किशोरने २०२४ च्या आवृत्तीच्या १८ वर्षांखालील गटात भाग घेतला आणि त्या वयोगटात उपांत्य फेरी गाठणारा देशातील पहिला खेळाडू ठरला.

बुदिहाल, सांचेझ, मेगा आर्टाना (इंडोनेशिया), शिडोंग वू (चीन), पजार एरियाना (इंडोनेशिया), कानोआ हिजे (दक्षिण कोरिया), अल्सिसो आणि किशोर हे पुरुष खुल्या उपांत्य फेरीतील खेळाडू आहेत. (वृत्तसंस्था)



# पाच वर्षीय बुद्धिबळपटू आरिनीने घडवला इतिहास

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

भारताची आरिनी लाहोटीने इतिहास घडवला आहे. नवी दिल्लीची ५ वर्षीय अरिनी देशातील सर्वात तरुण महिला मानांकित खेळाडू झाली आहे. तिचे सध्याचे रेटिंग १५५१ आहे. १९ सप्टेंबर २०१९ रोजी जन्मलेली आरिनीने उधृती भट्टाचार्य हिचा मागील विक्रम मोडीत काढला आहे, असे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने शुक्रवारी ट्विट केले.

एवढ्या लहान वयात, आरिनी आधीच धमाकेदार कामगिरी करत आहे आणि भारतीय बुद्धिबळातील दिग्गजांच्या लांब यादीत सहभागी होत आहे. ही उल्लेखनीय कामगिरी भारतीय बुद्धिबळाच्या उज्ज्वल भविष्यावर प्रकाश टाकते, असे त्यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

अलीकडेच नागपूर महाराष्ट्राची १९ वर्षीय दिव्या देशमुख ही महिला बुद्धिबळ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत देशबांधव कोनेरू हम्पीला पराभूत करून बुद्धिबळ ग्रॅण्डमास्टर होणारी चौथी भारतीय महिला ठरली आहे, असे करणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे. (वृत्तसंस्था)

# एआयएफएफ आयएसएल संघांना पाठिंबा देणार

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

१३ संघांनी इंडियन सुपर लीगच्या सध्याच्या निलंबनाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्याची इच्छा व्यक्त केल्याच्या वृत्तानंतर अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने इंडियन सुपर लीग क्लबना पूर्ण पाठिंबा देण्याची पुष्टी केली आहे.

एफएसडीएलसोबत मास्टर्स राईट करार रखडल्यामुळे काही क्लबना त्यांचे फुटबॉल ऑपरेशन्स स्थगित करावे लागले असल्याने आयएसएल सध्या निलंबित आहे आणि सुरुवातीची तारीख देण्यात आलेली नाही.

एआयएफएफने ७ ऑगस्ट २०२५ रोजी नवी दिल्ली येथे सर्व भागधारकांसोबत झालेल्या बैठकीत १३ आयएसएल क्लबच्या सीईओंना आश्वासन दिले आहे की, देशाच्या अव्वल दर्जाच्या लीगला पाठिंबा देण्यासाठी अ.भा. फुटबॉल महासंघ कायदेशीर सल्ल्यानुसार सर्वकाही करेल, असे इंडियन फुटबॉलच्या एक्स हॅण्डलवरील पोस्ट केले.

देशातील अव्वल दर्जाची फुटबॉल लीग या वर्षी होईल. तथापि, त्यांनी स्पष्ट केले की एआयएफएफ क्लबच्या अंतर्गत कामकाजात हस्तक्षेप करणार नाही, ज्यामध्ये खेळाडू आणि कर्मचाऱ्यांना देय देण्याशी संबंधित समस्यांचा समावेश आहे, असे एआयएफएफचे अध्यक्ष कल्याण चौबे यांनी आश्वासन दिले.

बैठकीनंतर चौबे यांनी कोणताही ठोस आराखडा न देता यावर्षी आयएसएलच्या वेळापत्रकाची पुष्टी केली, परंतु संघांनी त्यांचे पहिले संघ कामकाज स्थगित करण्यावर भाष्य करण्याचे टाळले. आयएसएल यावर्षी होईल, याबद्दल काही शंका नाही. त्याच वेळी क्लबच्या खेळाडूंना किंवा कर्मचाऱ्यांना पैसे देण्याचा निर्णय क्लबचा आहे.

सुपर कप सप्टेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची आम्हाला अपेक्षा आहे. काही संघांना त्यांची तयारी पूर्ण करण्यासाठी आणि खेळाडूंना परत आणण्यासाठी सहा ते आठ आठवडे लागतात. आमच्या पुढील बैठकीत, आम्ही स्पर्धेच्या सुरुवातीची तारीख जाहीर करू, असे चौबे यांनी पत्रकारांना सांगितले होते. याशिवाय लीग पुन्हा सुरू होण्याबाबत असलेल्या अनिश्चिततेमुळे, आयएसएल क्लबना पुरेसे स्पर्धात्मक सामने उपलब्ध करून देण्यासाठी एआयएफएफ अध्यक्षांनी सप्टेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सुपर चषक फुटबॉल स्पर्धेचे वेळापत्रक तयार करण्याचा प्रस्ताव मांडला. (वृत्तसंस्था)

# हरयाणा, छत्तीसगड, झारखंड, उत्तर प्रदेश उपांत्य फेरीत

### राष्ट्रीय कनिष्ठ महिला हॉकी

### महाराष्ट्राचे आव्हान संपुष्टात

**काकीनाडा, ९ ऑगस्ट**

येथे आयोजित १५ व्या हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी गट अ च्या उपांत्यपूर्व फेरीत हरयाणा, छत्तीसगड, झारखंड आणि उत्तर प्रदेश संघांनी आपापले सामने जिंकून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले.

शनिवारी झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात हरयाणाने ओडिशाचा ४-१ असा पराभव केला, छत्तीसगड हॉकीने हॉकी मध्य प्रदेशचा २-१ असा पराभव केला, हॉकी झारखंडने हॉकी पंजाबचा ३-१ असा पराभव केला, तर उत्तर प्रदेश हॉकीने हॉकी महाराष्ट्राचा २-१ असा पराभव केला.

दिवसाच्या पहिल्या सामन्यात हॉकी हरियाणाने हॉकी ओडिशावर ४-१ असा सहज विजय मिळवला.



राष्ट्रीय कनिष्ठ महिला हॉकी सामन्यातील एक क्षण

विजयी संघाकडून काजलने गोल नोंदवून चांगली सुरुवात केली. त्यानंतर दुसऱ्या चरणात सुप्रियाने आणखी एक गोल करून आघाडी वाढवली. कर्णधार शशी खासा (३६) देखील तिसऱ्या चरणात गोलकेला. शेवटच्या चरणात हॉकी ओडिशाकडून अमिषा एक्काने एकमेव गोल करण्यात यश मिळविले, परंतु हॉकी हरयाणाकडून सावीने अखेरतच्या क्षणी पुन्हा एकदा गोल केला.

दुसऱ्या सामन्यात छत्तीसगड हॉकीने हॉकी मध्य प्रदेशवर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये २-१ असा विजय मिळवला. निर्धारित वेळेत उभय संघादरम्यानचा सामना १-१ ने बरोबरीत राहिला होता. छत्तीसगड हॉकीकडून यशोदाने सुरुवातीला गोल केल्यानंतर हॉकी मध्य प्रदेशकडून हुदा खानने गोल करून सामन्यात बरोबरी साधली. हॉकी मध्य प्रदेशकडून शूटआउट दरम्यान काजलने एक प्रयत्न केला, तर छत्तीसगड हॉकीच्या कर्णधार रुखमानी हिने शूटआऊट दरम्यान दोन्ही यशस्वी प्रयत्न केले व तिचा संघ उपांत्य फेरीत पोहोचला.

अन्य सामन्यात हॉकी झारखंडने हॉकी पंजाबचा ३-१ असा पराभव करून स्पर्धेत पुढे वाटचाल केली. हॉकी पंजाबच्या पवनप्रीत कौरने पेनॉल्टी कॉर्नरद्वारे सामन्याचा पहिला गोल केला, लगेच हॉकी झारखंडकडून स्वीटी डुंगडुंगने मैदानी गोल करून बरोबरी साधली, त्यानंतर शांती कुमारी व रोशनी ऐंदने गोल करून विजयावर शिक्कामोर्तब केले.

दिवसाच्या अंतिम सामन्यात उत्तर प्रदेश हॉकीने हॉकी महाराष्ट्रावर २-१ असा विजय साजरा केला. मध्यंतरापर्यंत गोलशून्यने सामना ब रोबरीत राहिल्यानंतर तिसऱ्या चरणामध्ये सल्लू पुखम्बमने उत्तर प्रदेश हॉकीसाठी पहिला गोल केला. तथापि, काही क्षणांनंतर, हॉकी महाराष्ट्राच्या दीक्षा नितीन शिंदेने (४५) मैदानी गोलद्वारे पुन्हा सामना बरोबरीत आणला. शेवटच्या चरणात रश्मी पटेलने (५५) पेनॉल्टी कॉर्नरद्वारे उत्तर प्रदेश हॉकीसाठी विजयी गोल केला. (वृत्तसंस्था)

# न्यूझीलंडचा झिम्बाब्वेवर विक्रमी एक डाव व ३५९ धावांनी विजय

### कसोटी मालिका २-० ने जिंकली

**बुलावयो, ९ ऑगस्ट**

शनिवारी बुलावायो येथे झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने झिम्बाब्वेवर एक डाव आणि ३५९ धावांनी दणदणीत विजय मिळवत कसोटी क्रिकेटमधील आपला सर्वात मोठा विजय मिळविला आणि दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी जिंकली. १५३ धावा काढणारा डेव्हॉन कॉनवे सामनावीर पुरस्काराचा, तर एकूण १६ बळी टिपणारा मॅट हेनरी मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

डेव्हॉन कॉनवे (१५३), रचिन रवींद्र (१६५ नाबाद) आणि हेनरी निकोल्स (१५० नाबाद) यांच्या शतकांनंतर न्यूझीलंडने ३ बाद ६०१ धावांवर डाव घोषित केल्यानंतर झिम्बाब्वेचा सर्वात मोठा कसोटी पराभव ११७ धावांत संपला.



विजेतेपदाच्या चषकासह न्यूझीलंड संघाचे खेळाडू

वेगवान गोलंदाज झकरी फॉल्क्सने न्यूझीलंडकडून कसोटी पदार्पणात एकूण ९ बळ टिपण्याची सर्वोत्तम कामगिरी केली. फॉल्क्सने पहिल्या डावांत ३८ धावांत ४ बळी व दुसऱ्या डावांत ३७ धावांत ५ बळी टिपण्याची कामगिरी केली.

झिम्बाब्वेचा पहिला डाव १२५ धावांत आटोपल्यानंतर न्यूझीलंडने ३ बाद ६०१ धावांचा डोंगर रचला आणि डाव घोषित केला. त्यानंतर ५७५ धावांनी पिछाडीवर पडलेल्या झिम्बाब्वेला दुसऱ्या डावांत अवघ्या ११७ धावांतच गुंडाळले. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया ‘अ’ महिला संघाचा भारत ‘अ’ संघावर ११४ धावांनी विजय

### दुसऱ्या अनधिकृत टी-२० सामना

**मॅके, ९ ऑगस्ट**

मॅके येथील ग्रेट बॅरियर रीफ अरेना येथे शनिवारी खेळल्या गेलेल्या तीन सामन्यांच्या अनधिकृत टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारत अ स घाला ऑस्ट्रेलियाच्या अ संघाकडून ११४ धावांनी पराभव पत्करावा लागला.

ऑस्ट्रेलिया अ महिला संघाच्या ४ बाद १८७ धावांना प्रत्युत्तर देताना भारत अ महिला संघ अवघ्या ७३ धावांतच गारद झाला.

भारताने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ताहिला विल्सन (४३) व एलिसा हिलीने ९५ धावांची सलामी भागीदारी करत ऑस्ट्रेलियाच्या डावाची चांगली सुरुवात केली.

वेगवान गोलंदाज किम गार्थने तीन षटकांत अवघ्या ७ धावा देत चार बळी टिपल्या, तर कर्णधार एलिसा हिलीने ४४ चेंडूत जलद ७० धावा करून ऑस्ट्रेलियाला मोठी धावसंख्या उभारण्यास मदत केली.


एलिसा हिली

भारत अ संघाच्या कर्णधार राधा यादवने विल्सनला (३५ चेंडूत ४३) बाद करून पहिला बळी मिळविला आणि त्यानंतर फिरकीपटूने १५ व्या षटकात हिलीला माघारी पाठवले.

किम गार्थने चार बळी घेत भारताचा १८८ धावांचा पाठलाग रोखला.

अनिका लिरॉयड (२१ चेंडूत ३५) आणि कोर्टनी वेब (१३ चेंडूत नाबाद २६) यांनी २० षटकांत ४ बाद १८७ धावा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

प्रत्युत्तरादाखल, भारताच्या फलंदाजांना शिस्तबद्ध गोलंदाजी आक्रमणासमोर संघर्ष करावा लागला. मिन्नू मणी व वृंदा दिनेश या केवळ दोन खेळाडूंनी २० धावांचा टप्पा ओलांडला. गार्थ शिवाय एमी एडगर व टेस फ्लिन्टॉफने प्रत्येकी दोन बळी घेत भारताला १५.१ षटकांत केवळ ७३ धावांत गुंडाळले.

तीन ५० षटकांचे सामने आणि चार दिवसांचा सामना खेळण्यापूर्वी संघ रविवार, १० ऑगस्ट रोजी तिसरा अनधिकृत टी-२० सामना खेळणार आहेत. (वृत्तसंस्था)

# पाटणा पायरेट्सचे लक्ष्य विक्रमी चौथे विजेतपद

### १२ व्या प्रो-कबड्डी लीग हंगामाचे वारे

**पाटणा, ९ ऑगस्ट**

अनेक अव्वल बचावपटू आणि दर्जेदार चढाईपटूंचा समावेश आसलेल्या पाटणा पायरेट्सचे आगामी १२ व्या प्रो-कबड्डी लीग हंगामात आपले चौथे विजेतपद पटकावण्याचे लक्ष्य आहे.

तीन वेळच्या विजेत्या पाटणा पायरेट्सने गत हंगामात पाचव्यांदा पीकेएलची अंतिम फेरी गाठली होती, परंतु त्यांना हरयाणा स्टीलर्सकडून पराभव पत्करावा लागला. अकराव्या हंगामानंतर व चौथे पीकेएल चषक गमावल्यानंतर काही तासांतच पाटणा पायरेट्सने माजी मुख्य प्रशिक्षक नरेंदर रेडू यांना सोडले.

**अनुप कुमार नवीन मुख्य प्रशिक्षक**

आता पीकेएलचा बारावा हंगाम प्रारंभ होण्यापूर्वी पाटणा पायरेट्सने भारतीय कबड्डी संघाचा माजी कर्णधार अनुप कुमारला नरेंदर रेडू यांच्या जागी आपले नवीन मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले.

अनुप हा भारतीय राष्ट्रीय कबड्डी संघाचा सदस्य होता. अनुपने २०१० व २०१४ मध्ये आशियाई सुवर्णपदके, दक्षिण आशियाई सुवर्णपदक व २०१६ मध्ये कबड्डी विश्वचषक जिंकला. अर्जुन पुरस्कार विजेत्या अनुप कुमारने यू मुम्बाला पहिल्या तीन हंगामात प्रो-कबड्डी लीगच्या अंतिम फेरीत पोहोचवले होते व त्यानंतर जयपूर पिंक पँथर्ससह त्याची शानदार पीकेएल कारकीर्द संपली.

मागील मोहिमेतील आपला गाभा कायम ठेवत पाटणा पायरेट्सने पीकेएल हंगाम १२ च्या खेळाडूंच्या लिलावात आठ नवीन खेळाडूंना करारबद्ध केले आणि एकूण ४.९६६ कोटी रुपयांच्या एकूण रकमेसाठी एक मजबूत संघ तयार केला.

संघ व्यवस्थापनाने नवीन हंगामापूर्वी पाटणा पायरेट्सच्या ताकद व कमकुवतपणावर लक्ष केंद्रित केले आहे व त्यात सुधारणा करण्यावर भर दिला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

**ताकद**

पाटणा पायरेट्सची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा जबरदस्त बचावात्मक विभाग असेल. त्यांनी आपले बचावपटू हमीद मिर्झायी नादेर, थियागराजन युवराज आणि नवदीपला कायम ठेवले आहे. खेळाडूंच्या लिलावात पर्यायाचा वापर करून स्टार लेफ्ट कॉर्नर अंकित जगलानला एका हंगामासाठी १.५७३ कोटी रुपयांना राखून ठेवला. अंकितने गत हंगामात पायरेट्सना अंतिम फेरीत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दोन हंगामांसाठी ८६ लाख रुपयांना उजवा कव्हर दीपक सिंगला पुन्हा मिळवले. याशिवाय उजव्या कॉर्नर सोम्बीर गुलिया व अमीन घोरबानीला प्रत्येकी १३ लाख रुपयांना करारबद्ध करून आपला बचाव मजबूत केला. ■



**कमकुवतपणा**

लिलावात पायरेट्सने उदयोन्मुख स्टार अयान लोचबला व अनुभवी चढाईपटू मनिंदर सिंगला २० लाख रुपयांना करारबद्ध केले असले तरी, पायरेट्ससाठी माजी चढाईपटू देवांक दलाल हा चिंतेचा विषय आहे. निवृत्त झालेल्या देवांकने गत मोहिमेत पाटणा पायरेट्सच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली होती, मात्र या हंगामात पाटणाला त्याची अनुपस्थिती जाणवणार आहे. याशिवाय माजी कर्णधार व उजव्या कोपऱ्यातील शुभम शिंदेची उणीव भासणार आहे. ■

**संधी**

देवांक दलालच्या निवृत्तीनंतर आगामी १२ व्या प्रो-कबड्डी हंगामामध्ये अयान लोचबसारख्या खेळाडूला पाटणा पायरेट्सचा प्रमुख चढाईपटू म्हणून आपला दावा सिद्ध करण्याची उत्तम संधी मिळेल. उदयोन्मुख स्टार अयानने गत हंगामात प्रसिद्धी मिळवली आणि त्याच्या शानदार पदार्पणाच्या मोहिमेसाठी प्रतिष्ठित न्यू यंग प्लेअर अवॉर्ड मिळवला.

मनिंदर सिंगची पायरेट्समध्ये भरती संघात मौल्यवान खोली आणि अनुभव आणते. तथापि, पीकेएलचा सर्वात यशस्वी कर्णधार अनुप कुमार हा स्पॉटलाइट असेल, जो सीझन ८ मध्ये पुणेरी पलटनसोबत काम केल्यानंतर मुख्य प्रशिक्षक म्हणून परतला आहे. त्याची अतुलनीय खेळाची जाणीव आणि खेळाडूंना प्राधान्य देण्याची मानसिकता हा एक्स-फॅक्टर असू शकतो.प्रो-कबड्डी लीग हंगामामध्ये पायरेट्ससाठी एक नवीन युग घडवू शकतात. ■

# दुखापतीतून सावरल्यानंतर लगेच क्रिकेट खेळण्याची घाई करून चूक केली : रशीद खान

**नवी दिल्ली, ९ ऑगस्ट**

२०२३ च्या वन-डे विश्वचषकानंतर झालेल्या पाठीच्या शस्त्रक्रियेनंतर लगेच क्रिकेट खेळण्याची घाई करून चूक केली, असे अफगाणिस्तानचा आघाडीचा लेग-स्पिनर रशीद खानने मान्य केले.

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून खेळताना रशीद खानने ३३ षट्कार मारले होते. अशा कठीण आयपीएल २०२५ च्या मोहिमेनंतर रशीदने दोन महिन्यांची विश्रांती घेतली व लॉर्ड्स येथे द हंड्रेडच्या पहिल्या सामन्यात गतविजेत्या ओव्हल इनव्हिन्सिबल्सने लंडन स्पिरिटवर ३-११ असा विजय मिळवून सामन्यात पुनरागमन केले.

आयपीएलनंतर माझे शरीर सामान्य स्थितीत येण्यासाठी मला अशा प्रकारच्या विश्रांतीची आवश्यकता होती. मी माझ्या ताकदीवर थोडे काम केले. विशेषतः पाठीच्या शस्त्रक्रियेतून परत येताना, मला योग्यरित्या पुनर्वसन करण्यासाठी जास्त वेळ मिळाला नव्हता. त्यावेळी मी माझे क्रिकेट इतक्या लवकर पुन्हा सुरू करण्याची थोडीशी चूक केली, असे रशीद खान म्हणाला.

मी स्वतःला बरे होऊ दिले नाही असे मला वाटते, कारण आता मला त्याचा तोटा दिसतो. आयपीएलनंतर मला अशा प्रकारची दोन महिने सुट्टी हवी होती, जेणेकरून मी केवळ माझ्या तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित करू शकेन, असे रशीदने सांगितले.रशीदने अफगाणिस्तानला २०२४ च्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचवले. त्याआधी पाठीच्या व मांडीच्या दुखापतींमुळे त्याला वन-डे आणि कसोटीला मुकावे लागले. जानेवारी २०२५ मध्ये बुलावायो येथे झालेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत तो परतला आणि ५५ षटकांत ११ बळी घेऊन सामनावीर घोषित झाला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मोडनिंब येथे अखंड हरिनाम सप्ताह, नामसंकीर्तन उत्सवाचे आयोजन

**मोडनिंब, दि.१० ऑगस्ट-**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री यमाई देवी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन उत्सवाचे आयोजन करण्यात आले.श्री कृष्ण जन्माष्टमी निमित्त आयोजित हरिनाम सप्ताह श्रावण शु. १५, शनिवार ते श्रावण कृ.८ शनिवार (दि. ९ते १५) ऑगस्ट या कालावधीत पार पडणार आहे. कै. अंबादास विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १०० वर्षापासूनचा सप्ताहाचा इतिहास सांगितला जातो. सप्ताहात काकडा, गाथा भजन, हरिपाठ, किर्तन, हरिजागर, असे दैनदिन कार्यक्रम पार पाडणार आहेत. सप्ताहाच्या सांगतेला दिंडी प्रदक्षिणा होऊन यमाई मंदीर ट्रस्ट व जय भवानी चौक मित्र मंडळ यांच्या वतीने श्रीफळ दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे.हा किर्तन सोहळा यशस्वी करण्यासाठी खंदारे नाना, नानासाहेब सुर्वे, शितल सुर्वे, राजू महामुनी, उल्हास काळे,राजू राऊत, महेश पाटणे, प्रथमेश पवार, गणेश महामुनी, यश पाटणे यासह श्री यमाई ट्रस्ट व जय भवानी चौक मित्र मंडळ परिश्रम घेत आहेत.

### ईश्वर वठार येथे ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल, दलीत समाजातील कुटुंबावर प्राणघातक हल्ला

**पंढरपूर,दि.९ ऑगस्ट -**

पंढरपूर तालुक्यातील ईश्वर वठार या गावात विनाकारण त्रास देऊन मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणाऱ्या दलीत समाजातील सतीश श्रीमंत सरवदे या कुटुंबावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याने ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवार (दि.५ ऑगस्ट) रोजी रात्री साडे आठ वाढण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. ईश्वर वठार येथे राहणारा शिवाजी सलगर याने, रस्त्यावर बांधलेल्या आमच्या गायीला तू का उठवले, म्हणून सतीश सरवदे यांच्या मुलाला शिवीगाळ केली त्यानंतर सतीश सरवदे यांनी शिवाजी सलगर यांना विचारणा केली असता सतीश सरवदे यांच्या तोंडावर ट्रॅक्टर टॉमी चा रॉड मारून जबर जखमी केले यामध्ये सतीश सरवदे यांचे दोन दात पडून जबड्याचे दोन भाग झाले, सतीश यांची पत्नी स्वाती मुली धनश्री आणि प्रणाली यांना शिवाजी सलगर यांची बायको लक्ष्मी हिने शिवीगाळ केली, धनश्री हिच्या पायावर आणि पाठीवर दगडाने मारून जखमी केले, सरवदे यांचा मुलगा प्रज्वल यास गायीला का हटविले असा जाब विचारत जातीवाचक शिव्या देऊन अपमानित केले. शिवाजी सलगर याने यापूर्वीही असाच सतीश सरवदे यांच्या कुटुंबियांवर हल्ला केला होता. शिवाजी सलगर हा मुद्दामहून येणे जाण्याच्या ग्रामपंचायतच्या रस्त्यावर गायी बांधत असून रस्त्यावरून मोटरसायकलीवरून ये जा करणाऱ्यांचा धक्का लागला तर भांडणे उकरून काढून विनाकारण सतीश सरवदे यांच्या कुटुंबातील व्यक्तींना शिवीगाळ व दमदाटी मारहाण करत आहे. शिवाजी सलगर याने ट्रॅक्टरची टॉमी जबर तोंडावर मारल्याने सतीश सरवदे यांचे तीन दात पडले असून हनुवटी फाटली आहे. याबाबत पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पंढरपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे अधिक तपास करीत आहेत.



### सांगोला येथे 'हर घर तिरंगा' उपक्रम

**सांगोला, दि.९ ऑगस्ट -**

दि.२ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियानांतर्गत सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागामार्फत महिलांसाठी राखी बनवण्याच्या स्पर्धेसह विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा घेतली. महिलांनी आकर्षक आणि सर्जनशील राख्या तयार केल्या. रांगोळी स्पर्धेत तिरंगा, राष्ट्रध्वज, देशभक्तीवर आधारित रांगोळी साकारली. विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या राख्या सैनिकांना पाठवण्याची व्यवस्था डाक विभागाच्या सहकार्याने करण्यात आली आहे. यावेळी पोस्टाचे हनुमंत निंबाळकर सांगोला नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे, रोहीत गाडे, अस्मिता निकम, प्रियांका पाटील, प्रभाकर कांबळे, सहा.प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे उपस्थित होते.

## निधन वार्ता



### प्रमोद कुलकर्णी

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

येथील विद्या नगर २ मधील राहिवासी प्रमोद गोविंद कुलकर्णी (वय ७४) यांचे आकस्मित मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई नातवंडे असा परिवार होता. सार्वजनिक बांधकाम विभागातून उपअभियंता म्हणून ते निवृत्त झाले होते.



### सादिकभाई दारुवाले

**सोलापूर दि. ९ ऑगस्ट-**

सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक तथा शोभेच्या दारूचे पारंपरिक विक्रेते सादिकभाई मोहम्मद हनिफ दारुवाले (वय ५२ वर्षे) यांचे शनिवारी पहाटेच्या सुमारास आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर चिरागअली तकीया कब्रस्तान जोडभावी पेठ येथे दफनविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, पत्नी, तीन मुले,सुना नातवंडे असा परिवार आहे.



### भागीरथी निकम

**सोलापूर दि. ९ ऑगस्ट-**

बेंबळी (ता.धाराशिव) येथील भागीरथी रामभाऊ निकम यांचे दि. ९ ऑगस्ट रोजी पहाटे वर्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, जावई, नातवंडे आहेत. आदित्यनगर येथील रहिवाशी शिक्षक मारुती निकम यांच्या आई होत. मोदी स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अन्यथा मैला मिश्रीत चंद्रभागेचं पाणी सरकारला पाठवणार

■ सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ ऑगस्ट -**



लाखो साधुसंताच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या चंद्रभागेच्या पाण्यामध्ये नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे पासष्ठ एकर परिसरातील शौचालय व आजूबाजूच्या मठातील शौचालयातील सांडपाणी चेंबर मधून डायरेक्ट चंद्रभागेच्या पात्रात मिसळत आहे, त्यामुळे लाखो करोडो भाविकांचं श्रद्धास्थान असणाऱ्या चंद्रभागेच्या पात्रातील पाणी दूषित होत आहे. लवकरात लवकर नगरपालिका प्रशासनाने याचे गांभीर्य ओळखून चंद्रभागेत मिसळणार पाणी बंद न केल्यास आम्ही महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने चंद्रभागेचं पाणी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना व संबंधित मंत्र्यांना कमंडलूमध्ये पाठविणार असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

हे मैला मिश्रित पाणी चंद्रभागेच्या पात्रात मिसळत असल्यामुळे अनेक भाविकांच्या भावना दुखवणारा कृत्य नगरपालिका करत आहे. हे घाण पाणी मिसळल्यामुळे चंद्रभागा पूर्ण दूषित झालेले आहे. हजारो भाविक भक्त चंद्रभागेच्या पाण्यात स्नान करतात तसेच पाणी तीर्थ म्हणून सेवन करतात त्याच बरोबर आपल्या घरी पूजन करण्यासाठी चंद्रभागेचे पाणी घेऊन जातात.

जर असे मैला मिश्रित पाणी तीर्थ म्हणून सेवन केल्यामुळे भाविक भक्त आजारी पडतील. त्यामुळे तात्काळ याची दखल घेऊन चंद्रभागेमध्ये होत, असलेलं मैला मिश्रित पाणी तात्काळ थांबवावे, अन्यथा महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला.

## महिला मंडळ शाळेत मातृपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ९ ऑगस्ट-**



महिला मंडळ प्राथमिक शाळा पंढरपूर येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका लोखंडे यांच्या संकल्पनेतून मातृपूजन हा मातांचा सन्मानपर कार्यक्रम घेण्यात आला. पालक स्वाती ननवरे कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी होत्या. मुख्याध्यापिका लोखंडे यांनी प्रस्ताविक केले. इयत्तेनुसार शिक्षक, पालक यांच्यात मुलांच्या विविध पैलूवर चर्चात्मक कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. इयत्ता चौथीच्या वर्गाची अभिनव अशा शिवहजेरी या अभिनव उपक्रमाचे पालकांनी भरभरून कौतुक केले. शिक्षक, शाळा यांच्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.पाल्याकडून मातांचे पाद्यपूजन करण्यात आले. संस्थेच्या सचिवा डॉ. वर्षा काणे यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. पालकांनी आपले शाळेबद्दलचे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन शिक्षिका मोरे यांनी तर स्वागतगीत शिक्षिका परचंडे यांनी म्हटले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## गौडगावच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळीचा ८२ वा वर्धापनदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट-**



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गौडगाव या संस्थेचा ८२ वा वर्धापन दिन व क्रांती दिन मल्टीपर्पज हायस्कूल गौडगाव या शालेच्या प्रांगणामध्ये साजरा करण्यात आला.

अध्यक्ष विनायकराव (बप्पा) गर यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा .ए.डी. जाधव, (आर पी कॉलेज धाराशिव), सचिव पंडितराव लोहोकरे, सहसचिव अरुण भड, संचालक अनिल गरड, जीवन लोहोकरे, वसंत काकडे, डॉ. संतोष भड, प्राचार्य सुरज काकडे, सुपरवायझर सुमंत जानराव, प्रा. मोहन लोहोकरे, प्रा. प्रियंका गरड, प्रा. प्रवीण गरड शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

गावांमधून थोर पुरुषांच्या कार्याचा तसेच संस्थेच्या वर्धापनदिनाच्या जयघोषात प्रभातफेरी काढण्यात आली. संस्थेचे सचिव पंडितराव लोहोकरे व सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीमध्ये कर्मवीरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रमुख पाहुणे आर.डी. जाधव यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत असताना देश स्वतंत्र होण्यापूर्वी या संस्थेची स्थापना झाली. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मजबूत होण्यामध्ये या संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. तसेच शिक्षकांना संबोधित करत असताना विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर थोडं शहाणपण शिकवा हा मोलाचा सल्ला त्यांनी आपल्या मनोगतामधून दिला. कर्मवीरांच्या त्या काळातील महान कार्याचा आढावा देखील त्यांनी घेतला. अध्यक्षांनी भाषणामध्ये कर्मवीर लोहोकरे गुरुजींचा एक किस्सा सांगितला. एवढ्या मोठ्या संस्थेचे संस्थापकाचा ज्यावेळेस प्रवासादरम्यान किस्सा कापला तेव्हा त्याच्यामध्ये फक्त एक लोखंडाची चावी चोरीस गेली होती. हे सांगण्यामागचा हेतू निस्वार्थ भावनेने संस्थापकांनी काम केले. कधीच ते स्वतः जवळ पैसे ठेवत नसत. त्यामुळे या छोट्याशा रोपट्याचं मोठ्या वटवृक्षांमध्ये रुपांतर झालं, असं त्यांनी सांगितलं. विद्यार्थ्यांची मनोगते झाली. दहावी व बारावी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठी सर तर आभार प्रदर्शन संदीप चव्हाण सर यांनी केले.

## कवठेकर प्रशालेत रक्षाबंधन व संस्कृत दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ ऑगस्ट -**




पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेत रक्षाबंधन व संस्कृतदिन उत्साहात पार पडला.या कार्यक्रमास प्रमुख अभ्यागत म्हणून संस्कृतचे गाढे अभ्यासक प्रा. सुनील विश्वासे उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्रीसरस्वतीचे पूजन करण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांनी प्रास्तविक भाषणातून रक्षाबंधन व संस्कृतदिन हे आपल्या संस्कृतीचा वारसा असल्यामुळे पुढच्या पिढीकडे याची ओळख व जपणूक होणे आवश्यक असल्याने अशा समारंभाची नियोजननाची गरज प्रतिपादित केली. यानंतर पाहुण्यांचा परिचय प्रशालेतील संस्कृत विभागाच्या प्रमुख श्रीमती डोळे यांनी करून दिला.

कनिका कवडे व चि.यश माने यांनी मनोगत मांडले. उपस्थित सर्व भावांना बहिणींनी अतिशय आनंदाने व उत्स्फूर्तपणे राखी बांधून परंपरेप्रमाणे रक्षाबंधन साजरे केले. हिंदी मराठी रक्षाबंधनावरील भावपूर्ण गीते यामुळे वातावरण अधिकच उत्साहवर्धक व भावनाशील होऊन खऱ्या अर्थाने प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या जबाबदारीची जाणीव झाल्याचे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे हात उंच करून आपल्या उजव्या हातात बांधलेली राखी सर्वांना अतिशय अभिमानाने दाखवली. यानंतर विद्यार्थ्यांचे नृत्य व गायनाने कार्यक्रमाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतात कार्यक्रमाचे प्रमुख अभ्यागत प्रा. श्री. विश्वासे यांनी या आजच्या रक्षाबंधन सणाबद्दलची धार्मिक व आध्यात्मिक माहिती विषद करून भावी पिढीमध्ये संस्कार, संस्कृती व कर्तव्य यामधून उत्तम नागरिक तयार होत असल्याने आशा कार्यक्रमाची खऱ्या अर्थाने गरज प्रतिपादित केली व उपस्थित सर्व भगिनींच्या रक्षणासाठी भावांनी सतत जागृत राहण्याचे आवाहन केले. प्रशालेच्या ज्येष्ठ संस्कृत शिक्षिका सौ. तरळगट्टी यांनी प्रास्तविक केले. संस्कृतच्या शिक्षिका कु. बिराजदार यांनी परिश्रम घेतले. उपमुख्याध्यापिका सौ. विश्वासे, पर्यवेक्षक श्री. गडदे, श्री. शेलार व प्रशालेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी तसेच सर्व कर्मचारी बंधू यांचाही मोठा सहभाग होता. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## पाचेगाव खुर्द ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी हणमंत मिसाळ बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.९ ऑगस्ट -**



पाचेगाव खुर्द (ता.सांगोला) ग्रामपंचायतीचे उपसरपंच भारत मिसाळ यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने नव्या उपसरपंच निवडीसाठी जाहीर झालेल्या प्रक्रियेत माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील गटाचे हणमंत तुकाराम मिसाळ यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी ग्रामविकास अधिकारी मनीषा जावीर यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली. ही निवड सरपंच संगीता भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. निवड जाहीर होताच सभागृहात टाळ्यांचा गजरासह ग्रामस्थांनी गुलालाची उधळण, ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. या बैठकीस रामचंद्र मिसाळ, डॉ. राज मिसाळ, शिवाजीराव पाटील, लक्ष्मण मिसाळ, शिवाजी मिसाळ, शहाजी मिसाळ, प्रकाश मिसाळ, तानाजी मिसाळ, भारत मिसाळ, आण्णासो पाटील, शिवाजी मोहिते, तेजस मिसाळ, आबासाहेब मिसाळ, नाझरे येथील संभाजी हरिहर, जुनोनी येथील ज्ञानेश्वर शिंदे उपस्थित होते. गावाचा सर्वांगीण विकास हेच ध्येय असून ग्रामस्थांचा पाठिंबा प्रेरणादायी असल्याचे मत उपसरपंच हणमंत मिसाळ यांनी व्यक्त केले. हणमंत मिसाळ हे जनतेच्या विश्वासाला पात्र ठरलेले असल्याने ऐक्य आणि विकासाला चालना मिळेल असा विश्वास माजी आमदार दिपकआबा साळुंके पाटील यांनी व्यक्त केला.



## इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेजमध्ये वृक्षांना राख्या बांधून रक्षाबंधन

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.९ ऑगस्ट-**

शिक्षण प्रसारक मंडळ संचलित इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेजमध्ये विद्यार्थिनींनी कॉलेजच्या आवारातील झाडांना राखी बांधून पर्यावरणाप्रती असलेली आपली भावना व्यक्त केली.

वृक्ष लागवड व संवर्धनामुळे पर्यावरणाचे संतुलन टिकणार आहे. या दृष्टिकोनातून झाडांना राखी बांधून अनोखे रक्षाबंधन साजरे केले. राखी पौर्णिमेनिमित्त बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते व त्याच्याकडून आपल्या संरक्षणासाठी भाऊ कटिबद्ध असल्याचे दाखवून देते. यास अनुरूप पर्यावरणाच्या रक्षणासाठी आपण पुढे यावे तसेच पर्यावरण आपले रक्षण करते. त्यामध्ये वृक्षसंपदा महत्त्वाचा घटक असल्याने झाडांना राखी बांधून आपले कर्तव्य विद्यार्थिनीनी पार पाडले. यावेळी मंगळवेढा तालुका माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी तसेच प्राचार्य रवींद्र काशीद, उपप्राचार्य तेजस्विनी कदम यांच्यासह कला, वाणिज्य, शास्त्र, व्यवसाय शिक्षण विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## युवकांनी राष्ट्रपुरुषांचे विचार आचरणात आणावेत : शंभूराजे सूर्यवंशी

■ क्रांतीदिनानिमित्त व्यसनमुक्त युवक संघाचे शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.९ ऑगस्ट-**



गुरसाळे (ता. माळशिरस) येथे क्रांती दिनाच्या निमित्ताने व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र यांच्या माध्यमातून एक दिवसीय संस्कार शिबीर आयोजित करण्यात आले होते. या एक दिवसीय संस्कार शिबिरात,ग्रामप्रदक्षिणा दिंडी, विद्यार्थ्यांचे मनोगत, व्याख्यान, शालेय साहित्य वाटप हे उपक्रम राबविण्यात आले.

व्यसनमुक्त युवक संघटनेच्या वतीने राज्यातील प्रत्येक तालुका स्तरावर एक दिवसीय संस्कार शिबीर आयोजित केले जात असून या शिबिराच्या माध्यमातून युवकांना निर्व्यसनी व सदाचारी बनविण्यासाठी त्यांना राष्ट्रपुरुषांच्या त्यागाची व त्यांनी समर्पित केलेल्या त्यांच्या बलिदानाचा इतिहास सांगितला जातो. जेणेकरून या युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होऊन ते राष्ट्रापती आपली कर्तव्य व निष्ठा स्मरणात ठेवतील. या एकदिवसीय शिबिरात सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, भगतसिंग या राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे पूजन युवाछावा संघटनेचे प्रदेशअध्यक्ष शंभूराजे सूर्यवंशी यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी गावातून व्यसनमुक्तीचे प्रबोधन करण्यासाठी दिंडी काढून घोषणा देण्यात आल्या. ज्ञानोबा तुकाराम या गजरात निघालेल्या दिंडीत ग्रामस्थांनी आपला सहभाग नोंदवला. या वेळी राष्ट्रबंधू राजीव दीक्षित गुरुकुल मधील विद्यार्थी यांनी आपल्या छोट्याश्या भाषणात हुतात्मा राजगुरू यांच्या विषयी आपले विचार व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रात दुपारी एक वाजता युवाछावा संघटनेचे राज्याचे प्रदेशाध्यक्ष शंभूराजे सूर्यवंशी यांनी क्रांती या विषयावर आपले व्याख्यान दिले. या वेळी त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी, भगतसिंग, सुखदेव, व राजगुरू यांनी देशाप्रती केलेल्या त्यागाची व बलिदानाची गाथा उपस्थित समजुन सांगताना त्यांच्या संपूर्ण इतिहास डोळ्यासमोर उभा केला. या वेळी ते म्हणाले की, आजच्या युवकांनी वाचन वाढवून आपल्या देशातील राष्ट्रपुरुषांच्या जीवनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. बाहेरच्या देशात शिक्षण घेऊन ब्यारिस्टर झालेले महात्मा गांधी यांनी आपले संपूर्ण जीवन देश स्वतंत्र कसा होईल यासाठी समर्पित केले. त्याच बरोबर शहीद भगतसिंग यांनी वयाच्या २३ व्या वर्षी इंग्रजाना या भारत देशातून परत जाण्यासाठी लढा उभा केला. या सर्व क्रांतिकारकांचे एकच ध्येय होते ते म्हणजे स्वातंत्र्य. ज्यामध्ये कोणताही स्वार्थ नव्हता होती ती फक्त आणि फक्त राष्ट्रभक्ती. सात लाख हुतात्म्यानी आपल्या प्राणाचे बलिदान दिल्याने आपण आज या भारत देशात वास्तव्य करीत आहोत. यासाठी आपनास निर्व्यसनी व देशप्रेमी असणं आवश्यक आहे. यावेळी शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीचे औचित्य साधून गुरसाळे गावात ७५१ वृक्षाची लागवड यावेळी व्यसनमुक्त युवक संघटनेच्या माध्यमातून करण्याचा संकल्प या गावातील शिलेदार यांनी प्रारंभ आज केला. यावेळी ॲड. लक्ष्मण मगर, समाधान सूर्यवंशी, जिल्हा अध्यक्ष विजय पराडे, पोपटराव जमदाडे, रणजित पराडे, नानासो पवार, किरण देवकर, रणवीर जाधव,संजय सुतार, शरद रायते, ज्ञानेश्वर पवार, नंदकुमार खंडागळे,तुषार पवार, दिपक सुतार, संजय चव्हाण, योगेश गोसावी, आनंद भोसले, जितेंद्र फडतरे, श्रवण पवार, आदिसह ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी तसेच श्री संत ज्ञानेश्वर भजनी मंडळातील सर्व वैष्णव बांधव उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘फार्मर आयडी’ नोंदणीत सोलापूर जिल्हा राज्यात चौथा

■ ५ लाख ५३ हजार ८१४ शेतकऱ्यांनी केली नोंदणी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

ॲग्रीस्टॅक ही केंद्र सरकारची एक योजना आहे, ज्यामध्ये शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळखपत्र तयार केले जाणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यात मिळण्यास मदत होते; यासाठी जिल्ह्यातील नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी डिजीटल ओळखपत्रासाठी नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले. दरम्यान, या योजनेसाठी संपूर्ण राज्यातील शेतकरी नोंदणी करीत असून, आपला जिल्हा ४ थ्या स्थानी असल्याचीही माहिती देण्यात आली. आजतागायत ५ लाख ५३ हजार ८१४ शेतकऱ्यांनी केली नोंदणी असून, उर्वरित शेतकऱ्यांनीही फार्मर आयडी मिळविण्यासाठी आपले नाव नोंदविण्याची गरज आहे.




### राज्यात अहमदनगर जिल्हा आघाडीवर

ॲग्रीस्टॅक या योजनेत शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केलेल्यांमध्ये अहमदनगर जिल्हा अव्वलस्थानी आहे. या जिल्ह्यातील ७ लाख १२ हजार १३० शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. तर नाशिक जिल्हा दुसऱ्यास्थानी, पुण्याचा तिसरा क्रमांक तर सोलापूर जिल्ह्याचा चौथा क्रमांक आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून ५ लाख ५३ हजार ८१४ जणांनी फार्मर आयडीसाठी पोर्टलवर नोंदणी केली आहे.

ॲग्रीस्टॅक योजनेत, प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक ओळख क्रमांक (णपळीींश त्र्रीशी खऊ) देण्यात येणार आहे. या क्रमांकाच्या आधारे, शेतकऱ्यांना विविध सरकारी योजना जसे की, पीएम किसान सन्मान निधी, पीक विमा, पीक कर्ज आणि इतर कृषी अनुदानाचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यात मिळणार आहे. या योजनेत, शेतकऱ्यांची जमीन, पिके आणि इतर कृषीविषयक माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल.

### जिल्ह्यात ६१.९७ टक्के नोंद; बार्शी आघाडीवर

सोलापूर जिल्ह्यात संपूर्ण शेतकरी ८ लाख ९३ हजार ६७७ असून, यापैकी ५ लाख ५३ हजार ८१४ शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. यामध्ये बार्शी ६६०३६ शेतकऱ्यांनी ७४.७८ टक्के सर्वाधिक नोंदणी केली आहे. तर अक्कलकोट ४९३१२-६९.९५ टक्के, करमाळा ५८५४४-६८.३३ टक्के, उत्तर सोलापूर १९२५५ ६५.६३, द. सोलापूर ३६४१६-६४.६५, मंगळवेढा ४३२८६-६३.५८, माढा ५८७४७-६१.७३, पंढरपूर ५८६७९-६०.०९, मोहोळ ४४७३२-५५.५९, माळशिरस ५९८९९-५३.१६, सांगोला ५८९०८-६१.९७ अशा एकूण ५ लाख ५३ हजार ८१४ शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. यामध्ये बार्शी आघाडीवर असून, मोहोळ, माळशिरस आणि सांगोला तालुका पिछाडीवर आहे. यासाठी त्यांची बैठक घेवून सुचना केल्या आहेत.

**-अभिजित पाटील, आरडीसी, सोलापूर**

यामुळे, शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी हेलपाटे मारावे लागणार नाहीत. या फार्मर आयडीमुळे, शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यात मिळेल. याद्वारे शेतकऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात असल्याने, प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल. शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ वाचेल. ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी, शेतकऱ्यांना त्यांचा आधार कार्ड, बँक खाते क्रमांक आणि इतर आवश्यक माहिती द्यावी लागेल. दरम्यान, जिल्ह्यातील ३८ टक्के शेतकऱ्यांनी अजून या नोंदणीत सहभाग नोंदविला नाही; यामुळे भविष्यात या शेतकऱ्यांना शासनाच्या योजना मिळविताना अडचणी येवू शकतात असाही इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## महत्वाचे...



## सोजर स्कूलमध्ये विश्व संस्कृत दिन साजरा

**बार्शी, दि. ९ ऑगस्ट-**

सोजर इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाच्यावतीने ‘विश्व संस्कृत दिन’ साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संदीप पोळ यांच्या समवेत सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी संस्कृत व्याकरणकर्ता महर्षि पाणिनि यांच्या प्रतिमेचे पूजन केले. संस्कृत दिनाच्यानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात इयत्ता ८ वीच्या विद्यार्थिनी अहिल्या घोलप आणि हर्षदा शेळके यांनी अनुक्रमे शठं प्रति शाठ्यम् आणि सत्यप्रिय काष्ठिकः या संस्कृत कथा सादर केल्या. तसेच इयत्ता ९ वीच्या कृष्णा इंगळे याने संस्कृत आणि हिन्दी भाषेचा मिलाप असलेली गन्त्री गच्छति-गाडी जाती या कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. तसेच याप्रसंगी आठवीच्या वर्गाव्दारे वस्तु प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक संस्कृत शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी केले तर सूत्रसंचालन हर्षदा शेळके हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले.

## रक्षाबंधननिमित्त श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**पंढरपूर दि. ९ ऑगस्ट-**

रक्षाबंधन निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, नाम, कौस्तुभ मणी, मोत्याचा तुरा, दंडपेट्ट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याची कंठी, मोत्याचा हार, बाजीराव कंठी, मत्स्य जोड, तुळशीची माळ, सहा पदरी जान्हवे, लहान-मोठा शिरपेच, राखी तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक राजेंद्र सुभेदार यांनी दिली.



## गरम पाण्यात पडून तीन वर्षाची बालिका जखमी; अंकोली येथील घटना

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

चुलीतील लाकूड हलविल्याने खाली पडलेल्या गरम पाण्यात भाजून तीन वर्षाची बालिका भाजून जखमी झाली. हा प्रकार शनिवारी सकाळी अकराच्या सुमारास घडला. प्रणिती दत्तात्रय शिंदे (वय ३ वर्ष, रा. अंकोली ता मोहोळ) असे भाजून जखमी झालेल्या बालिकेचे नाव आहे. शनिवारी सकाळच्या सुमारास प्रणिती शिंदे हिच्या आईने घरातील चुल पेटवून त्यावर पाणी तापवले जात होते. प्रणिती घरात खेळत होती. तिने चुलीतील लाकूड पुढे मागे करत असताना गरम पाण्याचे पातेले चुलीवरून खाली पडल्याने त्यातील पाणी जमिणीवर पसरले. त्या गरम पाण्यात प्रणिती पडल्याने ती भाजली. मोहोळ येथील खासगी रुग्णालयात उपचार करून वडील दत्तात्रय शिंदे यांनी शनिवारी दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## लक्ष्मीबाई कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींनी बनवल्या सैनिकांसाठी राख्या

**अकलूज, दि. ९ ऑगस्ट-**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित लक्ष्मीबाई कन्या प्रशालेत सालाबाद प्रमाणे याही वर्षी राखी तयार करणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थिनींनी सोबत आणलेल्या वेगवेगळ्या रंगीबेरंगी मनी, पेपर, राखी सजावटीसाठी लागणारे वेगवेगळ्या साहित्याचा वापर करून आपल्या कल्पकतेनुसार छान छान राख्या तयार केल्या.आपण स्वतः तयार केलेल्या राख्या देशाचे रक्षण करणारे सैनिक हातामध्ये बांधणार या गोष्टीचा आनंद झाल्याचा भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केल्या. राख्या तयार करणे कार्यशाळेतून विद्यार्थिनींना स्वतःनवनिर्मिती करण्याची, व्यवसायिक शिक्षण घेण्याची संधी मिळाली.विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्या या मराठा रेजिमेंटच्या सैनिकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छासह पाठवण्यात आल्या. कार्यशाळेसमुख्याध्यापिका अनिता पवार यांनी कौतुक केले. चित्रकला शिक्षक विशाल लिके यांनी मार्गदर्शन केले.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने अकलूज येथे आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ९ ऑगस्ट-**

प्रताप क्रीडा मंडळ शंकर नगर अकलूज यांच्या वतीने रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल अकलूज येथे भव्य राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा मा. कु. स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

मंडळाचे संस्थापक मा. श्री जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९७८ पासून कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या प्रताप क्रीडा मंडळाने राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, बालक्रीडा स्पर्धा, समूहनृत्य स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, रत्नाई मिठाई वाटप, रक्तदान शिबीर असे अनेक उपक्रम राबवले आहेत. याही वर्षी सालाबाद प्रमाणे दि. १७ ऑगस्ट रोजी भव्य राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यास्पर्धेस राज्यातील मुंबई, उस्मानाबाद, पंढरपूर, माढा, सांगोला, मंगळवेढा, करमाळा यासह विविध भागातील अनेक संघ सहभागी होतील. या स्पर्धेसाठी एकुण १ लाख ३० हजार रु.ची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये प्रथम क्रमांकास ४४ हजार रु, द्वितीय क्रमांकास ३३ हजार रु, तृतीय क्रमांकास २२ हजार रु, चतुर्थ क्रमांकास ११ हजार रु व सन्मानचिन्ह, तर उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या ४ संघास प्रत्येकी ५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे.



स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना मंडळाच्या वतीने भोजनाची सुविधा देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी ९८६०३३१७१७, ९३२५२५२९९६/ ९४२०७८२३२३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाचे सचिव बिभीषण जाधव यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, स्पर्धा प्रमुख भीमाशंकर पाटील, यशवंत माने देशमुख, बाळासाहेब सावंत, सुभाष चव्हाण यांचे सह सर्व संचालक व सदस्य उपस्थित होते.

# कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ करमाळा शेलगाव चौकातील घटना

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

करमाळा येथील जेऊर येथून शेलगाव (वांगी ) येथे येत असताना शेलगाव चौकातील पान समोर कंटेनरने पाठीमागून धडक दिली. यात गंभीर जखमी होऊन एकाचा मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी रात्री ८ च्या सुमारास घडला. पिंटू श्रीरंग केकाण (नय ४५, रा. शेलगाव (वांगी) असे मृत पावलेल्याचे नाव आहे. शुक्रवारी रात्री करमाळ्यातील जेऊर येथील काम संपवून पिंटू हे दुचाकी चालवित घराच्या दिशेने निघाले होते. दरम्यान शेलगाव चौकात आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला कंटेनरने पाठीमागून धडक दिली. यात डोक्याला जखम होऊन पिंटू हे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर जेऊर येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शनिवारी रात्री १२.५५ वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# राजपत्रित अधिकारी संघाच्या बेमुदत रजा आंदोलनामुळे शिक्षण विभागाचा कारभार ठप्प

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

शिक्षकांच्या शालार्थ आयडी देण्याच्या प्रकरणामध्ये काही अधिकाऱ्यांनी अनियमितताकरून भ्रष्टाचार केलेल्याचा ठपका ठेवून राज्यातील अनेक अधिकाऱ्यांना अटक केल्याच्या

निषेधार्थ शुक्रवार ८ ऑगस्टपासून अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने पुकारलेल्या बेमुदत रजा आंदोलनात जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, निरंतर शिक्षण अधिकाऱ्यांसह, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी सहभागी झाल्याने जिल्ह्यातील शिक्षण विभागाचा कारभार ठप्प झाला आहे. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवत एक दिवसाची रजा घेऊन शुक्रवारी आंदोलनात सहभाग नोंदवला. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांकडून जिल्हा परिषद प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांना निवेदन देऊन आंदोलनास पाठिंबा देण्यात आला. पवित्र पोर्टल मार्फत झालेली शिक्षक भरती आणि त्यांचे शालार्थ, शिक्षिकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता, अल्पभाषिक व अल्पसंख्यांक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता, सेवक संच दुरुस्ती अशी अनेक कामे सध्या प्रलंबित असताना अधिकाऱ्यांच्या अटक सत्रामुळे कोणतेही अधिकारी नियमित असणारी कामेही करायला सध्या धजावत नाहीत. हा प्रकार सुरू असताना शिक्षण विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या बेमुदत आंदोलनाची ठिणगी पडल्याने राज्यातील शिक्षण विभागाचा कारभार सध्या तरी ठप्प झाला आहे.

## अक्कलकोटच्या धानेश्वरी मंदिर आणि कल्याण मंटपसाठी मदतीचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

तीर्थक्षेत्रामुळे अनेक भक्त राज्यभरातून अक्कलकोट मध्ये येतात. यामुळे अक्कलकोट शहरातील ब्यागेहळ्ळी रोड परिसरात श्री.श्री. १०८ ष. ब्र. राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली श्री धानेश्वरी मंदिर आणि श्री महातपस्वी गुरुशांत शिवाचार्य मंगल्य भव्य मंटप निर्माण होत आहे. राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यामध्ये असंख्य शिष्य भक्तगण आहेत. भक्तगणांच्या सहकार्याने अक्कलकोट शहरात श्रीक्षेत्र गुड्डापूर येथील श्री धानेश्वरी मंदिर साकारत आहे. मंदिर आणि कल्याणमंटप उभारणीसाठी सुमारे अडीच कोटी रुपये खर्च होणार आहे. आत्तापर्यंत असंख्य भक्तगणांच्या सहकार्याने या बांधकामासाठी एक ते सव्वा कोटीपर्यंत खर्च झाले आहेत.

भव्य दिव्य अशा श्री धानेश्वरी मंदिर आणि महातपस्वी श्री गुरु शांत शिवाचार्य कल्याण मंटप साकारण्यासाठी भक्तांनी मदत करण्याचे आवाहन हुबळी मठाचे राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केला आहे.

सोलापूर तरुण भारत
41 YEARS ANNIVERSARY
Best Wishesh From...
ADV. ABDULQUADIR SHABBIRAHMED AUTI
Advocate Bombay High Court
+9193738 746641 | +91-8446 940615
Office : AAWI, Room No. 36, 1" Floor Bombay High Court, Fort Mumbai-400032.
Office : flat no. 402, 4th- floor Central Park Near Yashodhara Hospital 115, Siddeshwar Peth Solapur 413001.

सोलापूर तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
माझी वसुंधरा
।। जनसेवा हिच ईशसेवा ।।
मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी
जिल्हा - सोलापूर
MAINDARGI MUNICIPAL COUNCIL | Dist : SOLAPUR
Web:- www.maindargimc.org
Email : maindargimuncipalcouncil@gmail.com
ऑफिस - २५५०२८-०२१८१
जा.क्र.एम/कावि/२/८०८/२०२५
दिनांक : ०८/०८/२०२५
जाहीर आवाहन
स्वच्छ भारत मिशन (शहरी) व माझी वसुंधरा अभियान ६.० अभियान अंतर्गत, मैंदर्गी नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या घरामध्ये निर्माण होणारा कचरा हा ओला व सुका असा वेगवेगळा करुनच घंटागाडीकडे देण्यात यावा, कोठेही रस्त्याच्या बाजूला किंवा अडगळीच्या ठिकाणी कचरा टाकु नये, रस्त्याच्या बाजुला टाकलेल्या कच–यामुळे दुर्गंधी होऊन रोगराई पसरु शकते. असा कचरा रस्त्याच्या बाजुला टकताना निदर्शनास आल्यास मैंदर्गी नगरपरिषद मार्फत त्या नागरिकांवर कायदेशीर कारवाई व र.रु.५००/– इतका दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आपली मैंदर्गी स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करावे.
अर्जुन सुरवसे
(मुख्यधिकारी)
मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## प्रायोगिक रंगमंच संघाची सोलापूर कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी नाट्य लेखक जयप्रकाश कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने 'प्रायोगिक रंगमंच संघ' मुंबई या संस्थेला आपली घटक संस्था म्हणून अधिकृत मान्यता दिली असून प्रायोगिक रंगमंच संघाच्या सोलापूरातील सभासदांची विशेष सभा रंगकर्मी जयप्रकाश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८ ऑगस्ट रोजी पार पडली. सोलापूरात प्रायोगिक रंगभूमीची चळवळ विस्तारण्यासाठी प्रायोगिक रंगमंच संघाची शाखा स्थापन करण्यात आली असल्याचे अध्यक्ष जयप्रकाश कुलकर्णी यांनी सांगितले.



शाखेचे अन्य पदाधिकारी पुढील प्रमाणे : श्रीपाद येरमाळकर (उपाध्यक्ष), सुशांत कुलकर्णी (प्रमुख कार्यवाह), शिवप्रसाद चिक्का (कोषाध्यक्ष), संदिप जाधव (सहकार्यवाह) तर कार्यकारिणी सदस्य म्हणून विजया कोकणे, अ‍ॅड.योगेश कुलकर्णी, प्रशांत शिंगे, रमेश श्रावण, अशोक बनसोडे, गुरुप्रसाद इनामदार या रंगकर्मीची निवड करण्यात आली. या जिल्हास्तरीय शाखांच्या माध्यमातून स्थानिक रंगकर्मींना सक्रीय सहभागी करून प्रायोगिक रंगभूमीच्या विचारांची आणि प्रयोगांची सशक्त पेरणी महाराष्ट्रभर करण्याचे आवाहन प्रायोगिक रंगमंच संघ मुंबईचे अध्यक्ष निर्माते दिलीप दळवी यांनी केले आहे

## ▶▶ महत्वाचे...

### अ‍ॅडव्हेंचर पार्क मधून ४० हजारांची चोरी

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

सिद्धेश्वर पेठेतील अ‍ॅडव्हेंचर पार्क मधून ४० हजारांच्या सात स्टील रोपांची चोरी झाली. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. ही घटना बुधवारी दि ६ रोजी दुपारी साडेचार च्या सुमारास ही उघडकीस आली. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीसांत गुन्हा दाखल केला आहे. केदार अहमद शेख (वय ३१ रा. श्रीराम सदर अपार्टमेंट सिद्धेश्वर पेठ सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. शेख यांनी सिद्धेश्वर पेठेतील एडवेंचर पार्कमध्ये अ‍ॅडव्हेंचर गेम साठी स्टीलचे रोप लावले होते हे ४० ते ४५ फूट लांबीचे होते. तर ते स्टील रोप चोरट्याने चोरून नेले आहेत. तपास पोलिस नाईक भिमदे करीत आहेत.

### हॅण्डल लॉक करून ठेवलेल्या दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

शहरातील लष्कर परिसरातील एका घरासमोर हॅण्डल लॉक करून लावलेली २० हजाराची ची दुचाकी चोरट्याने लंपास केली.ही घटना एक ऑगस्ट रोजी पहाटे पाचच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत शाहीर अब्दुल मजीद शेख (वय३९ रा. दक्षिण सदर बाजार लष्कर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलीसांत गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी शाहीर शेख यांनी ३१ जुलै रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास घरासमोर दुचाकी ( एम एच १३ ए बी २०४७) ही हँडल लॉक करून लावली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे पाहिले असता दुचाकी जागेवर नव्हती,कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केली होती. या प्रकरणाचा तपास हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### कार परत न दिल्याने फसवणुकीचा गुन्हा

सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

भाड्याने घेतलेल्या कारचे भाडेही दिले नाही, तसेच कार ही परत न करता फसवणूक केली. याप्रकरणी दोघांविरुद्ध विजापूर नाका पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत राजकुमार अर्जुन घोडके (रा. कंदलगाव तालुका दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दीपक गिरधर खजिनदार (रा. कंदरगाव, तालुका दक्षिण सोलापूर) तौफिक आसाम तांबोळी (रा. कुमठा नाका सोलापूर) अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी यांनी १६ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास हातुरे वस्ती मधील रेल्वे गेट जवळ संशयतांशी कार भाड्याने देण्याचा व्यवहार केला होता. त्यानुसार संशयीतांनी त्यांना कारचे भाडे दिले नाही. भाडे न दिल्यामुळे कार परत मागितली असता त्यांनी ती दिली नाही, संशयित आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा विश्वासघात केला आहे. पोलिस हवालदार परदेशी पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीला धडक देणाऱ्या कारचालकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

दुचाकी ला धडक देऊन एकाला जखमी केल्याप्रकरणी कार चालकाविरुद्ध सलगर वस्ती पोलीसांत गुन्हा दाखल केला आहे. ही घटना देगाव काडादी वस्तीजवळ घडली आहे. जखमी अश्फाक इलाई शेख (वय २९ रा. पाटील नगर देगाव तालुका उत्तर सोलापूर) हे चार ऑगस्ट रोजी रात्री पावणेआठच्या सुमारास सीएनएस हॉस्पिटल कडे निघाले होते. तेव्हा काडादी वस्तीजवळ अनोळखी पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडक दिल्याने हा अपघात घडला या अपघातात ते गंभीररीत्या जखमी झाले. अपघातानंतर चालकाने कारसह पलायन केले. पुढील तपास हवालदार शेख करीत आहेत.

### कार पलटी होऊन एक जखमी

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट -**

टेंभुर्णी ते सोलापूर येत असताना यावली पुलाजवळ ताबा सुटून कार पलटी झाल्याने एकजण जखमी झाला. हा अपघात शनिवारी म ध्यरात्री दोनच्या सुमारास झाला. अनिल अंबरनाथ वाडेकर (वय ३०, रा. उत्तर कसबा, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास अनिल हा कार चालवित टेंभुर्णी येथून सोलापूरकडे येत होता. यावली पुलाजवळ आल्यानंतर कारवरील ताबा सुटल्याने कार पलटी होऊन डोक्याला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून नातेवाईकाने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# मार्कंडेय महामुनींचा रथोत्सव भक्तीभावात

## ● मंदिरात विविध धार्मिक विधी; 'जय मार्कंडेय'चा अखंड जयघोष!













**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट -**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनींच्या रथोत्सव शनिवारी मोठ्या जल्लोष साजरा करण्यात आला. सुमारे ४० मंडळ यामध्ये सहभागी झाली होती. मिरवणुकीत बाल वारकऱ्यांचे उभे रिंगण, विविध आकर्षक देखावे यांनी लक्ष वेधले. याचसोबत विविध मंडळांनी लेझीम, ढोल, नृत्य कला सादर करून मिरवणुकीत रंगत आणली.

पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनींचा रथोत्सव शनिवारी मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा साजरा झाला. यानिमित्त सिद्धेश्वर पेठेतील मार्कंडेय मंदिरात विविध धार्मिक विधी पार पडले. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. रथोत्सवानिमित्त मार्कंडेय मंदिरात पहाटे चारपासून विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली. याअंतर्गत महर्षी मार्कंडेय अभिषेक महापूजा ही आदित्य कोंगारी, चंडीयाग, नवग्रह पूजन रंजीत गड्डम, पुष्पा इप्पलपल्ली तर भृगुम हर्षी अभिषेक महापूजा सिद्धेश्वर पुलगम यांच्या हस्ते करण्यात आली. मंदिरावर पद्मध्वजारोहण पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, पद्मशाली पुरोहित संघम चे अध्यक्ष श्रीनिवास म्याडम, सचिव आत्माराम चिप्पा, मार्कंडेय मंदिराचे अर्चक राघवेंद्र आरकाल सहकार्याने धार्मिक विधी पार पडले.मार्कंडेय मंदिरात पहाटे चार वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत पद्मशाली बांधवांची मांदियाळी दिसून आली.

'जय मार्कंडेय...' चा अखंड जयघोष सुरू होता. दर्शन घेतल्यावर भक्तगणांनी मंदिरातील पहिल्या मजल्यावर पुरोहितांकडून जानवे धारण करतानाच कापसाच्या राख्याही बांधून घेतल्या. सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास मंदिरापासून रथाची पूजा सुदर्शन गुंडला यांच्या हस्ते तर मिरवणुकीचा प्रारंभ पोलिस आयुक्त एम. राजकुमार, आ. देवेंद्र कोठे, मध्यप्रदेश सरकारचे प्रधान सचिव नरहरी परकीपंडला, तेलगू अभिनेता व जनसेना पक्षाचे प्रचार समिती अध्यक्ष आर. के. सागर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव संतोष सोमा, विश्वस्त जनार्दन कारमपुरी, रामकृष्ण कोड्याल, मुरलीधर आरकाल, नरसप्पा इप्पाकायल, रामचंद्र जन्नू, पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कमटम आदी उपस्थित होते.

### मिरवणुकीत या मंडळांचा सहभाग

कर्ण साम्राज्य, संयुक्त हिंदुत्व साम्राज्य, दत्तात्रय शक्ती लेझीम संघ, महात्मा गांधी मित्र मंडळ, न्यू डी डान्स ग्रुप, बजरंग सेना, रामराज्य, रामराज्य, फ्रेंड्स डान्स ग्रुप, घोंगडे वस्ती प्रतिष्ठान, कर्ण शक्ती प्रयोग मंडळ, डीजे प्रतिष्ठान, रुबाब बॉईज, आदर्श प्रतिष्ठान, घरकुल प्रतिष्ठान यांच्यासह ३५ ते ४० मंडळे सहभागी झाली होती.



मिलिंद फडके



सुहास जोशी



विष्णूदास मालू



डॉ. विजय शिवपूजे

## डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या अध्यक्षपदी विष्णूदास मालू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्ह्यातील सर्वांत जुन्या आणि नावाजलेल्या डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या अध्यक्षपदी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते विष्णुदास मालु यांची निवड करण्यात आली आहे.

यावेळी नूतन कार्यकारिणी आणि पदाधिकारी यांची निवड करण्यात आली असून रक्तपेढीच्या उपाध्यक्षपदी डॉ. विजय शिवपूजे तर सचिवपदी मिलिंद फडके यांची निवड झाली आहे. सुहास जोशी यांची कोषाध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात आली आहे. यावेळी कार्यकारिणी सदस्य म्हणून महेंद्र कावरे, डॉ. किरण सारडा, डॉ. शांतीनाथ बागेवाडी, माधव देशपांडे, गिरीष दर्बी, अभिजीत टाकळीकर यांची तर निमंत्रित म्हणून डॉ. भारत मुळे, प्रकाश कुलकर्णी आणि राघवेंद्र मुजुमदार यांची निवड करण्यात आली.

## शरणु हांडे अपहरणप्रकरण; तिघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

भाजप आमदार गोपीचंद पडळकर समर्थक शरणू हांडे अपहरणप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी आणखी दोघांना निंबाळ (ता. इंडी, जि. विजयपूर, कर्नाटक) परिसरातून शुक्रवारी रात्री ताब्यात घेऊन अटक केली आहे. या दोघांनाही १२ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. शनिवारी रात्री एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणीतील सातव्या आरोपीस निलमनगर परिसरातून अटक केली. यापूर्वी या गुन्ह्यात चौघांना अटक करण्यात आली आहे.

राकेश भिमाशंकर कुदरे (वय २१, रा. मुमताज नगर, सोलापूर) आणि श्रीकांत बाबूराव सुरपुरे (वय २४, रा. सिध्दरामेश्वर नगर, एमआयडीसी, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर शनिवारी रात्री समर्थ वासुदेव भैरी (वय १९, रा.निलम नगर सोलापूर) याला शनिवारी रात्री अटक करण्यात आली आहे. यापूर्वी या गुन्ह्यात अमित म्हाळप्पा सुरवसे (वय २९, रा. मणिधारी सोसायटी, अक्कलकोट रोड, सोलापूर), सुनिल भिमाशंकर पुजारी (वय २०, रा. साईबाबा चौक, सेलापूर), दिपक जयराम मेश्राम (वय २३, रा. लोकमंगल हॉस्पीटलजवळ, आशा नगर, सोलापूर), अभिषेक गणेश माने (वय २३, रा. एकता नगर) यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. याबाबत विष्णु शिवराया हांडे (वय ३५, रा. साई नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शरणु शिवराया हांडे (वय ३६) असे अपहरण करून जखमी करण्यात आलेल्या पडळकर समर्थकाचे नाव आहे.

आरोपी अमित सुरवसे याने २०२१ साली गोपीचंद पडळकर यांच्या गाडीवर दगडफेक केली होती. याचा बदला म्हणून मे महिन्यात शरणु हांडे याने अमित सुरवसे याला मारहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात वायरल झाल्यानंतर शरणु हांडे आणि अमित सुरवसे यांनी वाद मिटवून घेतला होता. पण अमित याने याच मारहाणीचा आणि अपमानाचा बदला घेण्यासाठी आपल्या मित्राच्या मदतीने शरणु याचे ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास साई नगर येथील राज बिअर शॉपी येथून अपहरण केले. यासाठी त्याने सुरुवातीला पुण्यातून एमएच १२ एक्सएक्स ६५४७ क्रमांकाची कार भाड्याने घेतली. मित्रासह तो सोलापुरात आला आणि शरणु हांडे याला घराजवळून शस्त्राचा धाक दाखवून अपहरण केले. शहर पोलिसांनी तात्काळ हालचाल करून चौघां आरोपींनी कर्नाटकातील होर्तीजवळून ताब्यात घेऊन हांडेंची सुटका केली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी हांडे यांचे अपहरण करुन हत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक विजय खोमणे तपास करीत आहेत.

## टेरिफ वाढवल्याने वस्त्रोद्योगाला फटका

● निर्यातदारांना धसका
● सोलापुरातून जवळपास २०० कोटींचे कापड होते अमेरिकेत निर्यात





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

अमेरिकेने भारतावर लागू केलेल्या ५० टक्के टेरिफमुळे सोलापुरातील वस्त्रोद्योगाला चांगलाच फटका बसणार आहे. निर्यातदाराला टेरिफचा धसका बसला आहे. टेरिफ वाढवल्याने सोलापुरातील वस्त्रोद्योगाला फटका बसणारच मात्र या काळात मोदींच्या पाठीशी ठाम उभे राहण्याची गरज असल्याचे सोलापूर चेंबूर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष राजू राठी यांनी व्यक्त केले.

भारतात डेअरी प्रॉडक्ट आयातीसाठी मोदी सरकारने परवानगी द्यावी याकरिता अमेरिकेचे ट्रम्प भारतावर दबाव आणण्याच्या हेतून टेरिफ लावत आहेत. मात्र अमेरिकेला नरेंद्र मोदी जुमानत नाहीत.सोलापुरातून वर्षाकाठी जवळपास ८०० कोटी रुपयांची वस्त्रोद्योगाची निर्यात होते. त्यापैकी एकट्या अमेरिकेत जवळपास दोनशे कोटी रुपयांचे कापड निर्यात सोलापुरातून केले जातात. यापूर्वी दहा टक्के टेरिफ होता तो २५ टक्के करून आता ५० टक्क्यापर्यंत वाढवण्यात आला आहे. आता जवळपास ६० टक्के टेरिफ द्यावा लागणार आहे. चायना, विहातनाम, बांगलादेशचा तेरीफ भारतापेक्षा कमी आहे. विक्री कमी झाल्याने रोजगार आणि अद्योजकांवर परिणाम होणार आहे. भारत सरकार यामधून पर्याय काढेल अशी माहिती सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम यांनी दिली.

सोलापुरातून एक्सपोर्ट होणाऱ्या वस्त्रोद्योग व्यापाऱ्यापैकी २५% एक्सपोर्ट हे अमेरिकेत होत आहे. त्यामुळे सोलापूरच्या वस्त्रोद्योग व्यापारावर परिणाम होणारच आहे, मात्र येथील व्यापाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहण्याचा निर्णय जाहीर केला. भारत देशाच्या हितासाठी येथील शेतकऱ्यांच्या हितासाठी अशा काळात भारतातील सर्व व्यापाऱ्यांनी आणि संघटनांनी मोदींच्या पाठीशी उभे राहण्याची गरज असल्याचं मत देखील सोलापुरातील व्यापारी व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे. अमेरिका हा जगावरील एक देश नाही की ज्याच्यावर आपली इकॉनोमी अवलंबून आहे. १८० देशांमध्ये भारत निर्यात करतो. दुसरीकडील निर्यात वाढली पाहिजे असे मत अक्कलकोट रोड एमआयडीसीचे अध्यक्ष तिलोकचंद कासवा यांनी मांडले.





## छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने पुष्पवृष्टी करून मार्कंडेय रथाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड यांच्यावतीने प्रतीवर्षाप्रमाणे यंदाही विजापूर वेस येथे आगमन झाल्यावर रथावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

मान्यवरांच्या सत्कार करून रथाला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, राम गायकवाड, बशीर सय्यद, राजू हुंडेकरी, रिजवान शेख, शोएब चौधरी, रिजवान पैलवान रिझवान दंडोती, तन्वीर गुलजार, कादर भागानगरी, रुस्तुम शेख, लक्ष्मण भोसले, तनवीर शेख, हारिस शेख, मुबीन शेख, बाबा शेख, सरफराज शेख, हुजेर बागवान, कय्युम मोहळकर, अफ्फान बागवान काशीफ बेलीफ, इरफान बावा, गफूर चौधरी, मोहसीन नदाफ सरफराज काझी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# स्वयंप्रकाश हेच परमसत्य होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट-**

विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय ज्यामध्ये होते. तसेच जे सर्व व्याप्त असून चेतन आहे व स्वयंप्रकाश आहे ते परम सत्य होय, असे श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर निरुपण करताना श्रोत्यांना प्रवचनमालेच्या १५ व्या सत्रात सम जावून सांगतात.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १५

आजच्या सत्रात डॉ जयवंत महाराज मंगलाचरणानंतर श्रीम द्भागवतातील पहिल्या स्कंधाचा, पहिल्या अध्यायाचा, पहिला श्लोकातील चिंतन भाविकांना स्पष्ट करुन सांगतात, की तो परमात्मा स्वयंप्रकाशी आहे तेच परमसत्य होय.

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वरत्
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ।। १ ।।

मग, महर्षी व्यासांना पूर्वपक्षाने प्रश्न केला की, विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय ज्याच्यामुळे होतो, त्याला सत्य म्हणावे; तो परम त्मा सत्य आहे. जर जग परमात्म्याने निर्माण केले म्हणता तर मग या जगात एवढं दु:ख कसं? त्यावर महर्षी वेदव्यास पुढे उत्तर देतात. तत्पूर्वी डॉ. जयवंत महाराज श्रोत्यांना हा पूर्वपक्ष म्हणजे हे सम जावून देताना म्हणतात- पूर्वपक्ष हा एखादा जिवंत व्यक्ती नसून एक विचारपद्धती किंवा मतप्रवाह आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर- पूर्वपक्ष म्हणजे आपल्या मताचा विरोधी किंवा भिन्न मत असलेला पक्ष, ज्याचे मत आपण आधी मांडतो, मग त्यावर उत्तर देतो अशी पद्धत होय.

जेव्हा एखाद्या तत्त्वाचा प्रतिपादन करायचे असते, तेव्हा आधी शक्य असलेल्या आक्षेपांना, शंका किंवा विरोधी युक्तिवादांना जागा दिली जाते. हाच तो पूर्वपक्ष.नंतर त्या पूर्वपक्षाचे समाधान करणारा भाग म्हणजे उत्तरपक्ष किंवा सिद्धांत होय. तेव्हा, हा विषयाची संपूर्ण छाननी होण्यासाठी पूर्वपक्ष महत्त्वाचा ठरतो. तर मग यावेळी हा पूर्वपक्ष म्हणजे शंका घेणारा येतो व म्हणतो- जर सर्व जीव एकाच परमात्म्याचे रूप असतील, तर पाप-पुण्य, नरक-स्वर्ग, साधू-दुष्ट याम ध्ये फरक का दिसतो? जर सर्व सारखे असते, तर हे भेद कसे आले? मग त्यावर उत्तर दिले जाते की अरे भेद हे केवळ अज्ञानामुळे (माया) दिसतात. जसे समुद्रात अनेक लाटा वेगळ्या दिसतात पण सगळ्यांचे स्वरुप पाणीच असते, तसेच जीव दिसायला वेगळे पण स्वरुपाने एकच ब्रह्म आहेत. पाप-पुण्य, हे लाटांच्या उंच-ठेंगण्यासारखे आहेत- पाण्याच्या स्वरुपाला फरक पडत नाही. या ठिकाणीही व्यासमहर्षींना पूर्वपक्ष म्हणतो तुम्ही म्हणता ज्याचे आम्ही ध्यान करतो तो सत्य आहे. तर मग त्याने निर्मीत केलेल्या जगात किती दु:ख आहे? हे कसं बरं! पुढे याची उकल डॉ. जयवंत महाराज सोदाहरण करुन देतात की, सोन्याचा दागिना बनविला जातो. त्या दागिन्यांमध्ये पूर्ण असते ते सोनेच असते. म्हणजे मूळ ते सोनचं आहे त्यापासून आवडीचा नक्षीकाम करुन दागिना बनला आहे. पण, जेव्हा तो दागिना मोडला जातो तेव्हा तो दागिना जो आकार आहे तो मोडला जातो सोने तसेच असते. अर्थात, इथे सोन्याला दिलेला आकार हा कल्पित आहे; खरे आहे ते सोनेच आहे. तद्वतच, परमात्म्यापासून हे विश्व निर्माण झाले. संपूर्ण विश्वात तो परमात्माच आहे. पण, इथे ही विश्व हे कल्पित आहे सत्य आहे तो केवळ परमात्मा होय. म्हणून परम सत्य म्हणजे ब्रह्म होय असा महत्वाचा सिद्धांत महर्षी व्यासांनी प्रथम श्लोकातून मांडलेला आहे. कोणी म्हणेल जगाच्या निर्मितीकरिता मायाही कारण आहेच. मग, मायेला सत्य म्हणा! पण, असे होत नाही. कारण, माया ही जड आहे; सत्य हे चेतन आहे . म्हणून जे चेतन ते सत्य होय. कोणी म्हणेल मग जीव चेतन आहे; त्याला सत्य म्हणा! पण असे होत नाही. कारण जीव हा स्वयंप्रकाशी नाही परप्रकाशी आहे व सत्य हे स्वयंप्रकाश आहे. यासंबंधाने डॉ. जयवंत महाराज प्रकाशाचे ४ प्रकार स्पष्ट करतात. - १) भौतिक प्रकाश २) विकारी प्रकाश ३) अविकारी प्रकाश ४) स्वयंप्रकाश. यानंतर पुढे डॉ. जयवंत महाराज सांगतात यावर कोणी म्हणेल की ब्रह्मदेव हा विश्व निर्माता आहे व चेतन आहे. तर मग त्याला सत्य म्हणा व त्याचेच ध्यान करा तर असे ही होत नाही. कारण ब्रह्मदेवाला ही जे स्फुरण आहे ते फक्त आणि फक्त परमात्म्यामुळे होय. याचे स्पष्टीकरण देताना महाराजांनी ब्रह्मदेव व श्रीकृष्ण यांच्यामध्ये गोपाळ व वासरे चोरण्याने घडलेले कथानक सांगून ब्रह्मदेव ही जिथे नतमस्तक होतात. तो परमात्मा म्हणजे श्रीकृष्ण होय. परमात्मा हा सृष्टिकर्ता असला तरी दु:ख हे जीवाच्या स्वकर्माचा परिणाम आहे; ईश्वर सर्वत्र साक्षी आहे पण कर्ता नाही. हे सांगून तोच एक परम सत्य होय हा सिद्धांत विविध पद्धतीने पटवून दिला.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. ११ ऑगस्ट २०२५ | आदित्यपूजन, |
| विक्रम संवत् २०८२ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण कृ. | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| प्रतिपदा (१२.०९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - धनिष्ठा (१३.५१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शोभन (२४.०१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२३.२३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# कोल्ड्रिंक कमी दरात विक्री करण्याच्या कारणातून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

टेंभुर्णी परिसरातील नंदर परिसरात कोल्ड्रिक कमी दरात विक्री करण्याच्या कारणातून तरुणाला मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवारी दुपारी चारच्या सुमारास झाली. अमन फिरोज मुजावर (वय २२) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. अमन हा टेंभुर्णी परिसरात कोल्ड्रिक विक्रीचे काम करतो. कोल्ड्रिकाची व्रिकी करण्याच्या कारणातून गणेश अनवणे याने लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने टेंभुर्णी येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री ११.३५ वाजता मित्र जावेद शेख याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# लेखाशीर्षामध्ये वाढली ८ कोटींची दायित्व रक्कम

## महापालिका उपसमितीत मंजूर झाला प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

महापालिकेच्या आस्थापनावरील सर्व विभागांच्या देखभाल दुरुस्ती लेखाशीर्षामध्ये विभाग प्रमुखांनी अवघ्या १५ दिवसापूर्वीच महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार एकंदरीत मागणी अहवाल सादर केला होता. यानंतर मात्र अचानकच प्रलंबित दायित्व आणि पुढील आवश्यक कामासाठी ज्यादा रकमा दाखवत वाढीव बजेटची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली. यानुसार मागविलेल्या नवीन मागणीत तब्बल ७ कोटी ८६ लाख ५६ हजार १२८ रुपयांची वाढ झाली.

या वाढीसह आता महापालिकेच्या विविध विभागांमधील लेखाशीर्षावरील एकूण मागणी रक्कम ही ३९ कोटी ८४ लाख ६१ हजार ९०४ इतकी झाली असून आता अधिनियमातील तरतुदीनुसार विविध विभागांनी त्यांच्या प्रलंबित दायित्व रकमेची तसेच पुढील आवश्यक कामासाठी मागणी केलेल्या रकमेचे नियोजन होऊन वाढीव रकमेला देखभाल दुरुस्ती या लेखाशीर्षाखाली अंदाजपत्रकात वाढ करण्याची मान्यता सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने उपसमितीमार्फत प्रशासक यांची नियुक्ती असलेल्या समितीकडून झटक्यात घेण्यात देखील आली आहे. सन २०२५- २६ च्या अंदाजपत्रकात विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८ आणि नगर अभियंता विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियंता, प्राणी संग्रहालय, घनकचरा व्यवस्थापन विभाग, भांडवली- रस्ते बांधणे, व इतर विभागांतर्गत विविध देखभाल व दुरुस्तीच्या लेखाशीर्षामध्ये आयुक्तांनी ठरवून दिलेल्या रकमेनुसार बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु झोन कार्यालय व इतर विभागांतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या लेखाशीर्षामध्ये मागील प्रलंबित दायित्वाची तसेच पुढील आवश्यक कामासाठी रक्कम अदा करण्यासाठी वाढीव बजेट तरतुदीची मागणी प्राप्त झाली. यानुसार महापालिका आयुक्तांनी याबाबत प्रलंबित दायित्व रकमेची माहिती मागविली होती. त्यानुसार दि. १७ जुलै रोजी खाते प्रमुखांच्या आढावा बैठकीमध्ये आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व विभागांकडून त्यांच्या प्रलंबितदायित्व व आवश्यक रकमेची माहिती प्राप्त झाली. यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या रकमेची वाढीव तरतूद करून देण्याबाबत आदेश झाले.

### बजेटवेळी प्रलंबित दायित्वाचा विसर

महापालिकेच्या प्रशासनाच्या वतीने विविध विविभागांच्या तब्बल दोन- दोन महिने वारंवार बैठका घेऊन सविस्तर पद्धतीने जमा-खर्च, दायित्व व इतर बाबींना घेऊन वार्षिक अंदाजपत्रक तयार केला जातो. या पद्धतीनुसारच चालू आर्थिक वर्ष २०२५- २६ हा बजेट देखील त्याच पद्धतीने घेण्यात आला. त्याला मार्च महिन्यात प्रशासकीय अंतिम मान्यता देखील मिळाली.

### ७.८६ कोटी रुपयांच्या वाढीवखर्च तरतुदीस झटपट मान्यता

मागणीनुसार १ ते ८ झोनपैकी ५ झोन कार्यालयांनी यापूर्वी केलेल्या मागणीला वगळता आणखी ४५ लाख ७२ हजार २१ रुपयांची अधिकची मागणी केली. यानुसार आधीची ३१ कोटी ९७ लाख ९५ हजार ७७६ रुपयांमध्ये ही रक्कम वाढ होऊन ती ३२ कोटी ४३ लाख ७७ हजार ७९७ रुपये इतकी झाली. शिवाय मानधन व कंत्राटी सेवकां वरील खर्च या लेखाशीर्षमध्ये १ ते ८ झोन कार्यालय, नगर अभियंता विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियंता, आरोग्य विभाग, प्रसुतीगृह, नागरी आरोग्य सेवा (युपीएचसी), घनकचरा व्यवस्थापन विभाग, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, पशुवैद्यकीय विभाग आणि मंडई विभाग यामधील ६ कोटी ८८ लाख १५ हजार १०७ रुपये वाढीव तरतुदीची मागणी करण्यात आली. शिवाय सांस्कृतिक कार्यक्रम खर्च, आरोग्य विभागासाठी अँटी रेबीज इंजेक्शन खरेदी, कामगार कल्याण विभागाचे सांस्कृतिक कार्यक्रम खर्च असे एकूण ५२ लाख ६९ हजार रुपये यासह एकुण ७ कोटी ८६ लाख ५६ हजार १२८ रुपयांच्या वाढीव खर्च तरतुदीची मागणी प्राप्त झाली आणि त्याला झटपट मान्यताही देण्यात आली आहे.




## लोकमंगल महाविद्यालयात स्पर्धा पारितोषिक वितरण

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. अमोल शिंदे हे लाभले होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बक्षीस वितरण समारंभात निबंध, वक्तृत्व व पोस्टर सादरीकरण या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. पोस्टर सादरीकरणात आदिनाथ ओऊळकर व निखिल धुमाळ यांनी प्रथम, दक्षता देशमुख व स्नेहल पाटील यांनी द्वतीय आणि हर्ष घोरपडे व प्रसाद नेटके यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. निबंध स्पर्धेत मैथिली कोळी यांनी प्रथम, सोनाली उन्हाळे यांनी द्वितीय क्रमांक व माऊली माळी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. वक्तृत्व स्पर्धेत प्रसाद नेटके यांनी प्रथम क्रमांक व मंजुनाथ कुंभार यांनी द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळविले. सूत्रसंचालन नक्षत्रा कांबळे व आभार तृप्ती जाधवर यांनी व्यक्त केले. प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा माने-देशमुख उपस्थित होते.




## मूल्यवर्धित सेवेकरिता हिरोतर्फे लक्ष्मी ऑटोमोबाईल्सचा सन्मान

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

येथील लक्ष्मी ऑटोमोबाईल्स या हिरो अधिकृत विक्रेत्याचा नुकताच पुणे येथे मूल्यवर्धित सेवा करिता सर्वृष्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले विभागीय व्यवस्थापक अभिषेक तिवारी यांच्या हस्ते चैतन्य पाटील यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. लक्ष्मी ऑटोमोबाईलेस हे हिरोचे सुमारे ४० वर्षाहून अधिक, अधिकृत डीलर असून यापूर्वीही अनेक सन्मानाने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.९ ऑगस्ट-**

देगाव रस्त्यावरील डॉ. आंबेडकर नगरातील घरापासून १०० मीटर अंतरावर अज्ञात कारणातून उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आला. विशाल दुर्योधन राजगुरु (वय २७, रा. डॉ. आंबेडकर नगर, देगाव) असे तरुणाचे नाव आहे. विशाल याने बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास अज्ञात कारणातून उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. त्यात त्याला त्रास होऊ लागल्याने तो घरापासून १०० मीटर अंतरावर मिळून आल्याने त्याला सायंकाळी ७.१५ च्या सुमारास भाऊ किरण याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# फरक बिलासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

अभय यावलकर समितीच्या शिफारशी लागू करा. किमान वेतनाची मुदत संपली असून नवीन किमान वेतनासाठी समिती गठित करावे. ३५ महिन्यांचे वाढीव फरक बिल काढावे, यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेवर आंदोलन करण्यात आले.

अनेक वर्षापासून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित आहेत. प्रत्येक आंदोलनावेळी शासनाकडून आश्वासने दिली जात आहेत. मात्र, मागण्या पूर्ण करत नसल्याने ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

ग्रामपंचायत कर्मचार्यांच्या वेतनासाठी असणारी उत्पन्न आणि वसुलीची अट रद्द करावी. कर्मचाऱ्यांचे वेतन पूर्वीप्रमाणे थेट बँकेत जमा करावे. लोकसंख्येच्या आकृतिबंधाची जाचक अट रद्द करावी. राहणीमान भत्ता शासनाच्या तिजोरीतून काढावा. जिल्हा परिषदेच्या एकूण रिक्त पदांची माहिती जाहीर करून दहा टक्क्यानुसार पदभरती करावे, अशा विविध मागण्या तत्काळ पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी आंदोलनावेळी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष तानाजी ठोंबरे, ए.बी. कुलकर्णी, हुवण्णा पुजारी, संतोष जमादार, सतीश गायकवाड, रशिद इनामदार, गणेश मोरे, दत्तात्रय कोकरे उपस्थित होते.



### अन्यथा आझाद मैदानावर आंदोलन

ग्रामपंचायत कर्मचार्यांचे मागण्या गेल्या काही वर्षापासून प्रलंबित आहेत. वारंवार आंदोलन करुनही शासनाकडून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य होत नाही. त्यामुळे सातत्याने आंदोलने करावी लागत आहे. त्यामुळे शासनाने आंदोलनाची दखल घेऊन मागण्या मान्य कराव्यात. अन्यथा मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन करणार इशारा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हुवण्णा पुजारी यांनी दिला आहे.

## निलम नगरात सासऱ्याला सुनेकडून मारहाण

**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

घरगुती कारणातून सासरा आणि सुनेचा वाद टोकाला गेला. याचे पर्यवसन सुनेने सास-याला लाथाबुक्यांनी मारण्यात झाले. हा प्रकार शहरातील निलम नगरात बुधवारी सायंकाळी पाचच्या सुम ारास घडला. काशीनाथ भवानराव सुतार (वय ६७, रा. निलम नगर) असे मारहाण झालेल्या सास-याचे नाव आहे. बुधवारी सायंकाळच्या सुमारास काशीनाथ हे त्यांच्या राहत्या घरात होते. त्यावेळी त्यांचा सुनेबरोबर घरगुती कारणातून वाद झाला. यात चिडलेलया सु-नेने काशीनाथ यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. या सर्वांगास मुकामार लागल्याने सायंकाळी ७.१५ च्या सुमारास ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मोहोळ रेल्वे स्थानकावर सिद्धेश्वर एक्सप्रेसचा थांबा मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

मोहोळ रेल्वे स्थानकावर सिद्धेश्वर एक्सप्रेसचा गाडी नंबर १२११६ सोलापूर ते मुंबई व १२११५ मुंबई ते सोलापूर थांबा मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्थानिक प्रवासी, व्यापारी वर्ग, शेतकरी आणि भाविक नागरिक यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जल्ह्यातील मोहोळ तालुका व परिसरातील नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच तीर्थक्षेत्रांना भेट देणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी, कोरोना काळापासून बंद असलेला मोहोळ रेल्वे स्थानकावरील एक्स्प्रेस गाडी नंबर १२११६ सोलापूर ते मुंबई व १२११५ मुंबई ते सोलापूर गाड्यांचा थांबा पुन्हा सुरू करण्याची मागणी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

मोहोळ आणि आसपासच्या भागात रेल्वे प्रवाशांची मोठी संख्या असून, तालुक्यातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांना येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत होती. हा थांबा सुरू झाल्याने प्रवास अधिक सोयीस्कर होईल आणि वेळेची बचत होणार आहे. या निर्णयाबद्दल मोहोळ तालुक्यातील सर्व स्तरांतील नागरिक, व्यापारी व शेतकरी यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल मनः पूर्वक आभार मानत आहेत.

# सांगली अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. ९ ऑगस्ट-**

सांगली अर्बन बँकेची ८९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. ७ ऑगस्ट रोजी खरे क्लब हाऊस, धामणी रोड विश्रामबाग येथे खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.




सभेपूर्वी सभासद प्रशिक्षण झाले. यावेळी प्रा. सतीश होनराव यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर सभासदांना अत्यंत विस्तृत मार्गदर्शन केले. वक्ते सतीश होनराव यांचा परिचय संदीप कुलकर्णी यांनी करून दिला. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना होनराव यांनी उत्तरे दिली.

सभेचा प्रारंभ दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाला. प्रास्ताविक अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांनी विषयांचे वाचन केले. यावेळी उपस्थित सभासद यांच्यातर्फे अध्यक्ष गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष श्रीपाद खिरे, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक सर्व संचालक मंडळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सभासदांनी मनोगत व्यक्त करताना सभेचे उत्तम व नेटके नियोजन करून सभा यशस्वीपणे संपन्न झालेबदल अभिनंदन व समाधान व्यक्त केले. या सभेस उपाध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, संचालक सर्व सीए अनंत मानवी, संजय पाटील, श्रीकांत देशपांडे, डॉ. रवींद्र आरळी, एच.वाय पाटील, संजय धामणगावकर, शैलेंद्र तेलंग, सागर फडके, सागर घोंगडे, रणजित चव्हाण, सतीश मालू, कालिदास हरिदास, मनोज कोरडे, रवींद्र भाकरे, अश्विनी आठवले, स्वाती करंदीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कुलकर्णी यांनी केले. सुहास दिवेकर यांनी पसायदान म्हटले.

# भारतीय प्राचीन मंदिरे : अमूल्य वारसा व सांस्कृतिक संपत्ती

## डॉ. व्यंकटेश मेतन; आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळातर्फे व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळ आयोजित बौद्धिक व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रमाचे पहिले पुष्प गुंफताना डॉ. व्यंकटेश मेतन अस्थिरोगतज्ञ व ख्यातनाम छायाचित्रकार यांनी भारतातील अदभूत प्राचीन मंदिरे व त्यामागचे शास्त्र या विषयावर व्याख्यान दिले. ह्या मंदिरांची रचना, स्थापत्य आणि मंदिरातील व मंदिर परिसरातील अद्भुत वास्तुशिल्प हे स्थापत्यशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र ,भूमि ती, वास्तुशास्त्र या सर्वांचा विचार होऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून निर्मिती केलेल्या वास्तू आहेत असे प्रतिपादन केले. मुख्यता आर्यभट्ट व भास्कराचार्य या शास्त्रज्ञांचा वैज्ञानिक सिद्धांचा विचार झालेला असल्याचे त्यांनी व्याख्यानात सांगितले. सर्व प्राचीन मंदिरे सूर्यविज्ञान याचा विचार करून निर्माण झालेली असल्याचे त्यांनी पुढे कथन केले. मंदिरांची निर्मिती करताना ध्वनि शास्त्र, सममिती, चुंबकीक्षेत्र, जलप्रवाह याचाही विचार झाल्याचे त्यांनी पुढे नमूद केले.

सदरची मंदिरे हि आपल्या भारतीय धार्मिक संस्कृती, कला व ऊर्जेची केंद्र होती असे सांगितले. ते मागील २ दशक भारतातील अनेक प्राचीन मंदिरांना भेटी देऊन त्याचा अभ्यास करून उत्तम दर्जाची छायाचित्रे काढीत आहेत. भारतातील काही अदभूत प्राचीन मंदिरे यामध्ये हम्पी येथील विठ्ठल मंदिर, लेपाक्षी मंदिर, मोढेरा येथील सूर्य मंदिर,जगन्नाथ पुरीचे मंदिर, कोणार्कचे सूर्य मंदिर यांच्या वैशिट्यपूर्ण व अचंबित करणारे शिल्प, रचना यांची माहिती देऊन त्याम ागील वैज्ञानिक शास्त्र सांगितले.सोलापूर येथील हत्तर कुडल संगम येथील मंदिरे हे चालुक्य कुलातील अद्भुत मंदिराचा नमुना असल्याचे त्यांनी कथन केले. अश्या अदभूत मंदिरांचे स्थापत्य, शिल्पकला, संस्कृती, महत्व , धार्मिक भावना, वैभव याविषयी युवकांमध्ये जागृती व आवड निर्माण करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. या व्याख्यानमालेचे उद्घाटन माननीय सुनील पेंडसे अध्यक्ष सोलापूर जनता सहकारी सोलापूर यांच्या हस्ते झाला.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी केला. यामध्ये त्यांनी कुमार स्वामीजी यांच्या केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. डॉ. व्यंकटेश मेतन यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष निळकंठप्पा कोल्हापुरे यांच्याकडून शाल पुष्पगुच्छ ग्रंथ देऊन करण्यात आला. सुनील पेंडसे यांचा सत्कार संस्थेचे ज्येष्ठ साधक चनबसप्पा अलमेल यांच्या हस्ते करण्यात आला. व्याख्यांतांचा व त्यांचे उद्घाटकांचा परिचय संस्थेचे विश्वस्त विश्वनाथ म्हेत्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या आभार संस्थेचे सचिव बाबासाहेब कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन विश्वस्त नागनाथ चौगुले यांनी केले. प्राचार्य गजानन धरणे, नागेंद्र रेवणकर, विश्वास कुलकर्णी, सुधीर देव उपस्थित होते. या कार्यक्रम ासाठी विश्वस्त रमेश चौगुले, संतोष मंठाळकर, दयानंद माशाळकर भीमाशंकर सरसंबे, सागर कोडते, बाळासाहेब नष्टे, प्रभाकर आडके उपस्थित होते.

## महात्मा फुले समता परिषदेचा सोमवारी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने कल्याण केंद्र येथे सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी ११:३० वाजता मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव लिंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मेळाव्यात आगामी सामाजिक आव्हानांबाबत दिशा ठरविण्यात येणार आहे. जिल्हा आणि तालुका शहर समितीची नवी नेमणूक करण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बापूसाहेब भंडारे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. ओबीसी आणि अल्पसंख्याक समाजावर होणारे हल्ले रोखण्यासाठी उपाय योजने संदर्भात, समता परिषदेमार्फत दुर्बल घटकांच्या हक्काचे संरक्षण व्हावं या संदर्भात चर्चा होणार आहे. समता, सामाजिक न्याय आणि ओबीसी अल्पसंख्याक समाजाच्या हित रक्षणासाठी विचारविनिमय करण्यात येणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान प्रदेश उपाध्यक्ष शंकरराव लिंगे हे भूषविणार आहेत. यावेळी किशोर रणदिवे, श्रीशैल ब्याडशिंगे, बापू भंडारे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळात लिंगायतच दुर्लक्षित?

- ओबीसी दाखला बंधनकारक
- समाजप्रमुखांनी पाठपुरावा करण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाची उपकंपनी म्हणून लिंगायत समाजासाठी ४ डिसेंबर २०२३ रोजी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण विभाग असल्याने या महामंडळातील कर्जयोजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) दाखला असणे बंधनकारक आहे. यामुळे अनेक लिंगायत तरूणांना व्यवसायासाठी कर्ज घेताना अडचणी निर्माण होत आहेत. लिंगायत समाजातील बहुसंख्य तरूणांकडे ओबीसी दाखला मिळत नाही. त्यामुळे लिंगायत समाजाच्या उन्नतीसाठी समाजप्रमुखांनी पुढाकार घेऊन ओबीसी दाखल्याची अट रद्द करून सरसकट लिंगायत समाजासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची गरज आहे.



दोन वर्षापुर्वी ९ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार ४ डिसेंबर २०२३ रोजी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. मात्र यावेळी विविध कर्जयोजनांचा लाभ घेण्यासाठी लिंगायत समाजासाठी ओबीसी दाखला बंधनकारक करण्यात आले. त्यामुळे लिंगायत समाजातील तरूणांना व्यवसायासाठी कर्ज घेताना अडचणी निर्माण होत आहेत. लिंगायत समाजातील अनेक उपजातीचे ओबीसी दाखले मिळत नाहीत. पूर्वीच्या काळी शाळा दाखल्यावर फक्त लिंगायतच शब्द असल्याने व उपजातीचा उल्लेख नसल्याने १९६५ पूर्वीचा पुरावा मिळत नाही. त्यामुळे लिंगायत समाजातील बहुसंख्य तरूणांना शिक्षण व नोकरी मिळविताना त्रास होत आहे. शिक्षण व नोकरी नसल्याने व्यवसाय करून कुटुबांच्या उदरनिर्वाहासाठी प्रयत्न होत असताना त्या तरूणांना ओबीसी दाखल्याची अट त्रासदायक ठरत आहे.


अप्पासाहेब पाटील


सुदीप चाकोते

लिंगायत समाजातील व्यक्ती, कुटुंब व समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वयंरोजगाराला चालना देण्याच्या उद्देशाने महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. मात्र ओबीसीची जाचक अट असल्याने शासनाचा उद्देश्य यशस्वी होताना ब्रेक लागत आहे. जातीच्या दाखल्याच्या अटीमुळे बेरोजगार तरूणांची संख्या वाढत आहे. समाजातील तरूणांना महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ असताना रोजगार व व्यवसायासाठी कर्ज मिळत नसल्याने तरूणांमध्ये नैराश्य पसरल्याचे दिसून येते. सोलापूर, धाराशिव, लातूर, सांगली व इतर जिल्ह्यात लिंगायत समाज मोठया प्रमाणावर आहे. शासनाच्या विविध कर्ज योजनांचा लाभ मिळाल्यास समाज उन्नतीसाठी हातभार लागणार आहे. महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळात विविध व्याज परतावा योजना असल्याने त्या माध्यमातून तरूणांच्या व्यवसाय निर्मिती व वृद्धीसाठी मदत होणार आहे. त्यामुळे लिंगायत समाजातील प्रमुख राजकयि नेत्यांनी शासनाकडे पाठपुरावा करून ओबीसीची अट रद्द करण्याची मागणी होत आहे.

**मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार :** लिंगायत समाजासाठी स्थापन केलेल्या महामंडळाच्या कर्जाच्या लाभासाठी ओबीसी दाखल्याची अट चुकीचे आहे. बहुसंख्य तरूणांकडे ओबीसी दाखला मिळत नाही. त्यामुळे त्यांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहावे लागत आहे.. ओबीसी दाखल्याची अट रद्द करून सर्व लिंगायत समाजाला कर्जासह विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. त्यामुळे समाजाला न्याय मिळण्यास मदत होइल.

- **अप्पासाहेब पाटील,** माजी संचालक, बाजार समिती सोलापूर

**सरसकट लाभ मिळण्यासाठी आंदोलनाची तयारी :** समतेचे जनक असणाऱ्या महात्मा बसवेश्वर महामंडळासाठी जातीच्या दाखल्याची अट म्हणजे व्यवसायासाठी प्रयत्न करणाऱ्या तरूणामध्ये भेदभाव निर्माण करण्यासारखे आहे. लिंगायत समाजातील ठराविक लोकांकडेच ओबीसी दाखले मिळतात. त्यामुळे दाखल्यावर लिंगायत उल्लेख असणाऱ्या सर्वांना ओबीसी दाखले देण्यात यावेत. अथवा लिंगायत समाजाच्या तरूणांसाठी महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळातील कर्जयोजनांचा लाभ देण्यासाठी ओबीसीची अट रद्द करण्यात यावे. अन्यथा लिंगायत समाजाच्या तरूणांसाठी रस्त्यावरील आंदोलन करण्याची तयारी आहे.

- **सुदीप चाकोते,** राष्ट्रीय उपाध्यक्ष, अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासभा

## महत्वाचे...



### आदर्श शिक्षक पुरस्काराने श्रीपाद कुलकर्णी सन्मानित

**वाळूज, दि. ९ ऑगस्ट-**

बार्शी येथील येथील श्रीमती प्रयाग कराड इंग्लिश मीडियम हायस्कूल येथील संगीत शिक्षक श्रीपाद वसंत कुलकर्णी यांना मेअर्स एम.आय.टी, पुणे यांच्यातर्फे २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. मागील १४ वर्षांपासून ते शालेय विद्यार्थ्यांना हिंदुस्तानी शास्त्रीय गायन, हार्मोनियम आणि तबला वादन यामध्ये प्रशिक्षण देत आहेत. केवळ संगीतच नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव, उपक्रमशील अध्यापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी त्यांचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. सध्या ते शाळेतील परीक्षा विभागप्रमुख म्हणूनही कार्यरत आहेत. या शाळेत गुरुशिष्य परंपरा जोपासली जाते. हा पुरस्कार ५ ऑगस्ट रोजी एम.आय.टी वर्ल्ड पीस सेंटर, कोथरूड, पुणे येथे पार पडलेल्या एका समारंभात मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास परमपूज्य स्वामी स्वरूपानंद सरस्वती, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, प्रा. स्वाती कराड-चाटे, व इतर मान्यवर उपस्थित होते.



### नूतन पोलीस निरीक्षक चिल्लावार यांचा पोलीस पाटील संघाकडून सन्मान

**वाळूज, दि. ९ ऑगस्ट-**

पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांची सोलापूरच्या नियंत्रण कक्ष येथे बदली झाले असून त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार हे रूजू झाले. स्वामी यांच्याकडून चिल्लावार यांनी कार्यभार स्वीकारले आहे. यावेळी पोलीस पाटील संघा कडून शाल, हार, गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हद्दीतील अवैध व्यवसायाविरोधात कडक कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. चिल्लावार यांनी यापूर्वी सांगली, गडचिरोली, ठाणे ग्रामीण, सिंधुदुर्ग, पालघर व कुडूवाडी आदी पोलिस ठाण्यांत काम केले आहे. पोलीस पाटील यांनी आपाल्या गावपातळीवरिल माहिती दैनंदिन देणे आवश्यक आहे. गावात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले. यावेळी गाव कामगार पोलीस पाटील संघाचे जिल्हा अध्यक्ष शिवानंद फुलारी, महादेव बिराजदार, प्रेमनाथ राठोड, विजय चव्हाण, पोतदार, हुसेनी कारंजे, सुशांत बिराजदार, शिवशरण भंगर्गी, अंबणा अस्वले, संजय बिराजदार, महेश गवारे, गेनसिद्ध सुरवसे, वैजीनाथ किणगी, प्रकाश बिराजदार, मळसिद्ध कांबळे उपस्थित होते.




### नाझरा विद्यामंदिर प्रशाला येथे वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे

**सांगोला, दि. ९ ऑगस्ट-**

नाझरा, ता.सांगोला येथील नाझरा विद्यामंदिर प्रशाले समोर असणाऱ्या मैदानात विविध वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. रक्ताच्या नात्याबरोबर निसर्गाचेही नातं जपूया अशा प्रकारचा संदेश देत रक्षाबंधनाचा कार्यक्रम हरित सेना विभागाच्या वतीने संपन्न झाला. मैदानात असलेला वृक्ष हा माझा भाऊ आहे, त्या भावाची मी व्यवस्थितपणे काळजी घ्यायला हवी. वृक्ष नावाच्या भावासाठी मी दररोज काही वेळ द्यायला हवा अशा प्रकारची संकल्पना हरित सेना विभागाचे प्रमुख सोमनाथ सपाटे यांनी मांडली. यावेळी मुख्याध्यापक बिभिषन माने, इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका मंगल पाटील, पर्यवेक्षक विनायक पाटील, सोमनाथ सपाटे, वसंत गोडसे, दत्तात्रय जाधव उपस्थित होते.



### आजपासून शेख चिस्ती ऊरूस

**अक्कलकोट, दि. ९ ऑगस्ट-**

सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान आणि थोर सुफी संत हजरत शेख नुरुद्दीन चिष्ती रहि. अल्लेही साहेबांचा वार्षिक ऊर्स रवि दि. १० ऑगस्ट रात्री अभिषेक ११ रोजी संदल गंध मिरवणुक गंध चडविणे १२ रोजी चिराग दिपोत्सव व रात्री कव्वालीचा कार्यक्रम १३ रोजी सकाळी जियारत प्रसाद वाटप आदि धार्मिक कार्यक्रम धर्मगुरु सय्यदशा नासीर पाशा सय्यदशा कादिरपाशा पिरजादे यांच्या हस्ते धार्मिक विधी कार्यक्रम होणार आहेत. उर्स निमित्य दर्शन धार्मीक कार्यक्रमाचा प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन ॲड ए. के. पिरजादे ट्रस्टचे अध्यक्ष हाजी फजलेरहिमान शाब्दी सचिव जैनोदीन अशरफी यांनी केले आहे. उरुस नमित्त रविवारी १० ऑगस्ट रोजी रात्री १० वा. दर्गाहचे वंशपरंपरागत सज्जादानशीन, धर्मगुरू, मठाधीपती सय्यदशा नसीरपाशा सय्यदशा कदीरपाशा पीरजादे चिष्ती यांचे पवित्र हस्ते गुस्ल (अभिषेक) होणार आहे .दि . ११रोजी संदलमलिक (गंध) असून संध्याकाळी ठीक ७ वाजता दर्गाहची परंपरागत गादी दर्गाहच्या समाखानात अंथरून सज्जादानशीन व फकीर फुकरा, भक्तगण यांचेसह संदलची भव्य मिरवणूक रजी अल्लः दर्गाह येथून निघणार आहे रात्री १० वाजता दर्गाहचे सज्जादानशीन यांचे हस्ते हजरत शेख नुरुद्दीन बाबां यांचे समाधीवर संदल/गंध चढविण्यात येईल. दि . १२ रोजी चिराग (दिपोस्तव) चा कार्यक्रम होणार आहे. रात्रौ दर्गाहवर कव्वालीचा, भजनाचा बहारदार कार्यक्रम संपन्न होणार आहे. दि. १३ रोजी सकाळी १० वाजता जियारतचा कार्यक्रम असून सज्जादानशीन यांचे हस्ते प्रसाद वाटप होईल होणार आहे. संध्याकाळी दर्गाहची परंपरागत गादी फातेहाखानी नंतर सज्जादानशीन यांचे दर्गाह येथील निवास्थानी नेऊन ऊर्स शरीफची सांगता होणार आहे.



# पंढरीत क्रांती महिला मंडळाचे पोलिस बांधवांसोबत रक्षाबंधन

- पो. नि. विश्वजीत घोडके यांनी मानले महिलांचे आभार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ ऑगस्ट-**

विविध सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या येथील क्रांती महिला मंडळाकडून रक्षाबंधन सणानिमित्त पंढरपूर येथील पोलिसांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. या बांधण्यात आलेल्या राखीने आम्हा पोलिसांना बहिणींचे आशीर्वाद मिळाले असल्याची प्रतिक्रिया देत, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी उपस्थित महिलांचे आभार मानले.

येथील शहर पोलीस स्टेशनमध्ये पुरुष आणि महिला पोलिसांना राखी बांधून पेढे वाटून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. यावेळी क्रांती महिला मंडळातील शुभांगी कोठारी, ब्रह्मा कोठारी, सुजाता शहा, संगीता शहा, नीलिमा व्होरा, सुनंदा शहा, राणी डोके, अनुराधा कोठारिया नीलम कोठारी, शुभांगी कोठारी, रंजना अष्टेकर, वंदना कोठारी, लता शहा, मरवडेकर, सुनिता व्होरा यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

# बार्शीत नशामुक्त अभियानात २०० नागरिकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट-**

तहसील कार्यालय आणि जाम गावच्या आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत 'नशामुक्त गाव अभियान' कार्यशाळेत सुमारे २०० जणांनी सहभाग घेतला.

येथील यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत महसूल अधिकारी, पोलीस पाटील आणि गावपातळीवरील कार्यकर्त्यांचा सहभाग होता. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. संजय कोडेतवार, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, तहसीलदार एफ.आर. शेख, माढा तहसीलदार संजय भोसले, आयुष केंद्राचे संचालक




डॉ. संदीप तांबारे, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. कोडेतवार यांनी 'नशामुक्त गाव' ही संकल्पना नशामुक्त भारताच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे अधोरेखित केले. तहसीलदार शेख यांनी स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण तालुका नशामुक्त करण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे सांगत सर्वांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. आयुष केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे यांनी अभियानाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी नशाविरोधी जागरुकता स्पर्धा, महिलांसाठी मेळावे, नशाविरोधी रॅली, ग्रामसभांमध्ये ठराव, तसेच व्यसनमुक्तीसाठी उपचार आणि पुनर्वसन सुविधांचा समावेश आहे. यावेळी तणावमुक्ती तंत्रांचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. स्वप्नील जाधव, अश्विनी कुंभार, मनीषा शिंदे, सूरज पवार, सोहेल शेख, मृदुल हजारिका आणि सुजित ढेकळे यांनी विशेष मेहनत घेतली.



# लंम्पी आजारग्रस्त जनावरांच्या नुकसानभरपाईसाठी अनुदान द्या

- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) ची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.९ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यात लंम्पी आजाराचा फैलाव वाढत असून आतापर्यंत चाळीस ते पन्नास जनावरांचा मृत्यू झाला आहे. शेतकऱ्यांना योग्य आर्थिक मदत मिळावी, तसेच लंम्पीने बाधित जनावरांवर मोफत उपचार व्हावेत यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांना निवेदन देण्यात आले. मागील वर्षी लंम्पी आजारामुळे मृत पावलेल्या गाईंना ३५ हजार रुपये आणि लहान वासरांना २० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्यात येत होती. मात्र चालू वर्षी अद्याप एकाही शेतकऱ्याला नुकसानभरपाईचा लाभ मिळालेला नाही. याबाबतचे निवेदन देताना जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस.एम.गायकवाड, युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, सरचिटणीस प्रवीण साळवे, तालुका कोषाध्यक्ष समीर सोरटे, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, तालुका उपाध्यक्ष दिलीप सरतापे, तालुका सचिव दादासाहेब सरतापे, युवक कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, प्रसिद्धीप्रमुख मारुती शिंदे गौतम वाघंबरे, प्रशांत साळवे उपस्थित होते.

### दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी

सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-

मोहोळ येथून मोहोळ स्टेशनकडे जाताना चंद्रमौळी कारखान्याजवळ दुचाकी घसरली. यात तरुण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास घडला.

अक्षय शिवाजी लवटे (वय ३०, रा. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. अक्षय हा मोहोळ येथून मोहोळ स्टेशनच्या दिशेने शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास दुचाकी चालवित जात होता. दरम्यान चंदमोळी जवळील कारखान्याजवळ आला असता, अचानक दुचाकीचे चाक घसरल्याने तो खाली पडला. यात दोन्ही हात तसेच दोन्ही पायांना खरचटल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री १०.५० वाजता आई अनिता लवटे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# ३० लाखांची फसवणूक; आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ ऑगस्ट-**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली १० टक्के व्याजाचे अमिष दाखवून बार्शीतील एका व्यक्तीने आपल्या मित्रासह मिळून ३० लाख रुपये गुंतवले. त्यातील १३ लाख रुपये परत दिले. राहिलेले १७ लाख रुपये सतत मागूनही मिळत नसल्याने न देण्याऱ्या राजेंद्र शिवाजी गुंडप व उमेश शिवणगीकर यांचे विरुध्द बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे दि. २७ जुलै २०२५ रोजी गुन्हा नोंद होवून अटक करण्यात आली.

सदर आरोपीच्यावतीने बार्शी येथील ज्यु. मॅजि. वर्ग- १ यांच्या कोर्टात ॲड. योगीराज पुरवंत यांनी दाखल केलेल्या जामीन अर्जावर युक्तिवाद करताना, शेअर बाजारातील गुंतवणुक ही जोखमीची आहे. याची कल्पना असताना देखील फिर्यादीने गुंतवणुक केली, त्या बदल्यात सुरुवातीला परतावा घेतला आणि नंतर मार्केटमधील मंदीमुळे परतावा मिळाला नाही त्यामुळे आरोपीस दोषी मानता येणार नाही. तसेच फिर्यादीने स्वतः त्याच्या दोन ओळखींच्या लोकांना आरोपीकडे रक्कम गुंतविण्यास सांगितल्यामुळे आरोपीस जबाबदार धरता येणार नाही.



तसेच फिर्याद दाखल करण्यास झालेला १९ महिन्यांचा विलंब असे दर्शवितो की, केवळ आरोपीने पैसे परत न केल्याने फिर्यादीने विचार करुन बनवाट परिस्थिती निर्माण करुन केवळ पैसे उकळण्याच्या उद्देशाने व इतर लोकांनी फिर्यादी विरुध्द गुन्हा दाखल करु नये म्हणून फिर्यादीने गुन्हा दाखल केलेला आहे, असे सांगितले. सदर प्रकरणी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकुन कोर्टाने आरोपीस जामीन मंजूर केला. सदर प्रकरणी आरोपीच्यावतीने ॲड. योगीराज पुरवंत, ॲड. संदीप भोसले, ॲड. सुदर्शन सोनवणे, ॲड. जयश्री व्ही. व्हरे, संकेत पवार यांनी काम पाहिले.

# सिंहगडमधील कार्यशाळेत १५० विद्यार्थी सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ ऑगस्ट -**

एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी, पंढरपूर येथील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागात झालेल्या Essentials of Cyber Security या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली.

या कार्यशाळेचे उदघाटन संगणक विभागप्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मि. साहिल अन्सारी, वरिष्ठ सायबर सुरक्षा तज्ज्ञ, पुणे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. संदीप लिंगे यांनी करून दिला व पुष्पगुच्छ



देऊन स्वागत केले. कार्यशाळेत सायबर सिक्युरिटीसंदर्भात सांगण्यात आले की, आधार क्रमांक, बँक तपशील, पासवर्ड्स यासारखी संवेदनशील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर सुरक्षा आवश्यक आहे. ऑनलाइन बँकिंग करताना डेटा चोरी किंवा फ्रॉड टाळण्यासाठी सायबर सुरक्षा महत्वाची आहे. कंपन्यांचे ग्राहक डेटा, आर्थिक माहिती आणि मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर सुरक्षा उपाय गरजेचे आहेत. सायबर हल्ले केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित नाहीत, तर सरकारी यंत्रणांवरही होऊ शकतात. सायबर सुरक्षेसाठी उपाय : मजबूत पासवर्ड वापरा, दोन-स्तरीय प्रमाणीकरण (२ऋ) वापरा, ऑनलाइन व्यवहार करताना सतर्क राहा, विनामूल्य थळ-ऋळ वापरताना काळजी घ्या. अशा प्रकारे या दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये सायबर सुरक्षेची मूलभूत तत्त्वे, नेटवर्क सिक्युरिटी, डेटा प्रोटेक्शन, एथिकल हॅकिंग, मालवेअर विश्लेषण, सिक्युरिटी टूल्स यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. उपस्थित विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि हँड्स-ऑन सत्रांमधून या संकल्पना अनुभवण्याची संधी मिळाली. सायबर हल्ल्यांची उदाहरणे आणि त्यावरील उपाय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. या कार्यशाळेमध्ये सुमारे १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगणक विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाने मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.संदीप लिंगे यांनी केले.

# श्री स्वामी समर्थ रुग्णालयात आज होमिओपॅथिक शिबिर

### देवस्थान व होमिओपॅथिक रिसर्च फौंडेशनचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ ऑगस्ट-**

येथील श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील श्री.स्वामी समर्थ रुग्णालयात २० वर्षांखालील दिव्यांग रुग्ण मुलांसाठी होप फॉर होपलेस या मोफत होमिओपॅथिक शिबीराचे रविवारी दि.१० ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेत आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.

श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व मुंबई येथील डॉ. प्रफुल्ल विजयकर होमिओपॅथिक रिसर्च फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीर होईल. या शिबीरात डॉ.प्रफुल्ल विजयकर व वैद्यकीय पथकाच्या वतीने २० वर्षांखालील दिव्यांग मुलांची शारिरीक, मानसिक, बौद्धीक तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात येतील. तरी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.प्रफुल्ल विजयकर होमिओपॅथिक रिसर्च सेंटर तथा डॉ.अपर्णा सामल व श्री.स्वामी महाराज देवस्थानचे श्री स्वामी समर्थ रूग्णालयाचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



भारत मातेची पूजन करताना कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ बी. श्रीनिवास, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, उपसंपादक किरण बनसोडे.



# ‘तरुण भारत’च्या वर्धापन दिनी मान्यवरांची उपस्थिती



राजू सलगर | ॲड. सातलगावकर | आनंद पुरुड | अरविंद पुरुड | सुभाष कलशेट्टी | शुभचिंतक | ॲड. विश्वनाथ पाटील | ॲड. शांतवीर महिंद्रकर | शुभचिंतक | ॲड. रियाज शेख | बी.जी. गायकवाड



नवनाथ क्षीरसागर | अविनाश क्षीरसागर | शिवशंकर सावंत | पुरुषोत्तम साखरे | बसवराज चराटे | श्रीनिवास पुला | विजय पाठक | रमेश फलमारी | श्री. पवार | बाळासाहेब वाघमोडे | जाफर बांगी | मजहर अल्लोळी



अय्युब नल्लामंदू | प्रकाश वाले, पशुपतीनाथ माशाळ, राजू राठी, राजू देसाई धवल शहा यांच्यासह मित्रमंडळी. | संजू चव्हाण | शुभचिंतक | शुभचिंतक | श्याम येमूल | साईराज येमूल



अजमल शेख | रविंद्र देशमुख | शुभचिंतक | सज्जन निचळ | विजय शाबादी | श्रीनिवास दासरी | श्रीकांत कांबळे | महेश रामदासी | चंद्रकांत मिराखोर | शुभचिंतक | इस्माईल शेख | शुभचिंतक



श्री. जाधव | राजेंद्र कांबळे | पाप्पय्या तालीम संघाचे पदाधिकारी. | वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे पदाधिकारी | जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के व इतर



साधना केकडे,प्रकाश केकडे | पल्लवी स्वामी, सुवर्णा कांबळे, प्रांजली मोहिकर, प्रकाश शिंपी, सुनिता होनमोटे. | दादासाहेब गायकवाड | सुरेश फलमारी | संतोष सोमा | श्रीपाद दिक्षित | सुरेंद्र पत्की | रियाज अत्तार | अनिस शेख | शुभचिंतक



श्री. पाटील | प्रमोद तम्मनवार | अनिल शिराळकर | विनायक दुदगीकर | प्रा. अर्जुन व्हटकर | माधव देशपांडे | श्री स्वामी विवेकानंद केंद्राचे कार्यकर्ते. | दैनिक तरुण भारतला शुभेच्छा देताना मित्रमंडळी.



सुर्यकांत आसबे | विनायक होटकर | रविंद्र मस्के | शुभचिंतक | शुभचिंतक | शुभचिंतक | शुभचिंतक | अरविंद महाले विकास कस्तुरे | शुभचिंतक | शुभचिंतक | श्री. विजापुरे | शुभचिंतक